# वेचलेले संगीतमोती

पं. वि. दे. अंभईकर

शब्दांकन
मा. ह. रानडे
कुसुम रानडे

। 'स्वानंदी' प्रकाशन ।

**वेचलेले संगीतमोती**
पं. वि. दे. अंभईकर

शब्दांकन
मा. ह. रानडे, कुसुम रानडे

© गिरीश विनायक अंभईकर
१०८/३, विजयनगर इमारत,
दादर (प.), मुंबई ४०००२८
फोन : ०२२-२४३६६५८८
मो. : ९८६९२२९१६९

प्रकाशक :
स्वानंदी प्रकाशन
सौ. अपर्णा मकरंद केळकर
सरगम, रघुकुल सोसायटी,
कर्वेनगर, पुणे ५२
दूरध्वनी : ०२० - २५४२०८१२.
E-mail:swanandik@rediffmail.com

वितरक
• ऐसी अक्षरे •
दुकान क्र. ७८,
गिरीजाशंकर विहार सोसायटी,
सहवास सोसायटी जवळ,
पोतनीस परिसर समोर,
महर्षी कर्वेनगर, पुणे-५२
संपर्क : ०२० २५४५४६५५
email : aisee.akshare@gmail.com
websit : www.aiseeakshare.com

संपादन :
मिलिंद प्रभाकर सबनीस

अक्षरजुळणी :
गणेश एंटरप्रायजेस
गणेश भुजबळ
मो. : ९९२२९५३६२७

मुद्रक :
अजित ठोंबरे
प्रतिमा ऑफसेट
देवगिरी इंडस्ट्रियल इस्टेट,
कोथरुड इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे ३८
दूरध्वनी : (०२०) २५४६०२१६

प्रथम आवृत्ती :
५ ऑक्टोबर १९९६
द्वितीय आवृत्ती :
१५ मार्च २०१२
पं. वि. दे. अंभईकर जन्मशताब्दी दिन

किंमत : रु. १००/- मात्र



## प्रयोगशील व प्रतिभावंत गायक

श्री. वि. दे. अंभईकर हे एक प्रयोगशील आणि निर्मितीची प्रतिभा असलेले गायक आहेत. गायनकलेची अत्यंत निष्ठेने त्यांनी उपासना केली. ते कलावंत आहेत आणि सामाजिक बांधिलकीची उत्कट जाणीव असलेले देशसेवकही आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांचा सहभाग तर होताच, पण आपल्या गायनकलेचा संबंध या लढ्याशी यावा असा स्पृहणीय प्रयत्नही त्यांनी केला आहे. त्यांच्या स्मृतीग्रंथासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा.

*वि. वा. शिरवाडकर*
*नाशिक*

# मनोगत

पुस्तकी ज्ञान जितकं उपयुक्त त्यापेक्षा अनुभवजन्य ज्ञान अधिक उपयुक्त. चार मिनिटं विद्वानांच्या सहवासात राहून मिळालेलं ज्ञान, सबंध पुस्तक वाचून मिळालेल्या ज्ञानापेक्षा अधिक श्रेष्ठ. माझ्या पूर्वायुष्यात म्हणजे बालपणापासूनच थोर व्यक्तींचा सहवास लाभत गेला. त्यात साहित्यिक, संगीतज्ज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आदींचा समावेश होता. इतकं असूनही मी मात्र कोरडाच्या कोरडा कसा राहिलो याचं आश्चर्य वाटतं. कॉम्प्युटर यंत्रावर जसे विचार प्रकट होतात तसे मनातले विचार आपोआप कागदावर उमटल्या जाणारं यंत्र उपलब्ध झालं तर किती सोय होईल?

रोज आपण केलेल्या खर्चाचा हिशोब रोजनिशीमध्ये जसा लिहून ठेवतो तसं रोज किंवा जेव्हा केव्हा कोणाच्या भेटीगाठी होऊन विचारांची देवाणघेवाण होते त्याचीही नोंद ठेवावी. त्यातून निष्पन्न होणारं ज्ञान भावी जीवनाला उपकारक ठरतं असं मला ५५ वर्षांपूर्वी कै. तात्यासाहेब केळकरांनी सांगितलं होतं. माणसाच्या मनोव्यापारात प्रथम अंतर्मनात आलेले विचार व नंतर बहिर्मनाच्या द्वारा प्रकट होतात. कोणत्याही विषयावर मन केंद्रित झाल्याशिवाय त्या विचारांना पालवी फुटत नाही. शास्त्रज्ञ व ऋषिमुनींनी याच मार्गाने शोध लावून मानवावर उपकार करून ठेवले आहेत.

माझ्या आयुष्यात आलेले विविध प्रकारचे अनुभव, संगीतसाधनेवरच्या श्रेष्ठ व्यक्तींचे अभिप्राय, वन्देमातरम् राष्ट्रगीताबाबतची त्यांची मतं वगैरे पाहून माझे प्रेरणास्थान श्री. विद्याधर गोखले यांना आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, ''एवढं भांडार असताना ते पुस्तकरूपानं वाचकांसमोर यापूर्वीच यायला हवं होतं. आता कधी वर गेल्यावर करणार? बरं, आता जरी उशीर झाला तरी कोणाला हाताशी घेऊन शब्दांकन करा. नंतर काय करायचं ते पाहू.'' तसं पाहिलं तर ही माझी पहिलीच ग्रंथ निष्पत्ति आहे. ५६ वर्षांपूर्वी नागपूरच्या 'महाराष्ट्र'चे संपादक कै. गो. अ. तथा दादासाहेब ओगले यांनी माझ्या 'वन्दे मातरम्' राष्ट्रगीताची लोकप्रियता पाहून त्या गीताचं स्वरलेखन छापून प्रसिद्ध केलं. चार पानांच्या या 'प्रचंड' ग्रंथाची किंमत अर्धा आणा (२ पैसे) होती.

आज या पुस्तकाची प्रेरणाशक्ती दै. 'लोकसत्ता'चे माजी संपादक नाटककार, विद्वान साहित्यिक, ज्येष्ठ पत्रकार श्री. विद्याधर गोखले आहेत हे मी माझं भाग्य समजतो. त्यामुळं मला स्फूर्ति येऊन लिहायला सुरुवात केली. रिझर्व्ह बँकेतील माजी ज्येष्ठ अधिकारी श्री. माधवराव रानडे यांनी शब्दांकन केले व त्यांच्या पत्नी मुंबई आकाशवाणीच्या माजी ज्येष्ठ वृत्त निवेदिका श्रीमती कुसुम रानडे यांनी त्यांना साहाय्य केलं. त्यामुळेच हे पुस्तक पूर्ण होऊ शकले. 'यत्न तो देव जाणावा' ह्या समर्थ रामदासांच्या वचनाप्रमाणं आचरण केल्यास यशाची खात्री वाटली. त्यात संत पाचलेगांवकर महाराजांच्या प्रदीर्घ सहवासातील काही विचार जीवनाला इष्ट वळण देणारे वाटले, अभ्यासनीय व चिंतनीयसुद्धा. योग्य संस्काराशिवाय माणूस घडत नसतो.

या ग्रंथामधील प्रेरक शक्ति जशी श्री. विद्याधर गोखले असल्याचं वर सांगितलं आहे, तसं माझे दुसरे स्नेही 'सिएट' टायर कंपनीचे श्री. बाळासाहेब बाक्रे यांचा उल्लेख केला नाही तर देवाशिवाय देव्हारा होईल. त्यांचा संगीत, नाट्य, काव्य, यांचा व्यासंग दांडगा असून कालिदासाच्या 'मेघदूत'चं इंग्रजी भाषांतर केलं. अनेक नव्या, जुन्या गायक गायिकांच्या ध्वनिमुद्रिका व कॅसेटस् ज्या इतरत्र ऐकायला मिळत नाहीत त्या जतन करून ठेवल्या असून त्यांचा आस्वाद ते सर्व कुटुंबासहीत तर घेतातच, पण दुसऱ्यालाही अत्यंत हौसीने नि उदारतेनं देतात. त्यांच्या घरी सहज जाऊन आलं तरी दीड-दोन तासाची मैफल ऐकून आल्याचं समाधान मिळतं. आणि संगीताचा गुलाल उधळल्याप्रमाणं आनंदाची वलयं उमटल्याची प्रचिती येते. बालगंधर्व आणि कुमार गंधर्व ही त्यांची संगीत दैवतं. मी मुंबईच्या आकाशवाणीच्या सेवेत असताना श्री. बाळासाहेबांचे वडील कै. बापूसाहेब म्युझिक ऑडिशन बोर्डावर असल्यामुळे त्यांचा माझा घनिष्ट संबंध आला. तेही शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक. त्यांच्या दादरच्या पारशी कॉलनीतल्या घरी मी अनेकदा जात असे. सगळ्या घरात संगीतमय वातावरण, कित्येकदा जेवताना गप्पा चालू असता आलापतानांच्या लकेरींनी जेवणही साग्रसंगीत व्हायचं.

प्रत्येक व्यावहारिक गोष्टीमागं भगवंताचं अधिष्ठान, निदान स्मरण तरी असावं असं माझं मत आहे. यशापयशाची पर्वा न करता सतत कार्यरत असणं चांगलं. भौतिक वस्तूंचा साधन करून मर्यादित उपभोग घेताना आसक्ती नि अतिरेक टाळण्याकडे लक्ष देणं आवश्यक वाटतं. श्री. महेश योगी यांचा ऋषिकेशचा आश्रम, स्वामी शिवानंदांचा आश्रम, म. गांधींचा वर्ध्याचा आश्रम, संत पाचलेगांवकर महाराजांचा मुक्तेश्वर आश्रम या सर्व आश्रमीय जीवनाभुवांची सरासरी काढली तर जीवनाला ती पोषकच ठरावी. केवळ त्यातील चांगलं तेवढं घ्यायचं. मला कोणी विचारलं तर मी म्हणेन की, 'मी आस्तिक असून सनातनी नाही आणि पुरोगामी असून नास्तिक नाही.' माझे परमस्नेही आदरणीय सर्वश्री ग. प्र. प्रधान, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, मा. गो. वैद्य, मं. वि. राजाध्यक्ष, श्री. अच्युत महाराज, रामकृष्ण बाक्रे, मोहन नाडकर्णी, प्रा. डॉ. माधुरी मुनशी, प्रा. डॉ. शकुंतला खोत, मा. गो. वैद्य, प्रकाश मोहाडीकर आदींनी पाठविलेल्या लेखरूपी शुभेच्छांमुळे या ग्रंथाला शोभा आली. त्यांचे आभार मानणं माझं कर्तव्य आहे. तसेच माझ्या इतर आप्तेष्टांनी केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. काही मजकूर चुकून मागे-पुढे झाला असल्यास वाचकांनी क्षमा करावी.

**वि. दे. अंभईकर**

२ ऑक्टोबर १९९४ (प्रथमावृत्तीची प्रस्तावना)

# 'माळ' गुंफता गुंफता...

चरित्रनायक गानमहर्षि वि. दे. अंभईकर यांचं पूरं आयुष्य ९२ वर्षांचं. या प्रदीर्घ कालात त्यांनी मेहकर, देवळी, नागपूर, मुंबई, खामगांव आणि पुन्हा मुंबई अशी स्थलांतरं केली. एवढेच नव्हे तर प्रत्येक ठिकाणी त्यांची जीवनसरिता वेगळे वळण घेत राहिली. वन्दे मातरम् या राष्ट्रगीताकरता केलेली चळवळ, एच.एम.व्ही, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, आकाशवाणी आणि संत पाचलेगांवकर महाराजांच्या खामगांव येथील मुक्तेश्वर आश्रमातील वास्तव्य अशी विविधता त्यांच्या आयुष्यात दिसून येते.

तसं पाहिलं तर अंभईकरांचा स्नेह मुख्यत: आकाशवाणीवर ज्येष्ठ वृत्त-निवेदिका असलेली माझी पत्नी कुसुम रानडे हिच्याबरोबरचा. पण अंभईकरांनी सर्वसामान्यांपेक्षा वेगळं, समृद्ध जीवन उपभोगल्याचं माझ्या लक्षात आल्यामुळे मी ते शब्दबद्ध करायला उद्युक्त झालो. ही जबाबदारी एकदा पत्करल्यानंतर मात्र अंभईकरांनी मला कसलीही उणीव भासू दिली नाही. त्यांच्या जीवनाचं सर्वांगीण दर्शन मला घडवता यावं म्हणून त्यांनी मला भरपूर साहित्य उपलब्ध करून दिलं. तो संभार एवढा प्रचंड होता की, त्यातून ग्राह्य ते निवडणं हेही एक मोठं कामच झालं. पण मला केवळ हस्तलिखित किंवा छपील मजकुरावर विसंबून रहायचं नव्हतं. अंभईकर ही संपूर्ण व्यक्ती जाणून घेतल्याशिवाय त्यांचं चरित्र मी लिहिणार नव्हतो.

आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर अंभईकरांनी घेतलेल्या उचित किंवा अनुचित निर्णयाचे वेळी त्यांची मन:स्थिती कशी होती हे मला माहीत करून घ्यायचं असल्यामुळे प्रत्येकी दीड दोन तासांची चौदा-पंधरा चर्चासत्रं मी त्यांच्याबरोबर घेतली. मग एवढ्या सामुग्रीच्या जोरावर त्यांचं चरित्र लिहिणं अगदी सुलभ झालं. त्यांच्या अंगचे गुणदोष मला जसे भावले तसं त्यांचं दिग्दर्शन मी केलं आहे.

या चरित्रात निवडलेलं असं काही नाही. अंभईकरांच्या आयुष्यातील गोऱ्याबरोबर काळं, सोन्याबरोबर पितळ सर्व काही जसंच्या तसं पारदर्शकतेने वाचकांपुढे ठेवलं आहे. आपल्या आयुष्यात अंभईकरांनी घेतलेल्या काही निर्णयांचं विश्लेषण त्यांची त्यावेळची परिस्थिती लक्षात घेऊन मी केलं असल्याचं वाचकांच्या लक्षात येईल. माझ्या सदर विवेचनाशी अंभईकर सहमत असतीलच असं नाही. तरीही त्यांनी त्या मजकुराच्या पुस्तकात अंतर्भाव करायला नकार दिला नाही, अभ्यासक या माझ्या भूमिकेला मान दिला, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. पुस्तकाच्या इतर भागाबद्दल एवढंच म्हणता येईल की,

'फोडिले भांडार । धन्याचाचि माल ।। मी तो हमाल । भारवाही ।।'

मा. ह. रानडे.

# द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने

स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक, उत्तम शास्त्रीय गायक व संगीतकार म्हणून पं. विनायक देवराव अंभईकर हे मागच्या पिढीतील रसिकांना चांगलेच परिचित आहेत. 'वन्दे मातरम्' राष्ट्रगीत व्हावे यासाठी मनापासून प्रयत्न करणारे तात्यासाहेब अंभईकर यांचा परिचय १९९९ मध्ये 'वन्दे मातरम्'च्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जन्मवर्ष सोहळ्याच्या निमित्ताने झाला. त्यावेळी ८८ वर्षांचे तात्या मनाने तरुणच होते. अध्यात्मिक साधनेने मन आणि व्यक्तिमत्त्व अंतरबाह्य निर्मळच होते. तसा त्यांचा सहवास पुढे ५ वर्षेच मिळाला. पण तेवढ्या अवधीतही तात्यांनी खूप काही दिले.

२०११-२०१२ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष. तात्यांच्या आठवणींना, त्यांच्या संगीतरचनांना नव्याने उजाळा मिळावा, या हेतूने 'जन्मदा' प्रतिष्ठान, ज्येष्ठ व्हायोलिन वादक श्री.भालचंद्र तथा नाना देव आणि अंभईकर कुटुंबीय यांनी काही कार्यक्रमांचे आयोजन केले.

१९९६ मध्ये तात्यांचे 'वेचलेले संगीत मोती' हे आठवणीवजा आत्मकथन प्रसिद्ध नाटककार विद्याधर गोखले यांच्या पुढाकाराने प्रसिद्ध झाले. पुस्तक प्रकाशनापूर्वी काही दिवस श्री. विद्याधर गोखले यांचे निधन झाले. पुढे तत्कालीन सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री. प्रमोद नवलकर व संगीतकार सुधीर फडके यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशित झाले.

या पुस्तकाचे शब्दांकन श्री. माधवराव रानडे व श्रीमती कुसुम रानडे यांनी केले आहे. जन्मशताब्दीच्या निमित्ताने या पुस्तकाचे पुर्नप्रकाशन करावे, अशी कल्पना पुढे आली व तात्यांचे चिरंजीव श्री. गिरीश अंभईकर यांनी त्यास आनंदाने मान्यताही दिली व त्यासाठी दुर्मिळ छायाचित्रे, तात्यांचे लेख व इतर प्रकारचे सहाय्य दिले. या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीचे प्रकाशन सौ. नम्रता मुळे, डिंपल पब्लिकेशन यांनी केले होते. या आवृत्तीच्या ज्येष्ठ सुलेखनकार श्री. कमल शेडगे यांनी केलेल्या मुखपृष्ठासह या पुर्नप्रकाशनास डिंपल पब्लिकेशन यांनी परवानगी दिली.

या निमित्ताने प्रामुख्याने राष्ट्रीय विचारांची व संगीत विषयाशी संबंधित पुस्तके प्रकाशित करणाऱ्या आमच्या प्रकाशनास ही संधी मिळाली, हे नक्कीच आनंददायी आहे.

या पुस्तकाच्या निमित्ताने पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रातील संगीतक्षेत्रातील अनेक नामवंतांच्या आठवणींचा खजिनाच तात्यांच्या या आत्मकथनातून सर्वांना पुन्हा एकदा उपलब्ध होत आहे. या पुस्तकासाठी सहकार्य करणारे श्री. सुरेश चांदवणकर व 'सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स'चे सर्व सदस्य, चित्रकार श्री. सचिन जोशी यांचे मनापासून आभार.

मिलिंद प्रभाकर सबनीस
**जन्मदा प्रतिष्ठान**

मकरंद व अपर्णा केळकर
**स्वानंदी प्रकाशन**



## कोण हो हे अंभईकर?

विनायक देवराव अंभईकर एकही जोडाक्षर नसलं तरी नाव तसं ठसठशीत. हे अंभईकर कोण? काही लक्षात येत नाही बुवा. अहो, अनेक मराठी वृतपत्रांत वाचकांच्या पत्र व्यवहारात संगीत-साहित्य, राजकारण, अगदी कुठल्याही विषयावर स्वत:ची निर्भिड मतं मांडणारे वि. दे. अंभईकर म्हणून एक आहेत. तेच असतील हे. नाही हो, तुम्हाला सांगते. बरीच जुनी गोष्ट आहे. पन्नासहून अधिक वर्षांपूर्वी विदर्भातील एक गायक वन्देमातरम् गीताला निरनिराळ्या चाली लावून अनेक ठिकाणी ते गाऊन दाखवित. अखेर 'मिश्र खंबावती' रागातील चाल सवोत्कृष्ट ठरून ती त्यांनी अनेक तत्कालीन पुढाऱ्यांना ऐकविली आणि गान तपस्विनी श्रीमती मोगूबाई कुर्डीकर यांची ध्वनिमुद्रिकाही काढली. मला आठवतं, त्यांनी हा ध्यास एवढा घेतला होता की, त्याकाळी त्यांना 'वन्दे मातरम् अंभईकर' असंच लोक म्हणायचे. त्यांच्या नावाची आद्याक्षरं वि. दे. पण ते म्हणत असायचे मात्र वंदे-वंदे.

तुम्ही काय सांगत बसलात पन्नास वर्षांपूर्वीच्या जुन्या गोष्टी? मी सांगत ते ऐका. चाळीस एक वर्षांपूर्वी सकाळी रेडिओ लावला तर वि. दे. अंभईकर हे नाव अनेक लोकप्रिय गाण्यांना जोडलेलं मी स्वत: ऐकलं आहे. रेडियोवर अनेक मान्यवर संगीतकारांच्या ध्वनिमुद्रिका त्यांनी काढल्याचं मला नक्की आठवतं. तेच अंभईकर असावेत हे.

अहो! तुमचे तर्कवितर्क पुरे झाले. अंभईकर, सुधीर फडके, दत्ता डावजेकर, बर्वे हे चौघे एकत्र एच.एम.व्ही.मध्ये असल्याचं मी स्वत: ४५ वर्षांपूर्वी पाहिल्याचं मला आठवतं. एक संगीत क्षेत्रातील वयस्क गृहस्थ म्हणाले, आता नावासारखी नावं असतीलही. मी नाही म्हणत नाही. पण १५-२० वर्षांपूर्वी मी खामगावला संत पाचलेगांवकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमात गेलो होतो. तिथे आल्यागेल्यांची आस्थापूर्वक चौकशी करणारे आणि एकूणच व्यवस्था बघण्याचे काम अंभईकर नावाचेच एक सद्गृहस्थ पहात होते, हे मला चांगले आठवतं. मी नक्की सांगतो तेच हे अंभईकर.



# पैनगंगेच्या काठी



## चांदीसोन्याच्या पदकांची खैरात :

'बाळ, तुझ्या कोटावर आधीच इतकी पदकं झळकत आहेत की त्यात मी आता देणार असलेलं पदक लावायला मला जागाच दिसत नाही.' विनायकरावांनी पं. राजाभैय्या पूछवाले, ग्वाल्हेर यांच्या मार्गदर्शनाखाली केलंल्या संगीत साधनेनंतर माधव संगीत विद्यालयाच्या 'संगीत सुधाकर' परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. पदवी देण्याचा दीक्षान्त समारंभ नागपूरला व्यंकटेश थिएटरमध्ये १९२९ साली होत होता. त्यावेळी पदवी घ्यायला आलेल्या या १७ वर्षाच्या तरुणाकडे पाहून राजे लक्ष्मणराव भोसले नागपूरकर यांनी वरील कौतुकाचे उद्गार काढले. इतर पदकं यथावकाश विस्मृतीत गेली. पण राजे लक्ष्मणरावांच्या हस्ते मिळालेलं सुवर्णपदक आणि 'संगीत सुधाकर' ही पदवी मात्र सगळीकडे प्रसिद्धी पावली.

## शास्त्रीय संगीताचे बाळपणी संस्कार :

विनायकराव अंभईकरांचा जन्म विदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील मेहेकर या गावी पैनगंगा नदीच्या काठावर असलेल्या अगस्ति ऋषींच्या समाधी समोरच्या देवीच्या मंदिरात (घर मंदिरातच होतं) १९१२ सालच्या गुढीपाडव्याला झाला.

विनायक हे, वडील देवराव आणि आई भिमाबाई यांचं दहावं आणि शेवटचं अपत्य. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती मध्यम म्हणता येण्यासारखी. मात्र घरातील सर्वांना गाण्याची व नाटकाची आवड असल्यामुळे घरात हार्मोनियम आणि भोंग्याचा फोनोग्राफ होता. वास्तविक तेव्हा ग्रामोफोन भारतात नुकताच आला होता. त्यामुळे तो घरात असणं किंवा हार्मोनियम असणं हे श्रीमंतीचं लक्षण मानलं जात असे. त्या काळच्या सर्व प्रसिद्ध गायक गायिकांच्या ध्वनिमुद्रिका घरात असल्यामुळे विनायकाची आई मुलांना झोपवताना प्यारासाहेब, जानकीबाई, गोहराजान, मलकाजान (आग्रा), जोहराजान अंबालावाली, बालगंधर्व या सारख्यांच्या ध्वनिमुद्रिकांचा उपयोग अंगाईगीतांसारखा करीत असे! सर्वच मुलांवर त्यामुळे नकळत गायनाचे संस्कार झाले. पण विनायक मात्र केवळ पाचव्याच वर्षी ऐकलेली गाणी बाजाच्या पेटीवर वाजवून स्वत: गाऊ लागला. नाटकातील पदांबरोबरच पाठ्यपुस्तकातील 'जॉर्ज नृपा गावे, सद्भावे वंदुनिया पदा' यासारखी पंचम जॉर्ज बादशहांच्या स्तुतीपर गाणीही तो म्हणायचा. ''आपले बादशहा पंचम जॉर्ज यांचा राज्याभिषेक १९१२ साली लंडन येथे झाला.'' हे वाक्य पाठ करताना खरोखरच आपले ते बादशहा आहेत असं त्याला वाटत होतं.

## गाणं कमी दर्जाचं ! :

मेहेकर गावाला तसं विशेष महत्त्व नव्हतं. पैनगंगा नदी गावातून वाहते. पण वर्षातील १० महिने ही नदी कोरडी. नदीच्या पात्रातील अगस्ती ऋषींच्या समाधीजवळ असलेल्या घरात देवीचं लहानसं देऊळ होतं. गावात बालाजीचं मंदिरही विशेष प्रसिद्ध. या देवाच्या वार्षिक उत्सवात विनायकाचे वडील बंधू प्रल्हादराव, विश्वनाथराव आणि मुरलीधरपंत शारदा, संशयकल्लोळ, मानापमान व मृच्छकटिक ही संगीत नाटकं बसवून कामही करायचे. त्यामुळे उत्सवाच्या सोहळ्यात चैतन्य यायचं. उत्सवातील नाटकात कोणी काम केलं म्हणजे कौतुक होत असलं, तरी एरवी नाटकात काम करणं निषिद्ध मानलं जात असे. लहानगा विनायकही गाणं म्हणू लागला, तर शेजारचे लोक टिंगल करीत म्हणायचे, ''अरे, तू काय पोरगी आहेस गाणं म्हणायला?'' पण विनायकला गाण्याची आवड एवढी की, हिरमुसला झाला तरी तो घरातल्या घरात भिंतीकडे तोंड करून गायचा. प्रसिद्ध गायकांच्या ध्वनिमुद्रिका ऐकून त्यांची हुबेहूब नक्कल करताना पुरेसा समज आला नसल्यामुळे



ध्वनिमुद्रिकेतल्याप्रमाणेच शेवटी 'मेरा नाम मलकाजान आग्रा' ही घोषणाही तो बिनदिक्कत करायचा!

## स्वस्ताईची कमाल :

मेहेकर गावात श्री हरीहर महाराज आणि श्री. बाळाभाऊ पितळे हे संत होऊन गेले. श्री हरीहर महाराज रात्री-अपरात्री येऊन दारावर थाप मारून 'हरीऽऽऽहर' असा गजर करीत आणि मला आत्ता पिठलं भाकरी करून वाढ म्हणून सांगत. विनायकची आई कधी न त्रासता त्यांची इच्छा पुरी करायची. हिंदुमहासभेचे पुढारी आणि प्रभावी वक्ते कै. वि. घ. देशपांडे हे मेहेकरचेच. त्यांचं धाकटे बंधू कवि ना. घ. देशपांडे तिथंच वकिली करीत.

त्या काळात पहिलं जागतिक महायुद्ध सुरू असूनही कमालीची स्वस्ताई होती आणि माणसाच्या गरजाही कमी असल्यामुळे मासिक वीस रुपये पगारात पंधरा जणांचा संसार सुखासमाधानानं होत असे. कोणाला मुलगा झाला तर चार आण्याचा गूळ गांवभर वाटून उरत असे! ब्राह्मण, महार, कुणबी आणि मुसलमान कुटुंबं गावात गुण्या गोविंदानं रहात. अडचणीच्या प्रसंगी मात्र सर्व गांवकरी एकमेकांना मदत करीत असत.

## भुताटकीचा बंदोबस्त :

विनायकाचे वडील मेहेकरला मुलींच्या शाळेत शिक्षक होते आणि उर्दू भाषा चांगली अवगत असल्यामुळे अर्जनवीसाचे म्हणजे 'पिटीशन रायटरचे' ही काम करीत असत. ग्रामीण भागात त्याला 'अटारन्या' म्हणत. निजामाच्या राज्यात म्हणजे मोगलाईत सर्व कारभार उर्दूत चालत असल्यामुळे त्यांचा हा व्यवसायही बऱ्यापैकी चाले. ब्राह्मणांचा आचारधर्म ते अत्यंत कसोशीनं पाळीत. तिन्ही त्रिकाल स्नानसंध्या-पूजा-अर्चा, धार्मिक विधी, रुद्राभिषेक इत्यादी सर्व काही स्वत: करीत. भगवतगीता मुखोद्गत होती. आणि ती त्यांनी एका फारच लहानशा डायरीवर मोडी लिपीत बोरूनं लिहून काढली होती. काळी शाई ते घरीच तयार करीत असत. सुपाऱ्या जाळून त्याचा कोळसा झाला की त्यात योग्य प्रमाणात पाणी घालून खलबत्त्यांत १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ घोटल्यानंतर काळी शाई तयार होत असे. त्याला 'शिरस' म्हणत. अशा काळ्या शाईच्या पुड्यांना २ पैसे किंमत दुकानात पडत असे.

त्रिकाल संध्यावदनापैकी सकाळची आणि माध्यान्हीची संध्या वडील घरातच करीत. पण संध्याकाळची संध्या मात्र नदीच्या पात्रातील एका प्रशस्त दगडावर बसून करीत असत. त्यावेळी एकदा नदीच्या प्रवाहांतून 'मी येऊ, मी येऊ?' असा स्त्रीचा आवाज येऊ लागला. पांच सहा दिवस वडिलांनी तिकडे दुर्लक्ष केलं. पण एक दिवस मात्र तसा आवाज येताच त्यांनी त्याला आव्हान दिलं. 'ये तूं. कोण आहेस तू? नुसतं येऊ का, येऊ का, असं कशाला विचारतेस? ये, समोर उभी रहा. माझ्या जानव्याच्या ब्रह्मगाठीशी आणि गायत्री मंत्राशी तुझी गाठ घालून देतो.'

वडिलांनी असं ठणकावून सांगताच दुसऱ्या दिवसापासून हा आवाज व त्याबरोबरचा बांगड्यांचा आवाज कायमचा बंद झाला.

## चोराशी मुकाबला :

त्या काळात प्रवासाचं सर्वमान्य साधन म्हणजे घोडा. विनायकचे वडील एकदा घोड्यावरून लोणारला चालले होतं. संध्याकाळी पोहोचायचं होतं. पण वाटेतच काळोख पडू लागला. एका लहानशा ओढ्याशी घोडा थांबला. वाटलं की त्याला तहान लागली असेल. पण तो पाणी पिईना. तेव्हा मात्र वडिलांच्या मनात पाल चुकचुकली. एवढ्यात तीन बुरखाधारी चोर घोड्याजवळ येऊन उभे राहिले आणि म्हणाले, 'निकालो, तुम्हारे पास क्या है?' वडील म्हणाले, 'मी गरीब ब्राह्मण आहे. माझ्याजवळ पैसा-अडका काही नाही. थोडे डाळ-तांदूळ आहेत. ते घ्या हवेत तर.' चोर म्हणाले, 'नही चलेगा, हमको पैसाही चाहिये.' आता मात्र जीवावर बेतणार, हे लक्षात आल्यावर वडिलांनी एक युक्ती केली. घोड्यावरून न उतरता जवळची पानतंबाकूची चंची उघडून त्यातील सगळी पानं, सुपाऱ्या आणि इतर वस्तू 'चुकून' खाली पाडल्या. आणि म्हणाले, 'बेटा, जरा पान तो उठावो मेहेरबानी करके?' तेव्हा बुरखेवाले चोर अभावितपणे खाली वाकले. आणि पानसुपारी गोळा करू लागले. त्याचक्षणी वडिलांनी घोड्याच्या शेपटीला हात लावून 'शंकर' असा त्याच्या नावाचा पुकारा करताच, घोड्यानं दुगाण्या इतक्या जोरानं झाडल्या की चोरांचं थोबाड फुटलं. तिसरा पळून गेला. घोडाही दौडत सुटला. अशा प्रकारे वडिलांनी युक्तीनं चोरांच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली.



## वडिलांचा अंत :

१९१५-१६ सालच्या प्लेगमध्ये मेहेकर गावातील सर्व वस्ती गावाबाहेर झोपड्या बांधून तिथे राहायला गेली. तरी मधून मधून गावात येऊन घराकडे लक्ष देणं आवश्यक होतं. असंच एका सायंकाळी विनायकाचे वडील घरी जाऊन परतताना दाराला कडी घालीत होतं. तोच त्यांचा तोल जावून ते खाली अंगणातील एका दगडावर पडले. त्यांना उचलून झोपडीत आणावं लागलं. पुढे नीट उठता बसता येईना. प्लेग ओसरला तो वडील बंधू अंबादासपंत यांना वर्धा जिल्ह्यातील देवळी येथे पोस्टमास्तरची नोकरी लागली. आणि त्यांचा विवाहही झाला. त्यामुळे अंभईकर कुटुंब मेहेकर सोडून देवळीला गेलं. इथेच वडिलांचा अंत झाला. विनायक तेव्हा ३-४ वर्षांचा होता.

## आईचं प्रसंगावधान :

विनायकाची आईसुद्धा वडिलांप्रमाणे धीराची व प्रसंगावधान असलेली बाई होती. एका बाळंतपणाचे वेळी ती घोड्यावरून जात असताना वाटेत प्रसूत झाली. पण ती गोंधळून गेली नाही. तान्ह्या बाळाला आपल्या पडशीत गुंडाळून शेक घेण्याकरिता थोड्या अंतरावर एक प्रेत जळत होतं, तिथं जाऊन बसली आणि घरी निरोप पाठवून पुढील आवश्यक ती व्यवस्था करून घेतली.

## शाहिस्तेखानाची आठवण :

१८९९ साली प्लेगनं मोठा कहर केला. घरोघर उंदीर पडू लागले. माणसं मरू लागली. 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे ।।' अशी स्थिती मेहेकर गावाची झाली. स्वाभाविकच सर्व वस्ती गावाबाहेर झोपड्या बांधून राहायला गेली. चारही बाजूंनी दीड दोन फुटाच्या माती आणि दगडाच्या आधारानं तट्ट्याच्या झोपड्या जमिनीवर रोवलेल्या असत. घासलेट तेलाच्या चिमण्यांचा अपुरा प्रकाश असे. त्यातच चोरांचा सुळसुळाट. एका रात्री सर्वजण झोपल्यावर काहीतरी खुडखुड आवाज आला. उंदिर किंवा मांजर असेल असं समजून आईनं शुक् करताच आवाज बंद झाला. पण पुन्हा थोड्या वेळानं तसाच आवाज झाला. आधी आवाज आल्यापासूनच आईनं अंधारात डोळे उघडे ठेवले होतं. त्यामुळे तिला अंधारातही थोडंसं दिसू लागलं होतं. (नाईट साईट). पहाते तो एक हात आत घुसून लोखंडी

संदूक (ट्रंक) ओढताना दिसला. प्रसंगावधान राखून भीमाबाईंनी जवळच्या कोयत्यानं त्या हातावर असा जोराचा वार केला की, हाताची बोटंच तुटली आणि तो चोर 'मर गया, मर गया' ओरडत पळत सुटला. एव्हाना आजूबाजूचे लोक जागे होऊन त्यांनी चोराचा पाठलाग करून त्याला पकडलं. या प्रसंगानं शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाची बोटं तोडल्याची इतिहासातली आठवण झाल्याशिवाय रहात नाही!

## कष्टाळू जीवन :

भीमाबाई शरीरानं जशा धडधाकट होत्या तशा मनानंही खंबीर होत्या. स्वत: निरक्षर असल्या तरी सर्व प्रकारच्या नाविन्यामध्ये त्यांना रस असे. गाण्याची आवड चांगली होती. एवढ्या मोठ्या कुटुंबाची धुणीभांडी, सडा-सारवण आणि दळणकांडण घरी करताना त्या त्या प्रसंगी ओव्या त्या खड्या आवाजात म्हणत असत. शिवाय प्यारासाहेब, मलकाजान इ. त्या काळच्या प्रसिद्ध गायक-गायिकांच्या ध्वनिमुद्रिका वेळात वेळ काढून सकाळी आणि रात्री ऐकण्याचा त्यांना नाद होता. अंभईकरांची कुलस्वामिनी माहूरची श्री रेणुका माता. तिच्यासंबंधीची असंख्य कवनं, श्लोक आणि स्तोत्रं त्यांच्या तोंडी असत. जुन्या चाली, रुढी आणि समजुती मनात मुरलेल्या. त्यामुळे कधीकधी गंमत होई. स्त्रियांनी पायात चप्पल घालणं त्याकाळी अप्रतिष्ठेतेचं लक्षण समजलं जाई. एकदा अंभईकरांच्या थोरल्या भावानं आईकरीता चप्पल विकत आणली. कधी सवय नसल्यानं आणि नेहमी घोड्यावरचा प्रवास असल्यानं पायातून चप्पल नेहमी पडायची. अखेर हातात घेऊन रस्त्यानं चालायची वेळ येत असे. पापड, कुरडया, लोणची, शेवया सर्व काही घरी सोवळ्यातच करणं त्या काळच्या स्त्रियांना कठीण वाटत नसे. घरची गरीबी. पण शिक्षण पूर्ण झालंच पाहिजे. मग कितीही कष्ट पडो. थोरल्या दोन भावांनी तर वार लावून जेवणं करून अभ्यास केला.

अंभईकर कुटुंबातील विनायकाचे तीन नंबरचे भाऊ विश्वनाथराव ऊर्फ बापू नागपूरच्या बिऱ्हाडात स्थायिक झाल्यावर त्यांनी सहज एकदा आईला विचारलं की तुझा फोटो काढू या का? यावर ती उत्तरली, 'मेल्या, मी लौकर मरावं असं तुला वाटत असेल तर काढ खुशाल.' एखादी व्यक्ती पुन्हा दिसायची नाही म्हणून आधीच तिचा फोटो काढून ठेवावा, एवढाच फोटो काढण्याचा हेतू असतो अशी त्याकाळी कल्पना होती. आईला फोटो काढून घ्यायला तयार करायला सर्व भावंडांना सहा महिने लागले. अखेर दिवस ठरला. पण फोटोकरीता स्टुडिओत जायच्या आधी



घरात रडारड झाली. फोटो तयार होवून घरी आणल्यावर मात्र आईला फार आनंद झाला आणि ती म्हणाली, 'फोटुत त्यानं माझा चेहरा हुबेहूब काढलाय!' तिच्या मते आता संकट टळलं होतं. आईला पान खायची सवय होती. रामटेकची उत्तम पिकलेली पिवळी जर्द पानं त्याकाळी दोन आणे शेकडा मिळत असत. तिची चंची नेहमी भरलेली आणि कायम बरोबर असायची. देवळात दर्शनाला किंवा कीर्तनाला जायचं म्हणजे पायात चपला न घालता जायची.

## पोस्टाच्या पार्सलने पुरणपोळीचा प्रसाद :

सर्व मुलांवर तिची एवढी माया होती. पण एखाद्यावेळी ती कशावरून तरी रागवायची आणि घराबाहेर पडून सरळ देवळात जाऊन बसायची. ती कशावरून रागावली आहे हेसुद्धा मुलांना माहीत नसायचं. तरीसुद्धा सर्व भावंडं लगेच देवळात जाऊन तिची आर्जवं करीत आणि घरी चल, आम्ही पुन्हा असं करणार नाही, असं आश्वासन देत. एवढ्यानं तिचा राग निघे आणि ती परत घरी येऊन कामाला भिडे. मुलाबाळांची, सुनांची दुखणी, बहाणी, बाळंतपणं करून कधी त्यांची आबाळ होऊ दिली नाही. नेहमीच्या धावपळीच्या जीवनामुळे तिला स्वास्थ्य असं लाभलं नाही. स्वभाव अत्यंत प्रेमळ. अडचणीच्या वेळी आधार देण्याचा वसाच तिनं उचलला होता. विनायक एकदा आजारी झाल्याचं तिला कळताच नवरात्रातला नऊ दिवसांचा तिचा कडक उपवास चालू असताना, अमरावतीहून मिळाली त्या गाडीनं ती नागपूरला धावून आली. कोणी सून बाळंतीण असली की तिचं सर्व करायला आई हजर व्हायची. १९४० साली विनायकला मुंबईला नोकरी लागल्यावर खाणावळीत जेवून प्रकृति बिघडेल म्हणून वऱ्हाडचं अस्सल लोणकढे रवाळ तूप ती डबे भरून पाठवित असे. सिताबर्डीतील घरी गौरी गणपतीचा म्हणजे महालक्ष्म्यांचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होत असे. दरवर्षी सर्व भावंडं जमायची. या कुलाचाराच्या नैवेद्याला पुरणपोळी, सोळा भाज्या, सोळा चटण्यांचं पंचपक्वान्नांचं जेवण असे. एका वर्षी गणेशोत्सवात गाण्यांचे बरेच कार्यक्रम लागल्यामुळे विनायक जाऊ शकला नाही. तेव्हा तिसऱ्याच दिवशी आईनं पाठविलेल्या गौरीच्या प्रसादाचं पार्सल त्याला मिळालं. त्यात पुरणपोळ्या आणि वडे चांगल्या स्थितीत होतं. पण पाच पानांच्या कातरविडाही आईनं पाठविला होता. तोही उत्तम होता. कारण टपालाची सेवा त्याकाळी वाखाणण्यासारखी असून दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी पार्सल पोस्टमनकडून मिळायचं!

## आईचा अंत :

पहिल्या पगारातून विनायकनं आईकरिता २४ रुपयांचं जरीकाठी नऊवारी लुगडं घेतलं होतं. त्याचं तिला इतकं कौतुक वाटलं की ती शेजाऱ्यापाजाऱ्यांना व आल्यागेल्याला ते दाखवित सुटली. वडील बंधूंची पोस्टमास्तर म्हणून चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा येथे बदली झाली. आणि याच घरी हृदयविकाराच्या झटक्यानं आईचा अंत झाला. हे कळविणारी तार मुंबईला आली तेव्हा अंभईकर मुंबई विद्यापीठाच्या पदवीदान सभागृहात पहाटे तीन वाजता अल्लादियाखाँ साहेबांचा रामकली राग ऐकण्यात गुंग झाले होतं. शेजाऱ्यानं ती तार आणून हॉलमध्ये त्यांना दाखविली. वडील तिसऱ्या वर्षीच वारले असले तरी अंभईकरांना प्रेमळ मातृछत्र मात्र २९ वर्षे लाभले. फोटो काढल्यानंतर सुमारे २२ वर्षांचं आयुष्य तिनं भोगलं होतं.

## कडक थंडीतही रियाजात खंड नाही :

अगदी बालवयापासून अंभईकरांना संगीताची आवड असली तरी संगीताचं शास्त्रीय शिक्षण घ्यायला त्यांनी आठव्या वर्षी नागपूरला कै. बाळासाहेब बक्षी यांच्या भारत गायन समाजात प्रथम सुरुवात केली. त्यांनी हे शिक्षण अत्यंत निष्ठेने घेतलं. रियाज करायला पहाटे पाच वाजता उठायचे. थंडीच्या दिवसात उठायचं जिवावर येई. परंतु थोरले बंधू बापू त्याच्या तोंडावर पाणी शिंपडून उठवायचे. कोणाची मैफल ऐकून आल्यावर तसंच गाणं येण्याकरिता ताबडतोब रियाजाला बसायला लावीत. पुरीया, मारवा या रागांची तालीम करताना ते तंबोऱ्यावर निषाद न लावता पंचमच ठेवीत असत. अजूनही षडज् पंचम लावूनच तालीम करतात. लहानपणी विनायकाला नाकात गाण्याची सवय नकळत होती. एक दिवस गुरुजींनी 'तू नाकात का गातोस?' म्हणून हडसावलं आणि त्याचं नाक धरून भिंतीवर आपटलं. पुढे चार-पाच दिवस विनायक गायनशाळेत गेलाच नाही. झाल्या प्रकाराबद्दल वाईट वाटून गुरुजींनी घरी जाऊन त्याची समजूत घातली आणि नेहमीप्रमाणे तालीम सुरू झाली. त्याकाळी बोलपट, आकाशवाणी, दूरदर्शन यांच्यासारखी अनेकविध करमणुकीची साधनं नव्हती. त्यामुळे एकंदरीतच सर्व विद्यार्थीवर्गाचा असल्या अवांतर उद्योगात वेळ जात नसे. घरी शिस्तही चांगली असायची. घरी खाण्यापिण्याला काही कमी नव्हते. पण चैनही परवडण्यासारखी नव्हती. त्यामुळे मर्दानी खेळ, कीर्तनं,



प्रवचनं, व्याख्यानं आणि गायनाचे जलसे ऐकणं यातच विनायकराव शालेय आणि संगीत शिक्षणाव्यतिरिक्त वेळ घालवत असत. किर्लोस्कर ग्रँड सर्कशीतला शिकारखाना किंवा रामलीला पहाण्यात त्यांना मौज वाटे. तसेच नाटकातील लहान प्रवेश आपल्या शाळकरी मुलांना भूमिका देऊन करण्याची हौसही विनायकाला होती. सिव्हील लाईनमध्ये राहणारे प्रसिद्ध ॲडव्होकेट व नागपूर विश्वविद्यालयाचे माजी व्हाईस चान्सेलर कै. काकासाहेब पुराणिकांच्या घरातील हॉलमध्ये अशी नाटकं केली जात. डोक्यावर कागदी पृष्ठकांचे मुकुट, तोंडावर कापसाच्या मिशा, लाकडाच्या तलवारी, कामट्यांचे धनुष्यबाण, सतरंज्या, फाटक्या जाजमांचे पडदे आदी आयुधानिशी घरातील व शेजारच्या प्रेक्षकांसमोर ही नाटके व्हायची. मात्र प्रेक्षक असे तसे साधेसुधे नव्हते. तर ॲड. पाध्ये, सर हरीसिंग गौर, रावबहादूर बॅ. माधवराव किनखेडे, श्रीमंत बाळासाहेब बुटी वगैरे सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून मुलांच्या या खेळाचं कौतुक करीत. इतकंच नव्हे तर गव्हर्नमेंट हाऊसवर दरवर्षी होणाऱ्या हुरडा पार्टीत एकदा गोंडवाणा क्लबमध्ये श्रीमंत श्रीमती वत्सलाबाई पंडित यांनी विनायकांचं गाणं केलं. हुरडा, हुरड्याचे खमंग वडे, दही वगैरे पदार्थांच्या आस्वादाबरोबर गाण्याचाही आस्वाद सन्मान्य पाहुणे घेत होतं. शेवटी मध्यप्रदेश वऱ्हाडचे त्यावेळचे गव्हर्नर सर मॉंटेग्यु बटलर यांनी जवळ येऊन विनायकाचं कौतुक केलं.

## कीर्तन गायनाचे संस्कार :

किशोरावस्थेत सार्वजनिक गणेशोत्सव, शाळा-कॉलेजातली संमेलनं अशा अनेक ठिकाणी अंभईकरांनी गाण्याचे लहानमोठे कार्यक्रम केलं. श्रीमंत गोपाळराव बुटींच्या सिताबर्डीवरील भव्य वाड्यात दरवर्षी गोकुळ अष्टमीचा आठ दिवसांचा उत्सव गायन, कीर्तन सुग्रास भोजनादि कार्यक्रमांनी मोठ्या थाटात साजरा होत असे. मा. दीनानाथ, बापूराव पेंढारकर, सवाई गंधर्व आदींच्या गायनाचे कार्यक्रम या उत्सवात लोकांना ऐकायला मिळत. अशाच एका उत्सवात ह.भ.प. बाळकृष्ण हरदास आकोटकर बुवांचं कीर्तन होतं. पूर्वरंग झाल्याव मध्यंतरात त्यांनी विनायकाकडे पाहून म्हटलं, 'बाळ, एखादं देवाचं पद म्हणतोस का?' त्याने होकार देताच त्याच्या शेजारी बसलेला वसंत (कै. डॉ. वसंतराव देशपांडे) आणि विनायक या दोघांनी मिळून 'नरवर कृष्णासमान' हे पद म्हटलं. या जोडगाण्याने श्रोतृवृंद खूष झाला. जुगलबंदी हा शब्दप्रयोग त्याकाळी अस्तित्वात आला नव्हता. पण त्याचा प्रत्यक्ष प्रयोगच

श्रोत्यांनी ऐकला. १४ वर्षांचा विनायक असताना नागपूर येथे महात्मा गांधींच्या कुशीत बसून संपूर्ण वन्देमातरम् गाण्याचं सुवर्णभाग्य त्याला लाभलं!

## बालपणी वन्देमातरम् गांधीजींनी प्रथम ऐकलं :

हा योग कसा आला हे सांगण्यासारखं आहे. १९२६ साली गांधीजी नागपूरला एका खादी भांडाराच्या उद्घाटनासाठी आले होते. धंतोलीवर टिकेकरांच्या बंगल्यात त्यांचा मुक्काम होता. जवळच सुळे स्कूलमध्ये विनायक शिकत होता. शाळेच्या मधल्या सुट्टीत मित्रांबरोबर भटकताना त्याला एका बंगल्याबाहेर संत्र्याच्या झाडाची फांदी आलेली दिसली. फांदीला लटकणारी चांगली तयार संत्री पाहून सर्वांच्या तोंडाला पाणी सुटलं आणि त्यांनी काही संत्री तोडली. एवढ्यात बंगल्याचा माळी धावत येऊन त्यानं विनायकाला पकडलं. इतर मित्र पळून गेले. माळ्यानं त्याला नेऊन मालकासमोर उभं केलं. आता भरपूर मार मिळणार हे विनायकला कळून चुकलं. पण क्षणार्धात चित्र पालटलं.

विनायकाचा हात धरून बॅ. मोरोपंत अभ्यंकरांनी त्याला एका प्रशस्त दिवाणखान्यात नेलं. तिथं एका पलंगावर गांधीजी विराजमान झाले होतं. समोर बरीच मंडळी बसली होती. मोरोपंतांनी विनायकाला त्यांच्यासमारे नेलं व सांगितलं, 'यह हमारे नागपूरका लडका बहूत अच्छा गाता है ।' गांधीजींनी विनायकाच्या गालावरून हात फिरवून कौतुक केलं आणि जवळ घेऊन म्हणाले, 'कौनसा गाना गाओंगे ।' यावर विनायकाने संपूर्ण वन्देमातरम् राष्ट्रगीत गाऊन दाखविलं. गांधीजींना ते पसंत पडलं व म्हणाले, 'बहोत अच्छा । बडा गवय्या बनो ।'

या प्रसंगानंतर वन्देमातरम् गीताला निरनिराळ्या गावात चाली लावण्याचा छंदच त्याला लागला. त्यातली मिश्र खंबावती रागातली चाल सर्वांत लोकप्रिय झाली. स्वातंत्र्य मिळायला आणखी वीस वर्षे होती. तरीही जेव्हा कधी ते मिळेल तेव्हा वन्देमातरम् हेच राष्ट्रगीत होईल अशी सर्व भारतीयांना खात्री वाटत असल्यामुळे त्या गीताबद्दल एक भक्तीची भावना होती.

'वेद मंत्राहूनि आम्हां वंद्य वन्देमातरम्' हे माडगूळकरांनी अत्यंत प्रभावीपणे नंतर अनेक वर्षांनी म्हटलं. पण त्या काळी वन्देमातरम् हे शब्द उच्चारणंही धाडसाचे होतं. अंभईकर मात्र महात्माजींनी केलंल्या कौतुकानंतर वन्देमातरम्नं झपाटल्यासारखं झालं. तेव्हापासून पंचवीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी वन्देमातरम् हेच स्वतंत्र



भारताचं राष्ट्रगीत व्हावं यासाठी जिवाचं रान केलं. १९३९ साली वर्धा येथे डॉ. राजेंद्रप्रसादांच्या मुक्कामी झालेल्या त्यांच्या गाण्याच्या कार्यक्रमामध्ये हे गीत गाऊन दाखविले. आचार्य दादा धर्माधिकारी, शंकरराव देव, खादी ग्रामोद्योग केंद्राचे धोत्रे इ. मंडळी उपस्थित होती. डॉ. राजेंद्रप्रसादांनी स्वतःच्या हस्ताक्षरात अंभईकरांना प्रशंसापत्र दिलं. याच वर्षी जुन्या मध्यप्रदेश आणि वऱ्हाडचे मुख्यमंत्री डॉ. ना. भा. खरे यांच्या मंत्रिमंडळानं अंभईकरांच्या चालीला मान्यता दिली. पं. द्वारकाप्रसाद मिश्र, ठाकूर छेदीलाल, श्रीमती अनुसूयाबाई काळे आदि मंत्री विशेष प्रभावित झाल्याचं जाणवलं.

जशी वेळ येईल तेव्हा, जशी जागा असेल तेथे आणि जेव्हा ते इच्छा व्यक्त करतील तेव्हा त्यांच्या कामाच्या गर्दीतही थोर व्यक्तींना वन्देमातरम्ची चाल ऐकवून त्यांची मतं अजमावण्याचं सत्रच अंभईकरांनी सुरू केलं. गांधीजींना आगगाडीत त्यांच्यासमवेत प्रवासात तर पं. नेहरूंना त्यांच्या न्यू दिल्लीतील भव्य प्रसादाच्या अंगणातील हिरवळीवर अशा विविध ठिकाणी हे गीत ऐकविण्याचे मनोरंजक प्रसंग लाभले. एकदा वल्लभभाई पटेल मुंबईला मरीन ड्राईव्हवर आपले पुत्र कै. डाह्याभाईकडे उतरले असताना आणि त्यांना भेटण्यास वेळ मुळीच नसताना डाह्याभाईंनी सरदारजी पहाटे ५॥ ला मॉर्निंग वॉकला जातात त्यावेळी भेटण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे अंभईकर तिथे पोहोचताच त्यांच्याबरोबरच पहाटेच्या प्रसन्न वातावरणात चालत बोलत आणि वन्देमातरम्च्या वेगवेगळ्या चाली गात ते निघाले. याशिवाय सभासंमेलनात वाद्यवृंद व साथीदारासह जे गाण्याचे कार्यक्रम झाले ते वेगळेच. सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांना तर वर्धा स्टेशनवरच त्यांनी ही चाल ऐकविली. नागपूरच्या पंडित नेहरूंच्या दोन लाखांच्या प्रचंड सभेत सुरुवातीला अंभईकर आपल्या साथीदारांसह वन्देमातरम् गीत गायला सुरुवात करणार इतक्यात पंडितजींची नजर हार्मोनियमकडे गेली व रागाने पेटीवर हात आपटून 'बाजा बंद करो। अख्खा वन्देमातरम् गाव' असं फर्मावलं आणि त्यांचा पेटीला किती विरोध आहे हे दिसून आलं. १९४९ मध्ये दिल्ली येथे कै. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांनी वन्देमातरम् ऐकविण्याचा कार्यक्रम घटना समितीसाठी आयोजित केला. या संदर्भात कै. गाडगीळांचं जेव्हा अंभईकरांना निमंत्रण आलं, त्यावेळी त्यांची रेल्वे खर्च झेपण्याइतकी परिस्थिती नव्हती. त्यावेळी ते मुंबईला दादरच्या विजयनगर बिल्डिंगमध्ये त्यांचं परममित्र श्री. मोहनराव गोगटे यांचेसह रहात होते. ते वायरलेस

टेलिकम्युनिकेशनचा कोर्स करीत होतं. पुढे ते दिल्लीला युनियन मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशनमध्ये वायरलेस ॲडव्हायजर होते व नंतर युनोतही अनेक वर्षे काम केलं. या गोगट्यांनी अंभईकरांना दिल्लीचं तिकीट काढून पाठविलं. घटना समितीच्या उपस्थित सन्मान्य सभासदांमधील स्वत: काकासाहेब गाडगीळ, सत्यनारायणसिंह, केशवराव जेधे, डॉ. पट्टाभीसीतारामय्या, गोविंद वल्लभ पंत, आचार्य कृपलानी, सौ. सुचेता कृपलानी, दादा धर्माधिकारी आदी सभासदांनी धीर गंभीर आणि राष्ट्रीय भावना जागृत करणाऱ्या अंभईकरांच्या चालीवर अनुकूल अभिप्राय व्यक्त केला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या गीताच्या प्रचारासाठी ग्रामोफोन रेकॉर्ड काढण्याचा सल्ला देऊन ''आय वुईल बी द फर्स्ट मॅन टु पर्चेस युवर रेकॉर्ड'' असं आपल्या आसनावरून उठून आवर्जून सांगितलं. त्यानुसार अंभईकरांनी कोलंबिया ग्रामोफोन कंपनीमार्फत अंत्रोली घराण्याच्या सुप्रसिद्ध गायिका मोगूबाई कुर्डीकर यांची वन्देमातरम्‌ची रेकॉर्ड १९५० साली काढली. आचार्य कृपलानी यांनी चाल व गीत दोन्ही उत्तम असली तरी 'राष्ट्रगीत कोणतं व्हावं याबाबत पं. नेहरूंचं मत हाच अखेरचा शब्द ठरेल' असे बोलून दाखविलं. तर अच्युतराव पटवर्धन व एस. एम. जोशी यांनीही त्यांच्या सुरात सूर मिळविला.

## वन्देमातरम्‌नं काँग्रेस गाजली :

१९३८ च्या गुजराथमधील हरीपुरा आणि १९३९ च्या त्रिपुरी येथील ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वार्षिक खुल्या अधिवेशनात व अनेक काँग्रेसच्या महत्त्वाच्या बैठकीत जरी अंभईकर वन्देमातरम् गीत गायिले तरी हेच राष्ट्रगीत होण्यासाठी उभारलेली ही चळवळ त्यांनी केवळ काँग्रेस पुरतीच मर्यादित न ठेवता हिंदू महासभा, फॉरवर्ड ब्लॉक, कम्युनिस्ट, दलित पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, अखिल भारतीय नाट्य संमेलन, मराठी साहित्य संमेलन यांसारख्या राजकीय व सांस्कृतिक संघटनांनाही त्यांनी आपलंसं करून घेतलं. थोडक्यात सांगायचं तर त्या काळातील प्रत्येक क्षेत्रातील मान्यवर नेते वन्देमातरम् हे राष्ट्रगीत आणि त्याला अंभईकरांची मिश्र खंबावती रागातल चाल यांना मान्यता द्यायला तयार होते, अनुकूल होते. परंतु अखेर सर्व राजकीय नेत्यांनी पं. नेहरूंच्या शिफारशीला मान देऊन 'जनगणमन' या गीताला राष्ट्रगीताचा दर्जा देण्याचं ठरवलं. इतकी वर्षं इतका जिवाचा आटापिटा करूनही भारताच्या राष्ट्रगीताला आपण लावलेली चाल असण्याचा मान अंभईकरांना मिळू



शकला नाही आणि 'हेचि फळ काय मम तपाला' असं म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली. आता लंडनच्या इंडिया हाऊसमधील ग्रंथालयात नागपूरच्या 'महाराष्ट्र' साप्ताहिकात संपादक गोपाळराव ओगले यांनी प्रसिद्ध केलेली 'वन्देमातरम्'च्या अंभईकरांच्या स्वरलेखनाची प्रत अजूनही उपलब्ध आहे. शेवटी या गीताला दुय्यम स्थान दिल्यानं त्यातच थोडं समाधान मानावं लागलं. मात्र आता उशीर का होईना महाराष्ट्र विधानसभेची सुरुवात 'वन्देमातरम्'ने केल्याचं पाहून समाधान वाटलं.

असं असलं तरी ज्येष्ठ पत्रकार श्री. रामकृष्ण बाक्रे यांनी आपल्या लेखात लिहिल्याप्रमाणे ''अंभईकरांच्या या पराभवालाही एक प्रकारचं ऐतिहासिक मोल आहे. सर्व देशाची एकात्मता त्याचं राष्ट्रगीत आणि त्याची चाल यांचेमुळे सिद्ध होत असते. त्यामुळे एक तरुण मराठी गायक कोणत्याही प्रकारची अनुकूलता नसताना, स्वत:चे जलसे आणि पैसे यामागं न लागता, आसेतू हिमाचल वन्देमातरम् गात फिरतो, तो फक्त काँग्रेस वर्तुळातच रमत नाही, स्वातंत्र्यवीर सावरकरांची सभा असली तर तिथे जातो आणि साने गुरुजींची असली तर तिथेही जातो. या धडपडीला बराच काही अर्थ आहे आणि त्या धडपडीची नोंद भारतीय इतिहासात कुठेतरी असायला हवी.''

## शेवटी 'जनगणमन'हे राष्ट्रगीत ठरण्याचे कारण! :

वन्देमातरम् गीताला राष्ट्रगीताचा दर्जा तत्कालीन परिस्थितीत नाकारण्यामागे पंडितजींची भूमिका मुसलमानांच्या अनुनयाची होती असं सर्वसाधारणपणे म्हटलं जात असलं, तरी त्याबाबतचं स्पष्टीकरण पं. नेहरूंनी लोकसभेत केलेल्या एका भाषणात मिळतं. श्री. व्ही. सी. केशवराव यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पंडितजी म्हणाले होतं की, 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्रगीत आणि त्याची स्वरलिपी हे प्रश्न राष्ट्रध्वजाइतके महत्त्वाचे झाले आहेत. आपली संरक्षक दलं आणि परदेशातील वकिलाती इथे 'गॉड सेव्ह दि किंग' हे ब्रिटिशांचे राष्ट्रगीत पुढे चालू ठेवणं सर्वस्वी अयोग्य होतं. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेनं मध्यपूर्व आशियात आघाडी मारली त्यावेळी 'जनगणमन' याचीच राष्ट्रगीत म्हणून निवड केली होती. त्यामुळे ते स्वरलिपीबद्ध झालं होतं. आणि भारतातही मान्यता पावलं होतं. १९४७ च्या उत्तरार्धात न्यूयॉर्कला संयुक्त राष्ट्र संघाची महासभा भरली होती. त्यावेळी आपल्या प्रतिनिधी मंडळाला भारताचं राष्ट्रगीत कोणतं वाजवावं अशी विचारणा

करण्यात आली. मंडळाजवळ 'जनगणमन' या गीताची ध्वनिमुद्रिका उपलब्ध होती. तिच्यावरून तिथल्या वाद्यवृंदानं सराव करून ते गीत भारताचं राष्ट्रगीत म्हणून वाजवलं. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आम सभेने ते वादन ऐकून ते दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्याचा निर्वाळा दिला आणि अनेक राष्ट्रांच्या प्रतिनिधी मंडळांनी त्यांच्या स्वरलिपीची मागणी केली. तीही भारतीय प्रतिनिधी मंडळाने पुरविली.'

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता नंतर घटना समिती भारताचं राष्ट्रगीत कोणतं असावं याबाबत विचार करत असता पंडितजींनी 'जनगणमन'च्या बाजूनं कौल दिला असला तर नवल नाही. नेताजींनी त्या गीताला आझाद हिंद सेनेचं राष्ट्रगीत म्हणून आधीच मान्यता दिली होती. त्यामुळे स्वतंत्र भारतानं तेच आपलं राष्ट्रगीत ठरवलं, यात फारसं काही वावगं दिसत नाही.

## नाटक मंडळ्यांचा सहवास :

वन्देमातरम् हे अंभईकरांच्या ऐन उमेदीच्या काळातील एक उल्लेखनीय पर्व असल्यामुळे त्यासंबंधीची सर्व हकीकत सविस्तरपणे सलग अशी कथन केली. आता पुन्हा त्यांच्या आयुष्यक्रमाकडे वळू.

अंभईकरांचं कुटुंब मेहेकरहून प्रथम त्यांच्या थोरल्या बंधूंच्या नोकरीच्या ठिकाणी देवळी इथं आलं. पण तिथला निवास जेमतेम एक वर्षाचा झाला. त्यानंतर त्यांचं तीन नंबरचे वडील बंधू विश्वनाथ नागपूरला तार ऑफिसमध्ये नोकरीला होते त्यामुळे सर्वजण तिथं आली आणि शहरी जीवनाला सुरुवात झाली. महाल भागात फडणीसांच्या वाड्यात त्यांनी बिऱ्हाड थाटलं होतं. जवळच कावरे यांच्या भव्य वाड्याच्या अर्ध्या भागात 'महाराष्ट्र' साप्ताहिकाचे कार्यालय होतं आणि संपादक गोपाळ अनंत तथा दादासाहेब ओगले रहात. दुसऱ्या अर्ध्या भागात नाटक कंपन्या उतरायच्या. एकदा बलवंत संगीत नाटक मंडळी उतरली असता मास्टर दिनानाथ रियाज करीत होतं म्हणून विनायक खेळ सोडून एका बाजूला बसून ऐकत राहिला. पण इतर खेळगड्यांची जोराची दंगामस्ती सुरू झाल्यामुळे विनायकाला त्यांच्याकडेच हाकललं गेलं. पण या माकड सेनेचा धुमाकूळ 'महाराष्ट्रा'च्या कार्यालयात, अंगणात किंवा माडीवर चालला तरी दादासाहेब ओगले मात्र लिहिण्यात दंग झालेले असत. भाऊसाहेब तथा ग. त्र्यं. माडखोलकर हेही कानात पेन्सिल आणि कागद घेऊन दादासाहेबांकडे ये-जा करीत. त्यांनाही बालगोपालांचा त्रास वाटत नसे.



## पं. भातखंडे यांची भेट :

१९२४-२५ च्या दरम्यान अंभईकर कुटुंब महाल भाग सोडून सिताबर्डीवर टेकडी लाईनवर राहाण्यास आलं. कारण ही जागा बापूंच्या तार ऑफिसला जवळ होती. विनायकांचं शास्त्रीय संगीताचं शिक्षण पुढं गंधर्व नाटक मंडळींत असलेलं गायक नट कै. बाळासाहेब बक्षी यांच्या भारत गायन समाजात सुरू झालं ते इथंच. १९२६ मध्ये सुप्रसिद्ध संगीततज्ज्ञ व ग्रंथकार पं. विष्णु नारायण भातखंडे हे या गायन समाजातील प्रथम परीक्षा घ्यायला आले होते. त्या परीक्षेत विनायक उत्कृष्टपणे उत्तीर्ण झाला. रुंद कॉलरचा काळा लांब बंद कोट, उपरणं आणि पगडी अशा वेषात भातखंडे फारच रूबाबदार दिसत. परीक्षा झाल्यावर त्यांनी स्वतः विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह संगीतावर व्याख्यानही दिलं. व्याख्यानानंतर विनायकनं त्यांना विचारलं, ''सर, ताना घेताना तुमच्या डोक्यावरची पगडी कशी पडत नाही?'' यावर सर्व मुलं हसली. पण पंडितजींनी मात्र सांगितलं, ''तुझी शंका बरोबर आहे. पण संगीताची पगडी एकदा पक्की बसली की ती कधीही पडायची भीती नाही!'' पं. भातखंडे यांचा हा उपदेश विनायकानं आजतागायत आचरणात ठेवला आहे.

## मुंजीच्या दिवसांत स्वस्ताईची कमाल :

१९२६ साली विनायकाची मुंज झाली. त्यानिमित्त त्याचे सर्व आप्तेष्ट एकत्र जमले होतं. बापूंना ६० रु. पगार होता. पण स्वस्ताईची कमाल असल्यामुळे मुंज थाटात पार पडली. पोहे दारावर बैलगाडीतून विकायला यायचे. ते रुपयाला सोळा पायली मिळत. शुद्ध लोणी रुपयाला सोळा छटाक तर बैल घाणीचे शुद्ध तिळाचं तेल चार आणि शेर मिळायचं. घासलेटचा मोठा डबा पंधरा शेराचा अवघ्या दीड रुपयांत मिळायचा. धान्य, भाजीपाला, प्रवास-सर्व काही स्वस्त होतं. पण पैशाला मात्र फार मोल असे. दोन मैल अंतराला टांगेवाले एक आणा सवारी घेत! पण क्रांतिवीर बाबाराव सावरकर महालमधील ॲड. वि. वि. केळकर यांच्या घरापासून विनायकांच्या सिताबर्डीवरील घरी टांग्यातून न येता दोन मैलांचे अंतर पायी चालून येतं!

## बालपणी विनायकाने घोडेस्वार पोलिसांचा लाठीमार खाल्ला :

१९२७ साली भारताची स्वातंत्र्यचळवळ हळूहळू उग्र स्वरूप धारण करू लागली होती. त्यावेळी इंग्लंडहून सायमन कमिशन भारतात आलं. पण काँग्रेसनं या कमिशनवर

बहिष्कार पुकारला. नागपूर रेल्वे स्टेशनवर सायमन कमिशनचं आगमन होताच प्रचंड जनसमुदायानं 'गो बॅक सायमन', 'सायमन मुर्दाबाद', 'वन्देमातरम्' अशा घोषणा देऊन वातावरण दुमदुमून टाकलं. या जमावात विनायकही होता. घोडेस्वार पोलिसांनी जमावावर लाठीमार केला. एक घोडेस्वार पोलिस त्याच्याजवळ येऊन ''क्यूं वन्देमातरम् बोलता?'' असे प्रत्युत्तर देताच त्याला दंडुक्यानं मारलं आणि विनायकांच्या खांद्याला जखम झाली. सुरुवातीला विनायक 'जॉर्ज नृपा गावे सद्भावे वंदुनिया पदा' अशांसारखी पदे गात असे. तसेच 'आपले बादशहा पंचम जॉर्ज यांचा राज्याभिषेक १९१२ साली झाला असे पाठ करीत असे. खरोखरच ते आपले बादशहा आहेत असं त्याला वाटत असे. आणि स्वातंत्र्य, देशसेवा, राजकारण इ. शब्दही त्याच्या गावी नव्हते. पण या प्रसंगाच्या आधी नागपूरचे देशभक्त बॅ. मोरोपंत अभ्यंकर यांनी विनायकाला 'इंग्लंडच्या पंचम जॉर्ज बादशहाची गाणी म्हणत जाऊ नकोस. देवाची देशभक्तीपर, वन्देमातरम्सारखी गाणी म्हणत जा.' असा उपदेश केला होता. हा उपदेश मिळाल्यामुळे 'गो बॅक सायमन' अशा घोषणा देणाऱ्या जमावात किशोरावस्थेतील विनायक सामील झाला होता.

## पहिलं सुवर्णपदक :

१९२८ साली विनायकचे वडील बंधू शंकरनाना व मातोश्रींसह बद्रीनारायणाच्या तीर्थयात्रेला गेला. पहिला मुक्काम दिल्लीला जुन्या दिल्लीतल्या महाराष्ट्र स्नेहवर्धक समाजात होता. त्या दिवशी हनुमान जयंतीनिमित्त विनायकाच्या गायनाचा कार्यक्रम दिल्लीच्या टपाल आणि तार खात्याचे सुपरिटेंडंट रावसाहेब कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. श्रोत्यांना गाणं अतिशय आवडलं आणि आयुष्यात प्रथमच विनायकाला सुवर्णपदक मिळालं. त्याकाळी सोन्याचा भाव एका तोळ्याला ३२ रुपये होता. दिल्लीनंतर हरिद्वार, हृषिकेश, मथुरा, आग्रा, प्रयाग इ. ठिकाणी ही मंडळी गेली. मथुरेचा पेढा प्रसिद्ध असे. आजच्या वीस एक पेढ्यांचा एक पेढा केला तर होईल एवढा पेढा एका आण्याला मिळायचा! दही, दूध, बर्फी, रबडी वगैरे पदार्थ खूपच स्वस्त होतं.

## यमुनेतल्या कासवाची गंमत :

या यात्रेच्या वेळची एक आठवण अंभईकरांना आहे. ती म्हणजे मथुरेला



यमुनेवर सर्वजण स्नानाला गेले असताना आईनं सर्वांचे कपडे एका दगडावर धुवून दुसऱ्या दगडावर पिळे करून एकावर एक ठेवले. धुणं संपल्यावर ते कपडे काठावर वाळूवर वाळत घालायचे होतं. एवढ्यात तो पिळे ठेवलेला दगड पाण्यात हळूहळू सरकू लागला. सर्व मंडळी धावली आणि पुन्हा पाण्यात पडलेले ते सर्व पिळे त्यांनी मिळवले. ज्याच्यावर पिळे ठेवले होतं तो दगड नसून एक भलंमोठं कासव होतं.

## एकाच वर्षात अनेक परीक्षा :

यात्रेहून परत आल्यावर अंभईकरांना ग्वाल्हेरचे पंडित राजाभैय्या पूछवाले यांचं अमूल्य मार्गदर्शन लाभलं. या मार्गदर्शनामुळे पंडितजींच्या माधव संगीत विद्यालयाच्या हिंदुस्तानी संगीत शिक्षण पद्धतीचा अभ्यासक्रम ते पूर्ण करू शकले आणि 'संगीत सुधाकर' ही पदवी प्राप्त झाली. दीक्षान्त समारंभ नागपूरचे राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या हस्ते झाला. त्याचे वर्णन सुरुवातीला आलंच आहे. त्यावेळी अंभईकरांना अनेक सुवर्ण आणि रौप्य पदकं मिळाली आणि त्यांच्या संगीत क्षेत्रातील अधिकारावर शिक्कामोर्तब झालं. तरीही त्यांची संगीतसाधना चालूच राहिली.

नागपूरात त्यावेळी असलेल्या दुसऱ्या एका संगीत विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी अंभईकरांना स्वत:कडे ओढण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरून अंभईकरांचे गुरू आणि या मुख्याध्यापकांचं वितुष्ट येऊन प्रकरण मुद्यावरून गुद्यावर येऊन ठेपलं. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक झालेले कै. माधवराव गोळवलकर गुरुजी यांनी प्रत्यक्ष सांगितलेल्या माहितीनुसार या दोन गुरुंची खेटराखेटरी होऊन नंतर कायमचा छत्तीसाचा आकडा झाला.

याच वर्षी (१९२९) विनायक नागपूर बोर्डाची आठवीची हायस्कूल एन्ट्रन्स अँड स्कॉलरशिपची परीक्षा आणि मुंबईच्या जे. के. स्कूल ऑफ आर्टस्च्या एलेमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. यांत चौदापैकी दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नागपूरचे प्रसिद्ध उद्योगपती श्री. बाबूराव धनवटे आणि अंभईकर. त्याचप्रमाणे संगीताची शेवटची परीक्षाही प्रथमश्रेणीत तो याच वर्षी उत्तीर्ण झाला. विशेष म्हणजे लहान घर, उजेडाकरता घासलेटच्या चिमण्या व कंदिलाचा वापर आणि त्यात दोन वहिन्यांची बाळंतपणं. अशा परिस्थितीत त्यानं हे यश संपादन केलं होतं. प्रथम श्रेणीत आलेल्यांचा आजच्या सारखा मंत्र्यांकडून सत्कार करण्याची प्रथा त्याकाळी नव्हती! आठवीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल आईनं

विनायकाला कलिंगडची एक मोठी फोड दिली! तो खरा आनंदाचा क्षण त्याला वाटला.

नागपूरच्या युनिव्हर्सिटी हॉलमध्ये श्री. गोविंदराव टेंबे यांचा हार्मोनियम वादनाचा आणि विनायकाचा नाट्यसंगीताचा असा संयुक्त कार्यक्रम झाला. श्रोत्यांनी हॉल भरून रस्त्यावर तुफान गर्दी होती. विनायकाची लोकप्रियता वाढत जाऊन मॉरीस कॉलेज, रॉबर्टसन मेडिकल कॉलेज (सध्याचे इंदिरा मेडिकल कॉलेज), टिळक राष्ट्रीय विद्यालय, न्यू इंग्लिश हायस्कूल, सायन्स कॉलेज, सी. पी. बेरार कॉलेज अशा नागपुरातील अनेक शाळा, कॉलेजात व संस्थांत त्यांच्या गाण्याचे कार्यक्रम होऊ लागले.

## रेडिओतील पहिला कार्यक्रम १९ व्या वर्षी :

१९३१ साली मुंबईच्या इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसकडून (आजची आकाशवाणी) अंभईकरांना अनपेक्षितपणे एक पत्र येऊन दि. ८ ऑगस्ट १९३१ रोजी रात्री ९ वाजून २० मिनिटांनी त्यांचा कार्यक्रम ठरविला असल्याचं कळविण्यात आलं. त्याकाळी रेडिओवर गाणं म्हणजे एक प्रतिष्ठेचा नि कुतूहलाचा विषय मानण्यात येई. आणि कलावंतांचा तर तो फार मोठा मान समजला जाई. अंभईकर या कार्यक्रमाकरता शाळेतून चार दिवसांची सुट्टी घेऊन गेले होतं. त्यांच्या घरी रेडिओ नसल्यामुळे कार्यक्रमाच्या दिवशी त्यांच्या घरची सर्व मंडळी रात्री दुसऱ्या एका ओळखीच्या घरी त्यांचं रेडिओतलं गाणे ऐकायला गेली होती. घरात आणि अंगणात मिळून दीडएकशे श्रोते त्यांचा रेडिओवरचा कार्यक्रम ऐकायला जमले होतं. (नंतर २२ वर्षांनी अंभईकर मुंबई आकाशवाणीच्या सेवेत आले. त्यासंबंधी पुढे येईलच) अंभईकर नागपूरला परतल्यानंतर त्यांच्यावर आप्तेष्ट मित्रांकडून कौतुकाचा नि अभिनंदनाचा वर्षाव झाला.

## स्वदेशीची चळवळ आणि टोपीची किमया :

स्वातंत्र्यप्राप्तीसाठीची चळवळ सुरूच होती आणि १९३२ साली विदेशी कपड्यांच्या होळ्या करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला. अंभईकरांनी या कार्यक्रमात सक्रिय भाग घेतला. असाच एक जाहीर होळीचा कार्यक्रम सीताबर्डीच्या हमरस्त्यावर चालू असताना, बाजूच्या एका घरात अंभईकरांचं गाणं संपत आलं होतं. उपस्थितांमध्ये



धर्मवीर डॉ. मुंजे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार, राष्ट्रसंत श्री पाचलेगांवकर महाराज अशी आदरणीय मंडळी होती. कार्यक्रम संपल्यावर डॉ. हेडगेवार अंभईकरांना म्हणाले, 'बाळ, किती गोड गायिलास तू! पण तुझ्या डोक्यावरची ही काळी फर कॅप विदेशी आहे. ती पुन्हा घालू नकोस.' एवढे सांगूनच ते थांबले नाहीत तर स्वतःच्या हाताने त्यांनी अंभईकरांची टोपी उचलून रस्त्यावर पेटलेल्या होळीत फेकून दिली. या घटनेचा उल्लेख पूज्य गोळवलकर गुरुजींनी लिहिलेल्या डॉ. हेडगेवारांच्या चरित्रात आवर्जून करण्यात आला आहे.

## मुंबईच्या संगीत परिषदेत पहिला कार्यक्रम :

मुंबईच्या ब्लॅव्हाट्स्की हॉलमध्ये १९३३ साली भरलेल्या संगीत परिषदेत गाण्याचं निमंत्रण अंभईकरांना आलं. सकाळच्या मैफलीत पंडित ओंकारनाथ ठाकूर आणि हिराबाई बडोदेकर यांच्याबरोबर गाण्याची संधी अंभईकरांना मिळाली. पहिल्या रांगेत धरमपूरचे महाराज, डॉ. मो. बा. वेलकर, बॅरिस्टर मुकुंदराव जयकर इ. बडी मंडळी बसली होती. त्यांनी अंभईकरांच्या गाण्याला दाद दिली. कार्यक्रमानंतर पंडित ओंकारनाथ ठाकूर यांनी अंभईकरांचा हिंडोल फार आवडल्याचं सांगितलं आणि घरी येण्याचं आमंत्रण दिलं. पंडितजींच्या घरी आलेल्या छोट्याशा मैफलीत अंभईकरांनी हिंडोल, तोडी, भूपाल तोडी गायिले. पंडितजींना स्फूर्ती येऊन ते मीराबाईंचं भजन भैरवीत गाईले. पुढे ४७-४८ मध्ये पंडितजींच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त शेअर ब्रोकर वालजीभाई पोरेचा यांनी ६१ हजारांची थैली दिली व अंभईकरांनी कोलंबिया कंपनीत पंडितजींची लाँग प्लेईंग रेकॉर्ड काढली.

## ग्रामोफोन कंपनीतील पहिलं ध्वनिमुद्रण :

पुढल्याच वर्षी (१९३४) अंभईकरांची पहिली ग्रामोफोन रेकॉर्ड कोलंबिया कंपनीनं काढली ती हिंडोल रागाचीच. हिंडोलव्यतिरिक्त सरपरदा, गौडमल्हार, बागेश्री, भीमपलास या रागांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या. नंतर एच.एम.व्ही.ने ग. दि. माडगूळकर, राजा बढे यांची गीत रेकॉर्ड करून डॉ. वि. भि. कोलते यांनी लिहिलेल्या 'लव्हाळी' या काव्यसंग्रहातील भावगीतांच्या रेकॉर्डही काढून वऱ्हाडी गीतांना वाचा फोडली. या रेकॉर्डिंगसाठी अंभईकर मुंबईला आलं तेव्हा त्यांचा बोरीबंदर समोरील एम्पायर हिंदु हॉटेलात महिनाभर मुक्काम होता. रेकॉर्डिंगचे काम संपल्यावर अंभईकरांना

त्यांचा झालेला खर्च आणि वर ६०० रुपये बिदागी मिळाली. आयुष्यात प्रथमच एवढे पैसे एकरकमी मिळाल्यामुळे अंभईकरांचा आनंद गगनात मावेना. तो साजरा करण्याकरिता त्यांनी एका पुस्तकाच्या दुकानात जाऊन उत्तरप्रदेशातील हासरथ इथे छापून प्रसिद्ध होणारी श्रीमद्‌भगवतगीता विकत घेतली. पुस्तकाची किंमत दीड आणाच होती. पण सुखाचे प्रसंगी गीतेची आठवण होणाऱ्या अंभईकरांच्या मनाचा धार्मिक कल यावेळी प्रगट झाला. (नंतर २७ वर्षांनी या स्वभावानं एकदम उचल खाल्ल्याचा प्रत्यय आपल्याला यथावकाश येईलच.)

हॉटेलचे मालक कै. तात्या देसाई यांना कलावंतांचं फार कौतुक असे. त्यांनी अंभईकरांकडून पूर्ण महिन्याचा राहण्या-जेवण्याचा खर्च मुळीसुद्धा घेतला नाही.

हिंडोल रागातील पहिल्या ग्रामोफोन रेकॉर्डचं पार्सल नागपूरला पोस्टमननं आणून देताच ते फोडण्याची सर्वांना घाई झाली. शेजारीपाजारीही जमले. घरी ग्रामोफोन होता. त्यामुळे लगेच ही ध्वनिमुद्रिका लावली. सभोवती जमलेले सर्व श्रोते ती एकाग्रतेने ऐकत होतं. मधूनमधून अंभईकरांकडे 'हाच का तो गाणारा' या मुद्रेनं व कौतुकानं पहात होतं.

याच वर्षी अंभईकर मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.

### गांधीजींच्या आश्रमातील गायन :

अंभईकरांनी नागपूरला १९२६ साली महात्माजींना संपूर्ण वन्देमातरम् गीत ऐकवलं होतं. त्यावेळी गांधीजींनी त्यांचं कौतुक करून आशीर्वादही दिला होता. महात्माजींना पुन्हा गाणं ऐकविण्याचा योग त्यांना ९ वर्षांनी ७ ऑगस्ट १९३५ रोजी लाभला. हा कार्यक्रम शेठ जमनालाल बजाज यांनी वर्ध्याच्या मगनवाडीतील गांधी आश्रमात घडवून आणला. अंभईकर आपले वडील बंधू शंकरनाना यांना तबला वाजविण्यासाठी बरोबर घेऊन वर्ध्याला संध्याकाळी पोहोचले. सायंकाळच्या गंभीर आणि शांत वातावरणात शिस्तबद्धतेनं सर्व मंडळी गच्चीवर प्रार्थनेसाठी जमली. प्रार्थना संपल्यावर पाच मिनिटात कार्यक्रम सुरू करण्याची आणि पंधरा मिनिटांनी तो संपविण्याची अशा दोन्ही सूचना व्यवस्थापकांनी अंभईकरांना दिल्या. हवा ढगाळ, पावसाळी यामुळे गच्चीवरच्या उघड्या हवेत गाणं आवाजाच्या दृष्टीनं शक्य नाही असं अंभईकरांनी व्यवस्थापकांना सांगून त्यांना खालच्या हॉलमध्ये गाण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली. यावर ते म्हणाले, तुम्ही जवान पोरं समुद्रावर, पहाडावर



कुठंही गायला शिकलं पाहिजे. त्यावर अंभईकर उत्तरले, 'मी कुणी पोवाडेवाला शाहीर नाही किंवा कीर्तनकारकही नाही. गाणं बंदिस्त जागेतच व्हायला पाहिजे.' त्यावर महादेव देसाई यांनी सांगितलं की, आज गर्दी जास्त असल्यामुळे खाली बैठक घेणं कठीण आहे. पाच मिनिटं यातच गेली. महात्माजींचा चरखा चालूच होता. पण अंभईकरांची अडचण त्यांच्या लक्षात आली आणि ताबडतोब त्यांनी खालच्या मजल्यावर कार्यक्रमाची व्यवस्था करायला सांगितलं. त्याप्रमाणे तिथे काळ्या, पांढऱ्या घोंगड्या अंथरून बैठक तयार करण्यात आली. इतक्यात पावसाची भुरभुरही सुरू झाली. खालच्या हॉलमध्ये अंभईकरांनी ठरलेल्या पंधरा मिनिटांत संध्याकाळचे दोन राग गायिले. पण बापूजींनी बागेश्री राग गायला सांगितले म्हणून त्यांनी 'चलत चलत मथुरा' ही प्रसिद्ध चीज म्हटली. यानंतर काफी आणि बागेश्री रागात काय फरक आहे, असे गांधीजींनी विचारल्यावरून दोन्ही रागांची सरगम सांगून, प्रत्यक्ष गाऊनही त्यातील फरक स्पष्ट केला. नंतर मीराबाईंचे 'पग घुंगरू', संत कबिरांचे 'भजो रे भैय्या राम गोविंद हरी' आणि शेवटी रामदासांची 'नैननमें रघुवीर' ही भैरवी गाऊन पंधरा मिनिटांऐवजी तासभर चाललेला कार्यक्रम त्यांनी संपविला. इथे वाहवा, बहोत अच्छे, क्या बात है वगैरेंची बरसात नव्हती. पण सर्व उपस्थितांना कार्यक्रम मनापासून आवडल्याचं त्यांच्या मुद्रांवरून स्पष्ट दिसत होतं.

### गांधीजींचा मनमोकळा स्वभाव :

उपस्थितांमध्ये सरदार वल्लभभाई पटेल, मिस स्लेड ऊर्फ मीराबेन, गंगाधरराव देशपांडे, मणिलाल गांधी (बापूजींचे नातू) महादेव देसाई इ. मंडळी प्रमुख होती. सर्वजण अगदी शांत चित्तानं रसग्रहण करीत होतं. महात्माजी मधूनच चरखा थांबवून जिज्ञासू नजरेनं पहात होतं.

कार्यक्रमानंतर गांधीजींनी अंभईकरांची कौटुंबिक चौकशीही केली. गाण्याचं शिक्षण कुठं घेतलं, पुढे काय करणार, घरची स्थिती कशी आहे, आईवडील आहेत का इ. अनेक घरगुती प्रश्नोत्तरं झाली. नंतर गांधीजींनी 'रवींद्र संगीत शिकण्याची इच्छा असल्यास शांतिनिकेतन मध्ये रहा. मी गुरुदेव टागोरांना पत्र देईन. तसेच परदेशात भारतीय संगीताचा प्रसार करणार असल्यास आपण शक्य ती मदत करू.' असे आश्वासनही दिले. एवढ्यावरच न थांबता गांधीजींनी स्वतःच्या हस्ताक्षरात अंभईकरांना एक आशीर्वादपत्रही लिहून दिलं. हा अमूल्य ठेवा अंभईकरांनी अजून

जतन करून ठेवला आहे.

कार्यक्रम संपेपर्यंत रात्र झाली. मगनवाडी वर्धा स्टेशनपासून फार दूर असल्यामुळे रात्रीच्या वेळी टांगा वगैरे वाहन मिळत नसे. पावसाची रिपरिप सुरूच होती. ही अडचण ओळखून गांधीजी म्हणाले आता इथेच मुक्काम करा आणि सकाळी नागपूरला जा. पण अंभईकरांचे वडील बंधू शंकरनाना यांनी 'आपले सकाळचं लौकरचं ऑफिस आहे म्हणून आताच जायला हवं', असे सांगितले तेव्हा गांधीजींनी भाईजींची (सरदार पटेलांची) गाडी स्टेशनवर जायला दिली.

गांधीजींसारख्या जगद्वंद्य पुरुषोत्तमासमोर यशस्वीरीत्या गायनाचा कार्यक्रम करून अंभईकर नागपूरला परत आले, तेव्हा त्यांचं कौतुक करायचं सोडून घरच्या मंडळींनी त्यांची हजेरीच घेतली. वडील बंधू म्हणाले, की भले ते मोठे असतील पण माझ्या सरकारी नोकरीवर तुझ्यामुळे गदा आली तर? आई म्हणाली, 'देशभक्ती करून, मोठमोठ्या पुढाऱ्यांना गाणं ऐकवून काय मिळणार आहे? तुला कोणी मुलगी देणार नाही आणि नोकरीही मिळणार नाही.' ही सरबत्ती ऐकून अंभईकर स्तंभितच झाले आणि काळमहिमा असा की त्यांनाही तेव्हा आपली चूक झाल्यासारखंच वाटले.

## सुभाषबाबूंनी शब्द बदलला :

गुजराथमधील हरिपुरा इथे भरणाऱ्या १९३८ च्या काँग्रेसच्या महाधिवेशनाचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस होतं. त्यांना भेटण्याची अंभईकरांना फार इच्छा होती. पण नागपूर स्टेशनच्या गर्दीत भेट कशी होणार? आपल्याला पडलेला हा प्रश्न अंभईकरांनी आपले मित्र 'हितवाद'चे वार्ताहर श्री. गोखले यांना सांगितला. त्यांनी सुचवलेल्या युक्तीप्रमाणे अंभईकर व ते सुभाषबाबू येणार असलेल्या दिवशी नागपूरच्या आधीच्या कामठी स्टेशनला दुपारीच गेले आणि कलकत्ता मेल येताच दोघे सुभाषबाबूंच्या डब्यात चढले. नागपूर स्टेशन येईपर्यंत गोखले यांनी सुभाषबाबूंची निवांतपणे छोटीशी मुलाखत घेतली तर अंभईकरांनी बरोबर नेलंली ओळखपत्रं दाखवून वन्देमातरम्‌संबंधी चर्चा केली. सुभाषबाबूंनी अंभईकरांना हरिपुरा काँग्रेसला येवून तिथे त्यांनी लावलेल्या चालीवर वन्देमातरम् गीत गायला सांगितले. त्याप्रमाणे अधिकृत निमंत्रणही आलं. नागपूरातील कार्यक्रम उरकून सुभाषबाबू परत गेले. नंतर हरिपुरा येथे अंभईकर गेले आणि सुभाषबाबूंना भेटले. तेव्हा ते म्हणाले, ''माय ओन पार्टी फ्रॉम कलकत्ता इज



कमिंग टू सिंग वन्देमातरम्'' ते ऐकून अंभईकर फार निरुत्साही झाले. त्यांनी गांधीजींकडे जाऊन स्वत:वर झालेल्या अन्यायाची माहिती त्यांना दिली. महात्माजींना कोणावर अन्याय झालेला खपत नसे. त्यांनी अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष दरबार गोपाळदास यांना बोलावून सांगितलं की, बाबूजींनी यांना मुद्दाम राष्ट्रगीत गाण्यासाठी बोलावून नंतर मात्र नकार दिला. तेव्हा गोपाळदास यांनी तीन दिवसांपैकी पहिल्या दिवशी सुभाषबाबूंच्या पार्टीचं आणि दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी अंभईकरांचे वन्देमातरम् असा कार्यक्रम ठेवला.

## गांधीजींची न्यायप्रियता :

अंभईकरांच्या गांधीजींच्या सहवासाविषयी सर्व काही सलगपणे कथन करून मगच त्यांच्या चरित्राकडे वळू. १९४४ साली महात्माजींचा मुक्काम मुंबईच्या जुहू येथील सुंदरबनमध्येच होता. दुसऱ्या महायुद्धाचा तो काळ होता. गांधीजींनी मौन धारण केलं होतं. पण त्यांच्या मन:स्वास्थ्याकरिता आणि मनोरंजनाकरता रोज थोडा वेळ गायन वादनाचा कार्यक्रम ठरवलेला होता. हा कार्यक्रम ठरवला त्यावेळेस तबलजीकरिता अंभईकर श्री. शंकरराव व्यास यांचेकडे गेले असताना तबलजी मिळण्याऐवजी त्यांनी सुनावले की, 'अरे त्या म्हाताऱ्याला गाण्याचे काय कळते? तबला वगैरे कशाला पाहिजे, तसंच म्हणा.' शेवटी वैशंपायन नावाच्या एका तबलजीला विनंती केली असता, एवढ्या थोर नेत्यासमोर आपल्याला अंभईकरांबरोबर वाजवायला मिळतं, याचाच त्यांना आनंद झाला. याच दिवशी बडे गुलाम अली खाँ साहेबांचाही कार्यक्रम ठेवला होता. अंभईकर वेळेवर पोहोचले पण खाँ साहेबांना यायला विलंब झाल्यामुळे व्यवस्थापकांनी अंभईकरांना आपला कार्यक्रम सुरू करण्याची विनंती केली. अंभईकरांच्या गायनाला सुरुवात होऊन १०-१५ मिनिटं झाली असतील एवढ्यात खाँ साहेब आले. आपलं गाणं लगेच थांबवून अंभईकरांनी खाँ साहेबांना उचित मान दिला आणि खाँ साहेबांनी गायला सुरुवात केली. त्यांचं गाणं संपल्यानंतर खाँ साहेब आणि अंभईकर गांधीजींना वंदन करून परत जायला निघाले. एवढ्यात गांधीजींनी अंभईकरांचा हात धरून त्यांच्या हातात एक कागदाचा तुकडा दिला. त्यावर त्यांनी गुजराथीत लिहिले होतं, 'तुमचे गाणे पूर्ण होऊ न शकल्यामुळे तुमच्यावर अन्याय झाला आहे. पुढील आठवड्यात अवश्यं येऊन मला पूर्ण गाणं ऐकवा!' गांधीजींची न्यायबुद्धि किती जागृत होती हे हरिपुरा काँग्रेसच्या प्रसंगानंतर याप्रसंगी

पुन्हा अंभईकरांच्या प्रत्ययास आलं. कार्यक्रमानंतर बाहेर पडताच वार्ताहरांनी गांधीजींशी तुमचं काय बोलणं झालं म्हणून विचारता ते म्हणाले, "No political songs. We entertained Bapuji with singing some bhajans only.'

नंतरच्या आठवड्यात अंभईकरांचे महात्माजींसमोर तासभर गायन झालं. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांनी 'वैष्णव जन तो तेने कहिये' हे त्यांचं आवडतं गीत म्हणायला सांगितलं. अंभईकरांना ते पाठ नव्हतं म्हणून त्यांनी शरमिंदे होऊन बापूजींना तसं सांगितलं. लागलीच बापूजींनी मांडीखाली ठेवलेलं 'आश्रम भजनावली' हे छोटं पुस्तक काढून त्यातील 'वैष्णवजन' हे पद असलेलं पान त्यांच्यापुढे ठेवलं. अंभईकरांनी नंतर ते गीत उत्तमप्रकारे गाऊन शिवाय सूरदास, मीराबाई, कबीर इ. संतांच्या रचना गांधीजींसमोर पेश केल्या. गांधीजींवर अंभईकरांच्या गाण्याचा इतका प्रभाव पडला की आश्रमातील संगीत प्रार्थना विभाग सांभाळावा अशी इच्छा त्यांनी प्रकट केली.

## गांधीजींची स्थितप्रज्ञता :

एकदा महात्माजी काशी येथील गीता मंदिराच्या उद्घाटनाला जाण्यासाठी वर्ध्याहून ग्रँड ट्रंक एक्स्प्रेसनं निघाले. अंभईकरांना त्याच दिवशी दिल्लीला जायचं होतं. म्हणून त्याच गाडीमध्ये नागपूर स्टेशनवर गांधीजींच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात चढले. इटारसीपर्यंत त्यांना गांधीजींचा सहवास मिळाला. कोणत्याही स्टेशनवर गाडी आली की, 'महात्मा गांधी की जय'च्या घोषणांनी सारं वातावरण दुमदूमून जायचं. खिडकीतून हात बाहेर काढून 'हरिजन फंडके लिये' अशी मागणी करताच पैशाचा अक्षरशः पाऊस पडायचा. इटारसी येईपर्यंत रात्रीचे साडे नऊ वाजले. प्यारेलालजींनी घंटी वाजवून बापूजींची झोपण्याची वेळ झाल्याचा इशारा दिला. त्यावेळी अंभईकर म्हणाले की, ''नौखालीचं हत्याकांड आणि इतर प्रक्षोभक घटनांमुळे सारा देश पेटला आहे. तेव्हा त्यांना झोप कशी येणार?'' यावर मणिलालजींनी उत्तर दिलं, 'बापूजी गीतेचं नुसतं पारायण करीत नाहीत. स्थितप्रज्ञ माणसाची लक्षणं स्वत: आचरतातही.' आणि खरोखरच बापूजी शांतपणे झोपी गेले.

गांधीजींच्या स्थितप्रज्ञतेचा प्रत्यय देणारं आणखी एक उदाहरणही अंभईकरांच्या समक्ष घडलं. संत पाचलेगांवकर महाराज गांधीजींच्या भेटीसाठी वर्ध्याच्या आश्रमात आलंहोतं. हिंसा-अहिंसेवर दोन दिवस चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी चर्चेच्या समारोपाच्या वेळी जमानालाल बजाज यांच्या आग्रहाखातर महाराजांनी महात्माजींच्या



गळ्यात विषारी सापांचे हार घातले. सरदार पटेल, शंकरराव देव, डॉ. हेडगेवार, गंगाधरराव देशपांडे इ. सर्व उपस्थित मंडळींना भीती वाटणं साहजिक होतं. पण स्थितप्रज्ञ महात्माजींनी यत्किंचितही न डगमगता मांडी घालून त्यांचं सुप्रसिद्ध मधु स्मित करीत ३-४ मिनिटं ते हार गळ्यात ठेवून घेतले. दुर्दैवाने तेव्हा छायाचित्रकार नव्हता आणि छायाचित्रांना तितके महत्त्वही नव्हते.

## एकेकाचा स्वभाव :

गांधीजी कोणावर कधी कसली सक्ती करीत नसत. अंभईकरांना हा त्यांच्या स्वभावाचा आणखी एक विशेष जाणवला. त्यांच्या भेटीच्या वेळी अंभईकरांच्या अंगावर काळा कोट आणि डोक्यावर काळी टोपी असायची. पण तू गांधी टोपी घाल किंवा खादी वापर असं चुकूनही त्यांनी म्हटलं नाही. अंभईकरांना गांधीजींच्या स्वभावाचं हे वैशिष्ट्य उल्लेखनीय वाटतं. गांधीजींच्या व्यक्तित्त्वाचा हा विशेष त्यांच्या लक्षात यायलासुद्धा एक प्रसंग घडला होता. प्रबोधनकार ठाकरे यांना भेटायला अंभईकर एकदा त्यांच्या घरी गेले असता त्यांनी गांधी टोपी घातली होती. पण प्रबोधनकारांची भेट होताक्षणी ते म्हणाले, 'हे शिप्तर कशाला डोक्यावर घातलं आहे?' एवढंच नव्हे तर प्रबोधनकारांनी ती टोपी अंभईकरांच्या डोक्यावरून काढून भिरकावून दिली.

## डॉ. राजेंद्रप्रसादांचे प्रशंसापत्र :

गांधीजींचा परिचय वाढला असल्यामुळे त्यांच्या वर्ध्याच्या आश्रमात येणाऱ्या इतर काही वरिष्ठ नेत्यांशीही अंभईकरांचा संबंध आला. त्या काळात ते जवळजवळ दर आठवड्याला वर्ध्याला जात असत. शनिवारी सकाळची शाळा आटोपून संध्याकाळी वर्ध्याला पोहोचायचं आणि रविवारी रात्री नागपूरला येऊन सोमवारी सकाळी शाळेत हजर रहायचं असा त्यांचा क्रम असे. कधी रेल्वेने तर कधी कोणी ओळखीच्या नेत्याच्या मोटारीने प्रवास होई.

१९३९ साली पावसाळ्याच्या दिवसात असंच एकदा ते वर्ध्याला गेले असताना पुढे स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती झालेले डॉ. राजेंद्रप्रसाद मगनवाडीतच होते. त्यांचा दमा उसळला होता आणि अंथरूणावर पडल्यापडल्याच ते पत्रव्यवहारादी कामकाज पहात होतं. एक दिवस त्यांना बरं वाटावं या हेतूनं तिथं उपस्थित असलेले

आचार्य दादा धर्माधिकारी यांनी त्यांना अंभईकरांचं गाणं ऐकविण्याचं ठरविलं. त्याच वेळी तिथं असलेले मीमांसाभूषण पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे यांनी तंबोरा, पेटी, तबला वगैरेंची उत्तम व्यवस्था केली. पण ते डिस्ट्रिक्ट अॅन्ड सेशन जज्ज म्हणजे सरकारी अधिकारी असल्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत. राजकुमारी अमृत कुंवर, मणीबेन पटेल (सरदार वल्लभभाईंच्या भगिनी), धोत्रे, देव इ. मंडळी उपस्थित होती. अंभईकरांनी बाबूजींना शास्त्रीय संगीत, मीराबाई, कबीराची भजनं आणि वन्देमातरम् ऐकविलं. त्यांचा आवाजही त्या दिवशी चांगला लागला होता. राजेंद्रबाबू फार खूष झाले आणि म्हणाले "मला माझ्या लहानपणची आठवण झाली. पाटण्याला असताना मला शास्त्रोक्त गाणं शिकवायला एक गुरुजी यायचे. त्यामुळे २०-२५ रागांची मला चांगलीच माहिती झाली होती." एवढं सांगून त्यांनी त्यांची जुनी वही दाखविली. त्यात अनेक रागांच्या चिजा, लक्षणं गीतं, सरगम, स्वरविस्तार इ. माहिती दिलेली होती. अंभईकरांनी ती वही पाहून त्यांना परत दिली. तेवढ्या वेळात बाबूजींनी त्यांना स्वतःच्या अक्षरात एक प्रशंसापत्र लिहून तयार केलं होतं ते दिलं. गांधीजींची शास्त्रीय संगीताबद्दलची माहिती वरवरची होती; पण डॉ. राजेंद्रप्रसाद यांना मात्र शास्त्रीय संगीताची जाण उत्तम प्रकारची होती, हे अंभईकरांच्या लक्षात आलं.

## जे. कृष्णमूर्ति :

याच वर्षी नागपूरला न्या. डॉ. भवानीशंकर नियोगी यांच्या बंगल्यावर थिऑसॉफिस्ट कॉन्फरन्स भरली होती. प्रख्यात तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती अध्यक्षस्थानी होतं. याप्रसंगी अंभईकरांच्या गायनाचा कार्यक्रम योजिला होता. त्यांना अंभईकरांचं गाणं विशेषतः वन्देमातरम् राष्ट्रगीत पसंत पडून ह्यांनी अंभईकरांना 'राष्ट्रीय गायक - National Musician' ही पदवी दिली.

## प्रतिष्ठित गायकांचा परिचय :

मेहेकर आणि नंतर देवळीहून नागपूरला येऊन अंभईकरांना सुमारे पंचवीस वर्षं झाली होती. या काळात त्यांनी संगीत कलेची अत्यंत एकनिष्ठेने उपासना केली. मुंबई पुण्याकडचे मा. कृष्णराव, विनायकबुवा पटवर्धन, नारायणराव व्यास, निस्सार हुस्सेन खाँ, अब्दुल करीम खाँ, सैगल, हिराबाई बडोदेकर, मल्लिकार्जुन मन्सूर,



गंगूबाई हनगल, पं. ओंकारनाथ यांच्यासारखे श्रेष्ठ कलावंत जलशाच्या निमित्तानं नागपूरला येत, तेव्हा त्यांचं गाणं तर अंभईकर ऐकतच पण त्यांची आवर्जून भेट घेऊन ते त्यांना आपल्या घरी बोलवित आणि त्यांचा योग्य तो आदर-सत्कार करीत असत. शक्य तर आपलं गाणंही त्यांना ऐकवीत असत आणि आपले दोष काय आहेत, आणखी प्रगती कशी करावी इत्यादी मार्गदर्शन त्यांच्याकडून मिळवीत. या नामवंत गायकांचा परिचय झाल्यामुळे नंतर त्यांच्या बैठकीला तंबोऱ्याची साथ आणि कंठसाथ करायला ही मंडळी त्यांना बोलवीत आणि अंभईकरांना बरंच काही शिकायला मिळे.

गायनाव्यतिरिक्त नागपूरला येणाऱ्या नाटक कंपन्यांची संख्याही बरीच होती. बलवंत संगीत नाटक मंडळी, गंधर्व नाटक मंडळी, ललित कलादर्श संगीत नाटक मंडळी, शंकरराव सरनाईकांची यशवंत संगीत मंडळी, केशवराव दात्यांची महाराष्ट्र नाटक मंडळी, भाटेबुवांची नाट्यकला प्रवर्तक मंडळी, आर्यप्रबोध नाटक मंडळी यांच्यासारख्या प्रथितयश नाटक कंपन्या वरचेवर नागपूरला येऊन बराच मुक्काम ठोकून असत. या सर्व कंपन्यांतील गायक नटांच्या ओळखी अंभईकरांनी करून घेतल्या होत्या. बालगंधर्व आणि मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्याविषयी तर त्यांच्या मनात भक्तिभावच निर्माण झाला होता. या सर्व नटांकडून नाट्यसंगीताचं रहस्य त्यांनी आत्मसात करून घेतलं. त्यातल्या अनेक कलावंतांनी अंभईकरांना नागपूर सोडून मुंबईला स्थायिक होण्याचा सल्ला दिला. सुमारे साठ वर्षांपूर्वी नागपूर शहर तसं मागासलेलंच होतं आणि आपली संगीत क्षेत्रातील प्रगती इथंच राहिलं तर खुंटेल असे अंभईकरांना जाणवू लागलं होतं. वाढत्या वयाच्या मुलांना जुने कपडे तोकडे होणार, हे ठरलेलंच.

# पंखात बळ आलं



## नागपूरहून मुंबईला स्थलांतर :

पक्षाच्या पंखात बळ आलं आणि त्याचा आत्मविश्वास वाढला म्हणजे त्याला दूरवर भरारी मारावी असं वाटणं स्वाभाविक आहे. अंभईकरांना आता नागपुरातील संगीत क्षेत्र आपल्या विकासाकरता अपुरं वाटू लागलं होतं. त्यामुळे आणि एकूणच आपल्या आयुष्याचा विचार करून त्यांना खुणावीत असलेल्या भविष्य संकेताच्या पूर्तीकरता त्यांनी मुंबईला स्थलांतर करण्याचा काहीसा धाडसी निर्णय घेतला. धाडसी अशाकरता म्हणायचं की, मुंबईला कायम वास्तव्याला जायचं म्हणजे तिथं निदान रहाण्या-जेवण्याची सोय तर हवी! पण अंभईकरांच्या गोतावळ्यापैकी कोणी मुंबईत नव्हतं. शिवाय संगीत कार्यक्रमांवर थोडेफार पैसे मिळाले तरी उत्पन्नाचं नियमित असं साधन नव्हतं. त्यामुळे त्यांची आई, दोन बहिणी आणि सात भावांचा सुरुवातीला या स्थलांतराला विरोध होता. परंतु औपचारिक शिक्षण मॅट्रिकच्या पुढे चालू न ठेवता संगीत कलेतच प्रगती करावी असा अंभईकरांचा निश्चय प्रत्ययास आल्यामुळे अखेर



सर्वांनी संमती दिली. पुढे २०-२१ वर्षांनंतर अंभईकरांनी 'पुन्हा एकदा स्थलांतर केलं ते मात्र कोणालाच न जुमानता. त्याविषयी पुढे येईलच.

'महाराष्ट्र' साप्ताहिकाचे संपादक श्री. दादासाहेब ओगले यांनी अंभईकर मुंबईला निघाल्यानंतर मुंबईतील 'मौज' साप्ताहिकाचे संपादक पां. ह. भागवत आणि 'निर्भीड' साप्ताहिकाचे संपादक अनंत हरी गद्रे यांना देण्याकरता दोन पत्रं दिली. तसंच 'महाराष्ट्र'चे उपसंपादक ग. त्र्यं. तथा भाऊसाहेब माडखोलकर यांनी प्रा. अनंत काणेकर आणि प्रा. वि. ह. कुळकर्णी यांना पत्रं दिली. मुंबईतील या चौघांपैकी कोणीच संगीत क्षेत्रातलं नव्हतं, असं असूनही या चार प्रतिष्ठित साहित्यिकांनी अंभईकरांना अनेक बाबतीत मदत केली. या उलट आपल्या नागपूरच्या मुक्कामात 'मुंबईला या. तुमची सगळी सोय करतो. नागपूरमध्ये तुम्हाला काही भविष्य नाही.' 'मुंबईला बघा मी तुम्हाला कोठे पोहोचवितो ते.' अशी तोंडभर आश्वासनं देणाऱ्या गायक मंडळींपैकी कोणीही अंभईकरांना हात दिला नाही, याचं मात्र त्यांना दुःख झालं. 'नवाकाळ'च्या संपादक विभागातील श्री. वामनराव लेले आणि कै. गणपतराव ओक तसेच श्री. नानासाहेब लागू या तिघांनी बरीच मदत केली.

त्याकाळी खूप स्वस्ताई होती. अर्ध्या आण्याला चहाचा कप, तर राईस प्लेटला अवघे दोन आणे. उत्तम पोटभर जेवण सहा आण्यात मिळत असे. जागांची टंचाई नव्हती. 'जागा भाड्यानं देणं' "To be Let' या आज इतिहासजमा झालेल्या पाट्या त्या काळात मुंबईत सर्रास दिसत. मुंबईत आल्यावर अंभईकर काही दिवस निरनिराळ्या ठिकाणी राहिले. काही दिवस ते डॉ. एन. ए. पुरंदरे यांच्याकडेही राहिले होतं. वर उल्लेखिलेल्या साहित्यिक आणि पत्रकारांनी त्यांना बऱ्याच सभा संमेलनात गाण्याचे कार्यक्रम मिळवून दिल्यानं पोटापाण्याचा प्रश्नही निभावत होता.

याच सुमारास बी. बी. सी. आय रेल्वेच्या (आजची पश्चिम रेल्वे) दादर स्टेशनजवळ असलेल्या विजयनगर या सहा मजली भव्य इमारतीत त्यांनी एक जागा भाड्यानं घेतली. दैवही अनुकूल होतं. त्यामुळे मुंबईत आल्यावर अंभईकरांना हिज मास्टर्स व्हॉईस ग्रामोफोन कंपनीत असिस्टंट रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून नोकरी लागली. पगार जरी मासिक १५० रु. होता तरी त्या काळी तो भरपूर होता. शिवाय हे उत्पन्न दरमहा नियमितपणे मिळणार असल्यामुळे तोपर्यंत कलंदर असलेल्या अंभईकरांच्या जीवनाला स्थैर्य आले.

एच. एम. व्ही. मधली नोकरी सांभाळूनच आपल्या आवडीच्या इतर क्षेत्रात

अंभईकर सक्रिय राहिले. कोल्हापूर येथील सरस्वती सिनेटोनमध्ये त्यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, के. नारायण काळे, दादा तोरणे आदींचा परिचय झाला. बेळगावच्या लिंगराज कॉलेजमध्ये कार्यक्रमाच्या वेळी पु. मं. लाड व श्रीमती संजीवनी मराठे यांची ओळख झाली. मुंबईतील विल्सन कॉलेज, सिद्धार्थ कॉलेज, इस्माईल कॉलेज इत्यादींची स्नेहसंमेलने, नागपूरात झालेला सी. के. नायडू या क्रिकेटपटूचा एकसष्टी समारंभ, मानवेन्द्रनाथ रॉय यांनी भरवलेली साम्राज्यशाही विरोधी परिषद, कन्हान पाणी योजना, चिपळूणकर पुण्यतिथी, आंध्र इन्शूरन्स कंपनीचा उद्घाटन समारंभ, श्रीमती अनसूयाबाई काळे यांच्या भगिनी समाजाच्या इमारतीचे उद्घाटन, अशा अनेक प्रसंगी अंभईकरांच्या गायनाचे व वन्देमातरम्चे कार्यक्रम झाले.

## दक्षिणेतील सत्कार आणि चुंबनाचा प्रकार :

१९४१ साली दक्षिणेत कुंभकोणम या कावेरी नदीच्या काठी वसलेल्या पवित्र क्षेत्री संत त्यागराज स्वामींच्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी हत्तीवर अंबारीत स्वामींची प्रतिमा रंगीबेरंगी फुलामाळांनी व केळीच्या पानांनी सजविलेल्या मखरात ठेवून निघालेल्या नेत्रदीपक भव्य मिरवणुकीच्या अग्रभागी नामवंत दाक्षिणात्य कलावंत मृदंगम्, नागस्वरम्, व्हायोलिन इ. वाद्ये वाजळीत प्रसंगाला शोभा आणीत होतं. सात तारांचे व्हायोलिन वादन प्रथमच अंभईकरांना पहायला मिळाल्यानं ते स्वत:ला भाग्यवान समजतात. दाक्षिणात्य विद्वान कलावंतांच्या संगीत सभेत अंभईकरांनी गायलेली हिंदुस्तानी भजनं श्रोत्यांना आवडलेली दिसली. उपस्थित ख्यातनाम कलाकारांमध्ये अनामलाई विश्वविद्यालयातील संगीत विभागाचे प्रमुख विद्वान टायगर वरदाचारी यांना तर, विशेष पसंत पडून त्यांनी चिदंबरम येथील अनामलाई विश्वविद्यालयात गाण्याचं आमंत्रण दिलं. इतकंच नव्हे तर ते स्वत: दुसरेच दिवशी अंभईकरांना आपल्याबरोबर घेऊन गेले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि श्रोत्यांनी भरगच्च भरलेल्या हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात गौडमल्हार, मियामल्हार, सूरमल्हार, मेघमल्हार आणि रामदासी मल्हार असे पाच प्रकार गाऊन दाखविले. योगायोग असा की, सभागृहात मल्हार रंगात आला असता बाहेर पर्जन्याची बरसात होत होती. टायगर वरदाचारी यांनी प्रारंभी संस्कृतमध्ये अंभईकरांचा परिचय करून दिला आणि गाण्यावर बेहद्द खूष होऊन शेवटी आभार मानताना तर त्यांनी अंभईकरांचं चुंबन घेतलं. एका



श्रेष्ठ विद्वान संगीतज्ज्ञाला अंभईकरांचं गायन पसंत पडल्यामुळे त्यांचं लोकमान्य असलेलं गायन तज्ज्ञमान्य झालं. याचा परिणाम म्हणून वास आर्टस् प्रॉडक्शनच्या 'इलालू' या बोलपटाला पार्श्वसंगीत देण्याची संधी त्यांना मिळाली. पुढे महंमद अली पिक्चर्सच्या बोलपटाचं संगीत दिग्दर्शनही अंभईकरांनी केलं.

## बेचाळीसची चळवळ :

अंभईकरांच्या जीवनात मधून मधून राजकीय अंगही डोकावतं. वन्देमातरम्, सायमन कमिशन, विदेशी कपड्यांच्या होळ्या याबाबतची माहिती आधी आलीच आहे. संगीत हे आपलं जीवन क्षेत्र म्हणून त्यांनी निश्चित केलं असलं आणि त्यासाठी आवश्यक ती साधना ते नियमितपणे करीत असले तरी त्यांनी संगीत कोषात स्वत:ला गुरफटून मात्र घेतलं नव्हतं. जगात, देशात व राजकीय तसेच सामाजिक जीवनात काय घडतं आहे याचे ते डोळसपणे निरीक्षण करीत. त्यामुळे १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळीचा डोंब उसळला तेव्हा ब्रिटिश कंपनीत नोकरीला असूनही अंभईकर स्वस्थ बसणं शक्य नव्हतं.

मुंबईला आल्यावर मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कै. भुलाबाई देसाई, स. का. पाटील, सयाजीराव सिलम, जोकीम अल्वा, बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक एस. ए. ब्रेलवी, भानुशंकर याज्ञिक, होमी तल्यारखान यांच्यासारख्या अनेक नेत्यांशी अंभईकरांचा वन्देमातरम् गीतामुळे आणि संगीतातील इतर कामगिरीमुळे चांगला परिचय झाला होता. यातील बहुतेकांचं मत असं होतं की अंभईकरांनी स्वातंत्र्य चळवळीकरता संगीतकला आणि नोकरी सोडू नये. त्यामुळे गांधीजींनी 'क्विट इंडिया' ची घोषणा केल्यानंतर सबंध देशात जे वादळ उठलं त्यात भूमिगत चळवळीतच कार्य करण्याचं अंभईकरांनी ठरविलं.

## वेष पालटून पत्रकं वाटली :

आपली ओळख पटू नये म्हणून 'वेष असावा बावळा परि अंतरी नाना कळा' या समर्थ उक्तीप्रमाणे नोकरीवर जायचा सूटबुटाचा पोशाख न घालता, कसंतरी गबाळं नेसलेलं धोतर, शर्टाची बटनं वर खाली लावलेली, नाकापर्यंत खाली आलेला चष्मा, डोक्यावर बावळटासारखी वाकडी टोपी, कपाळावर आडवं गंध, आणि मध्ये शेंदूर, पायात अंगठा तुटलेल्या चपला अशा थाटात अंभईकर प्रभात फेऱ्यांत सामील

होऊन 'झंडा उंचा रहे हमारा', 'चरखा चला चला के हम तो स्वराज्य लेंगे', 'आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा', 'वन्दे मातरम्', 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्तां हमारा' अशी राष्ट्रीय गीतं उच्च स्वराने म्हणत असत.

भूमिगत चळवळीत काँग्रेसची चक्रमुद्रित किंवा छापलेली पत्रकं वाटणं हे एक मोठं धोक्याचं काम असे. देशाच्या निरनिराळ्या भागात चळवळ कशी चालली आहे, हे सर्व प्रांतातून कळण्यासाठी, स्वातंत्र्यसैनिकांचा उत्साह वाढविण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला विरोध तीव्र करण्यासाठी या पत्रकांची फार गरज असे. अंभईकरांनी ही पत्रकं वाटण्याचं काम पत्करलं. प्रभात फेरीला जाताना धोतराच्या आत कमरेखाली या पत्रकांचं पुडकं ते लपवून ठेवीत आणि रस्त्यावर त्या पत्रकांकरताच आलेल्या व्यक्ती ठिकठिकाणी दिसल्या म्हणजे त्यांना एकेक पत्रक देत.

## तंबोऱ्याचा झंकार आणि सी.आय.डी. ची धाड :

त्यांच्या घरातही अनेक बेत चालत असत. पण घरात केवळ भूमिगत कार्यकर्त्यांचाच राबता असे असे नव्हे. तर अनेक साहित्यिक, गायक, पत्रकार, बोलपट कलावंत अशी मंडळीही त्याच खोलीत हजर असायची. अशावेळी इतरांना कळू न देता भूमिगत कार्यकर्त्यांना मात्र काँग्रेसची पत्रकं इतरांना संशय येऊ न देता वाटण्याचं कौशल्य अंभईकरांनी आत्मसात केलं होतं. अगदी बोटावर मोजण्या इतक्यांनाच त्यांच्या या भूमिगत कार्याची माहिती होती. काँग्रेसची पत्रकं दादरला त्यांच्याकडे गिरगावातून यायची. साध्या पोशाखातील पोलिसांचा एवढा सुळसुळाट होता की, एक दोनदा त्यांना वाटण्याकरिता आलेल्या पत्रकांचे पुडकंच्या पुडकं पाणी तापवायच्या बंबात जळण म्हणून टाकावं लागलं. अंभईकरांच्या विजयनगर मधूनच कुठून तरी पत्रं वाटली जातात याचा पक्का सुगावा पोलिसांना लागला होता. ब्रिटिश राजवटीला मनातून विरोध असणारेही काही लोक पोलीस दलात होते. एकदा त्यापैकी एकानं घाईघाईने येऊन अंभईकरांना काँग्रेसच्या पत्रकांकरता विजयनगर इमारतीवर पोलीस छापा घालणार असल्याची बातमी दिली. पत्रकांचं पुडकं नुकतंच आलेलं असल्यामुळे ते नाहीसं करायलाही पुरेसा अवसर नव्हता. त्यावेळी ताराबाई गदगकर, सुषमा केतकर, नटी रत्नमाला अशी काही मंडळी त्यांच्याकडे आली होती.

अंभईकरांनी प्रसंगावधान राखून गवसणीतून तंबोरा काढला आणि रियाज



करायला सुरुवात केली. आलेल्यांपैकी एक-दोनजणीही त्यात सामील झाल्या. एवढ्यात दारात दोन गुप्त पोलीस आले. गाणं थांबवून अंभईकर त्यांना म्हणाले, 'आइये, गाना सुनना है तो अंदर आकर आरामसे बैठकर सुनिये.' तेव्हा त्यांच्यापैकी एकजण आपल्या सहकाऱ्याला म्हणाला, 'अरे, ये गवय्येका मकान है, यहाँ क्या मिलेगा ?' असे म्हणून ते दोघेजण विजयनगरमधील इतर घरांच्या तपासणीसाठी पुढे निघून गेले. अशा प्रकारे भूमिगत चळवळीच्या संपूर्ण काळात अंभईकरांनी काँग्रेसची पत्रकं वाटण्याचं काम निभावून नेलं आणि त्या यंत्रणेत खंड पडू दिला नाही. अशा चळवळीचा परिणाम म्हणून अखेर स्वातंत्र्य मिळालं. अंभईकरांना आपण या कामात यथामति यथाशक्ति सहभागी झाल्याचा सार्थ अभिमान वाटतो. महाराष्ट्र शासनानेही त्यांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून गौरविलं असून त्यांना मासिक मानधनही मिळते.

## रेकॉर्डिंग कंपनीची मक्तेदारी :

अंभईकर एच. एम. व्ही. मध्ये नोकरीला लागले, तेव्हा ती कंपनी ब्रिटिश मालकीची होती. सबंध भारतात ती एकच रेकॉर्डिंग कंपनी असल्यामुळे संगीत ध्वनिमुद्रणात तिचा मक्ता होता. कंपनीचे भारतातील प्रमुख अधिकारी सुरुवातीला श्री. हॅरी इव्हॅन्स हे ब्रिटिश गृहस्थ होतं. नंतर भारतातील प्रमुख प्रतिनिधी म्हणून श्री. लाल नावाच्या एका पंजाबी माणसाला नेमण्यात आलं. शिवाय जॉर्ज नावाचा एक रेकॉर्डिस्ट होता. या जॉर्जला संगीतातलं शास्त्र म्हणून फारसं काही कळत नसे. पण तो अव्वल दर्जाचा 'कानसेन' होता. कर्णमधुर आणि अगदी क्वचित बेसूर होणारं संगीत यातला फरक त्याला ताबडतोब जाणवायचा. तो लगेच म्हणायचा, 'देअर इज समथिंग रॉंग', मेटलॅन्ड, सालोमन, मडगांवकर आणि बोस असे आणखी रेकॉर्डिस्टस होत. पण त्यांना जॉर्जसारखा संगीताचा कान नव्हता. मात्र मडगांवकरांना संगीताची उत्तम जाण असून ध्वनिमुद्रणाचे तंत्र अवगत होतं. श्री. रमाकांत रुपजी यांना बरेच अधिकार होतं. व्यवस्थापन आणि विक्री ही दोन्ही अंगे ते समर्थपणे सांभाळीत. स्वतः फारसे शिकलेले नसूनही त्यांनी कंपनी भारतात पाय रोवून उभी केली आणि ब्रिटिश कंपनीनेही त्यांना पुढे हेड ऑफिसचे मॅनेजर हे वरचं पद दिलं.

रेकॉर्डिंगच्या क्षेत्रात मक्तेदारी असल्यामुळे जास्तीत जास्त फायदा मिळविण्याचं कंपनीचं धोरण असे. कायम नोकरांना आणि आपली ध्वनिमुद्रिका निघावी म्हणून उत्सुक असलेल्या गवयांना मामुली पैसे द्यायचे आणि स्वतः मात्र बेसुमार फायदा

कमावून तो इंग्लंडला रवाना करायचा ही एच. एम. व्ही. ची व्यावसायिकता नीती होती.

ध्वनिमुद्रणासाठी इंग्लंडमध्ये जुनी झालेली यंत्रसामुग्री एच. एम. व्ही. भारतात पाठवीत असे. इंग्लंडमधील गाण्याचं ध्वनिमुद्रण मोठ्या आलिशान स्टुडिओत १६-१७ मायक्रोफोन ठेवून केलं जात असे. पण तर इथे तयार झालेल्या ध्वनिमुद्रिकेचा दर्जा कसाही असला तरी बाजारात तिची तडाखेबंद विक्री होत असे.

एरव्ही पैशाच्या बाबतीत चिक्कूपणा करणारी ही कंपनी भारतभरच्या आपल्या विक्रेत्यांची दरवर्षी एक सभा घेत असे. त्या सभेकरता मात्र कंपनी वारेमाप खर्च करीत असे. खाद्यपेयांची चंगळ असे आणि प्रत्येक विक्रेत्याला त्याने वर्षात केलेल्या विक्रीनुसार रोख किंवा भेटीच्या स्वरूपात जादा मोबदला देण्यात येई. आपले विक्रेते हेच कंपनीचे खरे आधारस्तंभ आहेत याची चांगली जाण श्री. लाल आणि श्री. रुपजींना होती.

## कलाकारांवर अन्याय :

त्याकाळी शास्त्रीय किंवा सुगम संगीताच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या की, त्या कलावंतांची गाणी ग्रामोफोनद्वारे भारतातील सर्व खेड्यापाड्यापर्यंत पोचत असे. त्यामुळे ध्वनिमुद्रिकेच्या द्वारा गायकाची किंवा गायिकेची भरपूर जाहिरात होत असे. नवशिक्या गवयांप्रमाणे बुजुर्ग कलावंतांनाही म्हणूनच आपल्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका निघाव्यात असं वाटत असे. यामुळे तर एच. एम. व्ही. कंपनीचे अधिकच फावे. एका प्रकाशन समारंभात श्री. पु. ल. देशपांडे यांनी असे उद्गार काढल्याचे स्मरतं की, भारतात दुर्दैवाने एच. एम. व्ही. ही ग्रामोफोनची एकच व्यापारी कंपनी असल्यामुळे उत्कृष्ट दर्जेदार संगीत निजपणं अशक्य झालं. काही गायकांना ध्वनिमुद्रणाचा मोबदला म्हणून एकदम संपूर्ण रक्कम देण्यात येत असे. तर काहींबरोबर रॉयल्टीचे करार केलं जात असत. या गायकांना त्यांच्या जितक्या ध्वनिमुद्रिका विकल्या जातील त्याच्या पाच टक्के रक्कम देण्यात येत असे. रॉयल्टीचा हिशोब दर सहा महिन्यांनी केला जात असे. गायकाला आणि कवीला योग्य त्या रकमेचे चेक पाठविले जात. संगीत दिग्दर्शक किंवा गाण्याला चाल लावणाऱ्याचं एवढं महत्त्व मानलं जात नसे.

'गंगा यमुना डोळ्यात उभ्या का' या अफाट खपलेल्या ध्वनिमुद्रिकेकरता लता मंगशकरांना रॉयल्टी म्हणून अमाप पैसा मिळाला. तर ती चाल देणाऱ्या वसंत प्रभूला



केवळ एकदा २५ रुपये देण्यात आले! कै. दत्तोपंत कोरगांवकर, श्री. सुधीर फडके आणि श्री दत्ता डावजेकर हे अंभईकरांबरोबरच ध्वनिमुद्रणासाठी पसंत पडलेल्या गाण्यांना चाली देणारे सहकारी होतं. मात्र कंपनीचे नोकर म्हणून संगीतकार असूनसुद्धा ध्वनिमुद्रिकेवर नाव न देण्याचा कडक निर्बंध होता. आता मात्र नाही. काही गाण्यांना चाली लावणारे कलावंत बाहेरूनही आणलं जात. अर्थात त्यांच्या मोबदल्याची कल्पना वसंत प्रभूंच्या रकमेवरून येईलच. बोलपट संगीत ३ मिनिटं २० सेकंद चालणाऱ्या ध्वनिमुद्रिकेकरता स्वतंत्रपणे ध्वनिमुद्रित करावे लागत असे. कारण चित्रपटाच्या साऊंड ट्रॅकवरून ध्वनिमुद्रण करण्याचे तंत्र तेव्हा अवगत नव्हतं. त्यामुळे बोलपटातील गाणी ध्वनिमुद्रित करण्याच्या वेळी सतार, सारंगी, क्लॅरिओनेट, बासरी, पेटी, ऑर्गन, तबला, पखवाज, व्हायोलिन, शहनाई, ट्रंपेट वगैरे वाद्ये तयार ठेवावी लागत. हा वाद्यवृंद सर्वसाधारणपणे बाहेरून आणला जात असे. या सर्वांना मिळून एका ध्वनिमुद्रिकेचे सुमारे ७०० रु. देण्यात येत. काही वादक कलावंत कायमचे नोकरीत असत. त्यांना मासिक १००-१२५ रुपये पगार मिळे. मात्र बाहेर कुठेही कार्यक्रम करण्याची परवानगी नसे.

एच.एम.व्ही. च्या नोकरीतील कामाचे तास ठरलेले नसत. दुसऱ्या दिवशी कामावर किती वाजता यायचं हे आदल्या दिवशी घरी जाताना सांगितले जाई. एकदा कामावर हजर झालं म्हणजे त्या दिवशी किती वाजता घरी परतता येईल हे आधी ठरलेलं नसे. मात्र रात्रभर ध्वनिमुद्रण झालं तर दुसऱ्या दिवशी बहुधा सुटी दिली जाई. बडे गुलाम अली खाँ, शांता आपटे, केसरबाई केरकर, मा. कृष्णराव, ज्युतिका रॉय, सैगल वगैरेंचे ध्वनिमुद्रण सायंकाळी सुरू झालेलं पहाटे ३-४ वाजेपर्यंत चालायचं. सिनेसंगीत, नाट्यसंगीत, आणि भावगीतं यांच्या व्यतिरिक्त काही प्रहसनं, काव्यवाचन, प्रार्थना अशांचंही ध्वनिमुद्रण होत असे. हरींद्रनाथ चटोपाध्याय यांनी वाचलेल्या इंग्रजी कवितांचही ध्वनिमुद्रण करण्यात आल होतं. एका प्रसंगी बालगंधर्वांचं ध्वनिमुद्रण संपता संपता सहजगत्या नकळत ऋषभ कोमल लागला. अंभईकरांनी ताबडतोब ध्वनिमुद्रण थांबवून त्यांना म्हटले, 'नाना, जवळजवळ सर्व गाणं छान झालं. पण शेवटी ऋषभ कोमल लागला.' यावर अत्यंत नम्र वृत्तीचा हा थोर कलावंत म्हणाला, 'देवा, इथं कोणा लेकाला सारेगम कळतंय? द्या वन्समोअर आणि घ्या रिटेक.'

## अनेक रेकॉर्डिंग कंपन्या निघाल्या :

त्याच सुमारास भारताच्या स्वातंत्र्यचळवळींनीही उग्र स्वरूप धारण करायला सुरुवात केली होती. परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा पुरस्कार भारतभर जोरानं सुरू होता. अशा वेळी ध्वनिमुद्रण क्षेत्रातील एच.एम.व्ही. ची मक्तेदारी सर्वांना सलणं स्वाभाविकच होतं. त्यामुळे काही गुजराथी भांडवलदारांनी मुंबईत नॅशनल ग्रामोफोन रेकॉर्ड कंपनी या नावानं एक संस्था स्थापन केली. पंड्याशेट हे तिचे प्रमुख होते. यासाठी जपानी यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञ आणले. 'यंग इंडिया' या लेबलखाली या कंपनीच्या ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध होऊ लागल्या. व्ही. शांताराम अनेक वर्षं एच.एम.व्ही.च्या संचालक मंडळात होते. त्यांना या कंपनीनं आपल्याकडे ओढलं तेव्हा एच.एम.व्ही.मध्ये काहीशी घबराट झाली. 'प्रभात'च्या 'गोपाळकृष्ण' या संगीतप्रधान बोलपटाच्या ध्वनिमुद्रिका 'यंग इंडिया'नंच प्रसिद्ध केल्या. शांता आपटेंचे 'झर झर झर झर धार झरे', राम मराठे यांचं 'तुझाच छकुला तुझाच गे मम माऊली' आणि मास्टर परशुरामचं 'या कृष्णाची माया लई न्यारी' या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिकांचा बेसुमार खप झाला. तसंच 'ब्रॉडकास्ट' नावाची एक कंपनी निघून तिनं केसरबाई केरकर यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या.

पण पुढे काही कारणानं शांतारामबापू परत एच.एम.व्हीमध्ये येऊन मिळाले आणि हळू हळू 'यंग इंडिया' हे नाव नाहीसं झालं. या आधी 'ओडियन' या लेबलखाली एका जर्मन कंपनीनं ध्वनिमुद्रिका प्रकाशित करून एच.एम.व्ही.ला थोड्याफार प्रमाणात शह देण्याचा प्रयत्न केला होता. एवढ्यात दुसरं महायुद्ध सुरू झालं आणि ही कंपनी बंद पडली.

आपल्याला हळूहळू तीव्र स्पर्धेला तोंड द्यावं लागणार हे व्यापारात वाकबगार असणाऱ्या ब्रिटिश एच.एम.व्ही. कंपनीनं ओळखलं. म्हणून बाहेरची स्पर्धा येऊ न देण्याकरिता तिने कलकत्त्याला हिंदुस्तान रेकॉर्ड कंपनी, बनारसला स्टार रेकॉर्डिंग कंपनी, लाहोरला जयको रेकॉर्ड कंपनी अशा कंपन्या स्वतःच कार्यान्वित केल्या. या सर्व कंपन्यांचं ध्वनिमुद्रण एच.एम.व्ही.च करीत असे. फक्त ध्वनिमुद्रिकांचं वितरण ह्या लेबलखाली होई. शिवाय एच.एम.व्ही.सुद्धा स्वतः आपल्या काही ध्वनिमुद्रिका 'ट्विन' आणि 'रिगल' यह लेबलाखाली वितरीत करू लागली. याशिवाय कोलंबिया ग्रामोफोन कंपनी लिमिटेड नावाची आपल्याच मालकीची दुसरी कंपनी एच.एम.व्ही.नं काढली आणि या दोन कंपन्यात फार मोठी चुरस लागल्याचा देखावा निर्माण केला.



दोन्ही कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारीवर्ग एकच होता. त्याचे नाममात्र वर्गीकरण करण्यात आलं.

## कोलंबिया कंपनीमधील कार्य :

अंभईकरांना एच.एम.व्ही.मध्ये स्वतःच्या कलाविष्काराला पुरेसा वाव मिळत नव्हता आणि इतर गुणवत्ता असलेल्या कलावंतांनाही आपल्या स्थानाचा फायदा देता येत नव्हता. त्यांचं नेहमी पुढे पुढे करणारे आणि जणू काही आपल्यामुळेच कलावंत ध्वनिमुद्रणाकरता उपलब्ध होतात, असे दाखविणारे काही सहकारी अंभईकरांच्या अंगच्या गुणांना वाव देत नसत आणि त्यांना क्वचित प्रसंगी मानहानीला तोंड द्यावं लागे. एच.एम.व्ही.नं कोलंबिया कंपनी काढल्यावर एच.एम.व्ही.त होणाऱ्या मुस्कटदाबीतून सुटका करून घेण्याची संधी अंभईकरांना मिळाली आणि बेल्स व कूकमन या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाताखाली ते स्वतंत्ररीत्या काम करू लागले. आता अनेक लायक कलावंतांची त्यांच्या गुणवत्तेनुसार अंभईकरांनी कोलंबियाकडे वर्णी लावली. त्या त्या कलावंतांच्या आवाजाचा गुणधर्म ओळखून त्याला सुलभ होतील अशा चाली अंभईकरांनी दिल्या. आणि एका मागोमाग एक अशा अनेक ध्वनिमुद्रिका ते कोलंबियाच्या लेबलखाली काढू लागले. एच.एम.व्ही. आणि कोलंबिया या कंपन्यातली तथाकथित चुरस अंभईकरांमुळे निर्माण झाली.

# आयुष्यात 'सुमन' गंध आला



## विवाह :

कोलंबिया कंपनीत काम करीत असतानाच २७ मार्च १९४६ साली अंभईकरांचा तळेगाव दाभाडे येथील डॉ. सरदेसाईंच्या टी.बी. सॅनेटोरियमचे हाऊस सर्जन डॉ. नरहरी अनंत बर्वे यांची मुलगी कु. सुमन हिच्याशी नागपूर येथे विवाह झाला. डॉ. बर्वे यांचे वडील अनंत वामन बर्वे हे जुन्या पिढीतील एक नामवंत नाटककार होतं. त्यांनी लिहिलेली राजा गोपिचंद, संत मीराबाई, संत रोहिदास, भक्त प्रल्हाद इ. नाटके त्या काळात गाजली होती. सुमनचे वडील डॉ. बर्वे हेही नागपूरला भरलेल्या ३० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे प्रमुख कार्यवाह होतं. ते सतारही वाजवित. त्यामुळे त्यांच्या घराण्यात संगीत आणि नाट्य यांची आवड होती. लग्नाच्या वेळी सुमन २३ वर्षांची तर अंभईकर ३४ वर्षांचे होतं. सुमन बर्वेचं नाव आता बदलून सौ. मंदाकिनी अंभईकर असे झालं. तिचं पूर्वायुष्य बरंचसं तिच्या आजोळी कजवाडकर यांचे घरी गेलं. आजोबा पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धात कामगिरीवर असल्यामुळे आजीनंच खरा सांभाळ केला. तिचे प्राथमिक शिक्षण मुरूड-जंजिरा इथं झालं आणि माध्यमिक शिक्षण पुण्याला रास्ता पेठ शाळेत झालं. आचार्य प्र. के. अत्रे त्यावेळी रास्ता पेठ शाळेचे मुख्याध्यापक होतं. अकरावीची मॅट्रिकची परीक्षा



तिनं नागपूरच्या हायस्कूलमधून दिली. मंदाकिनीबाईंना गाण्याची चांगली आवड होती. त्या पेटीही वाजवीत.

अंभईकरांच्या विवाहाला नागपुरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ति उपस्थित होत्या. संत पाचलेगांवकर महाराज, कवि अनिल उर्फ आ. रा. देशपांडे, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, सौ. उषाताई कोलते, ॲडव्होकेट काकासाहेब पुराणिक, बॅ. किनखेडे, डॉ. भा. ना. खरे, कॅप्टन मोडक, सर हरिसिंग गौर, श्रीमंत बाबूराव देशमुख 'महाराष्ट्र'चे संपादक गो. अ. ओगले, ग. त्र्यं माडखोलकर, आर. एस. रुईकर, 'हितवाद'चे संपादक ए. डी. मणी इ. मंडळी उपस्थित होती.

मुंबईतल्या दादरला रहात असलेल्या विजयनगरला त्यावेळी दादरचं हॉलिवूड समजत असत. कारण प्रसिद्ध नट केशवराव दाते, नाटककार अप्पासाहेब टिपणीस, नटी रत्नमाला, उषा किरण (मराठे), श्रीकांत सुतार, आर्टिस्ट नाना ठोसर, राजा पंडित असे कला क्षेत्रातील कलावंत इथं रहात होतं. त्यामुळे सौ. मंदाकिनी समवेत अंभईकरांचे वैवाहिक जीवन या सर्व शेजाऱ्यांच्या सहवासात काव्य, नाट्य, शास्त्र, विनोदाच्या वातावरणात सुरू झालं.

१९४६ साली अंभईकरांचं पहिले पुत्ररत्न चि. सतीश यांचा जन्म नागपूर येथे झाला. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चा कमर्शिअल आर्टस्‌चा डिप्लोमा घेऊन अकोला येथे तो पत्नी सौ. वृषाली, कन्या देवश्री आणि पुत्र सुदर्शन यांचेसह राहातो.

## डॉ. आंबेडकरांचं ध्वनिमुद्रण :

ऑगस्ट १९५१ मध्ये कोलंबिया ग्रामोफोन कंपनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्धधर्मीय प्रार्थनेचं ध्वनिमुद्रण करायचं ठरलं. ते म्हणणार असलेली प्रार्थना त्यांनी लिहून आणली होती. गाण्याचं रेकॉर्डिंग असलं की स्टुडिओत तंबोरे, पेटी, तबला इ. वाद्यांची आणि वादकांची व्यवस्था नेहमीच करावी लागत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सपत्नीक स्टुडिओत प्रवेश करताच म्हणाले, 'हे काय, ही वाद्ये कशाला? मला तुम्ही कोणी गवय्या समजलात की काय?' स्टुडिओची दारं खिडक्या बंद होत्या आणि वातानुकूलतेची सोय नसल्यामुळे बाबासाहेब घामाघूम झाले. एकदोन रिहर्सलच्या वेळी अंभईकरांनी त्यांना 'थोडं पुढे सरका' 'किंचित बाजूला' वगैरे सूचना दिल्या. तेव्हा ते म्हणाले, 'मी आज तुमचा कैदीच आहे. तुम्ही

सांगाल तसा बसेन किंवा उठेन. पाहिजे तर झोपेनसुद्धा'. यावर एकच हंशा झाला. रेकॉर्डिंग संपल्यावर बाबासाहेबांच्या पत्नी म्हणाल्या, 'किती वाद्यं छान आहेत ही! मला गाणं येत असतं तर मी गायलेच असते?' यावर अंभईकर म्हणाले, 'मग तुम्हाला मी प्ले बॅककरता गाणी दिली असती.' यावर पुन्हा हशा झाला. रेकॉर्डिंग आटोपल्यावर कॉफीपानाच्या वेळी इतर गप्पा निघाल्या, तेव्हा मात्र बाबासाहेब म्हणाले, 'दुर्दैवाने तुमच्या या ब्रिटिश कंपनीला भारतात अजून प्रतिस्पर्धी नसल्यामुळे येणाऱ्या गल्ल्याच्या ९५ टक्के रक्कम स्वत:च्या तिजोरीत ठेवून कलावंताला केवळ पाच टक्के रॉयल्टीवर ते राबवित आहेत. मला जर आधी याची कल्पना असती तर मी तुमच्या करारावर सही केली नसती. पण एकदा करारबद्ध झाल्यावर तो मोडणं माझ्या शिस्तीत बसत नसल्यामुळे मी आज आलो एवढंच.'

एच.एम.व्ही. आणि विशेषत: कोलंबिया कंपनीत काम करीत असताना अंभईकरांनी ज्यांचं पद्य किंवा गद्य ध्वनिमुद्रण केलं अशांची यादी भली मोठी आहे. किंबहुना त्या काळातील बहुतेक नवोदित आणि नामवंत गवई किंवा गायिका, तसंच साहित्य आणि राजकारण याहीपेक्षा क्षेत्रातील मान्यवर नेते यांची सूची कोणी तयार केली तर त्या सर्वांचं ध्वनिमुद्रण अंभईकरांनी केलंलं आहे, असे म्हटलं तर यत्किंचित्‌ही अतिशयोक्ति होणार नाही. पण चरित्र लिहायचं म्हटलं म्हणजे असे मोघम विधान करून चालणार नाही. म्हणून काही निवडक ध्वनिमुद्रणांचा उल्लेख करणं अपरिहार्य आहे.

## विविध प्रकारच्या कलावंतांचं ध्वनिमुद्रण :

अंभईकरांनी स्वत: गायलेल्या १८-२० ध्वनिमुद्रिका उपलब्ध आहेत. त्याशिवाय भावगीत आणि नाट्यसंगीताच्या क्षेत्रातील प्रमिला जाधव (जयमाला शिलेदार) मालती पांडे, माणिक भिडे, ललिता नायमपल्ली, सिंधु पुरोहित, अनु इनामदार, विमल वाकडे, कुसुम मोहोनी, सुमन माटे, विनोदिनी दीक्षित, कृष्णा उद्यावरकर, शांता शिराळी, सुमन कल्याणपूर, वसुंधरा श्रीखंडे (कोमकली), जयवंत कुळकर्णी, ललिता देऊळकर (फडके), गजानन वाटवे, सुशीला टेंबे, सुमती टिकेकर, श्यामला माजगांवकर, विद्या माडगूळकर, जे. एल. रानडे, सुरेश हळदणकर, मोहनतारा अजिंक्य, इंदिराबाई खाडिलकर, सुधा मल्होत्रा, शंकर शंभू कव्वाल, शिकंदर कव्वाल, अब्दूल रहमान कांचवाला, राम भगत, कालू भगत इ. कलावंतांच्या अंभईकरांच्या



मार्गदर्शनाखाली निघालेल्या ध्वनिमुद्रिकांचा तुफान खप झाला. त्यामुळे त्यांना लोकप्रियता मिळाली. लता मंगेशकर, भीमसेन जोशी, बडे गुलाम अली खाँ, मोगुबाई कुर्डीकर, व्ही. जी. जोग, माणिक वर्मा, गजाननबुवा जोशी, अहमदजान तिरखवाँ, बालगंधर्व, मा. कृष्णराव इ. ख्यातनाम व जागतिक कीर्तीच्या कलावंतांचे ध्वनिमुद्रण अंभईकरांच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली अगदी उत्साहानं पार पडलं होतं.

संगीताव्यतिरिक्त हरींद्रनाथ चट्टोपाध्याय, रँग्लर र. पु. परांजपे, नृत्यविशारद राम गोपाल, ग. त्र्यं. माडखोलकर, संत पाचलेगांवकर महाराज, संत तुकडोजी महाराज यांच्या साहित्याचे ध्वनिमुद्रणही अंभईकरांनी केलं. काही प्रहसननं, नभोनाट्यं, लोकगीतं, गोंधळ, भारूडं, बालगीतं अशांचेही ध्वनिमुद्रण करण्यात आल्यामुळे ध्वनिमुद्रणाच्या कक्षा बऱ्याच रुंदावल्या.

वैद्यकीय क्षेत्रात जसं अधिकाधिक रुग्ण हाताखालून गेलेल्या डॉक्टरांचे रोग निदान आणि औषधयोजना अचूक होत जातात तसंच संगीत क्षेत्रातही आहे. एच. एम. व्ही. आणि कोलंबियाच्या नोकरीत अंभईकरांना पगारवाढ मिळाली नाही तरी अनुभव एवढ्या मोठ्या प्रमाणात मिळाला की, त्यांचं संगीत विश्व अधिक समृद्ध आणि परिणत झालं. त्याचा फायदा त्यांना पुढे लवकरच मिळाला.

## ध्वनिफितीचं आगमन :

ग्रामोफोन रेकॉर्डिंगच्या क्षेत्रात नित्य नवनवीन प्रयोग आणि शोध लागत होतं. आणि यंत्रसामग्री आणि ध्वनिमुद्रणाचं तंत्र यांच्यातही बदल होऊ लागले. आता मेणाच्या तबकडीऐवजी ध्वनिफितीवर मुद्रण करण्याचे प्रयोग यशस्वी होऊन त्या तंत्राचा प्रसारही फार मोठ्या प्रमाणात झाला. पूर्वी मेणाच्या तबकडीवर केलेले ध्वनिमुद्रण खराब झालं तर ती तबकडी टाकून द्यावी लागत असे. पण ध्वनिफितीचं तसं नव्हतं. तिच्यावरील मुद्रण पुसता येत असे आणि त्याच फितीवर पुन्हा ध्वनिमुद्रणं करता येत असे. एकदा केलेलं ध्वनिमुद्रण आपण पुसेपर्यंत कायम टिके. या तंत्रामुळे कंपनीचा खर्च कमी होऊ लागला. वास्तविक त्यामुळे एच.एम.व्ही. चा फायदाच व्हायचा. पण प्रत्यक्षात मात्र उलट झालं.

अनेक जर्मन, जपानी आणि ब्रिटिश कंपन्यांनी सुटसुटीत आकाराचे टेप रेकॉर्डर्स बाजारात आणले. त्यामुळे गिऱ्हाईकांना घरबसल्या स्वत:हून ध्वनिमुद्रण करता येऊ

लागलं. १९५१-५२ चा तो सुमार होता. रेडिओचाही भरपूर प्रसार झाला होता आणि रेडिओवरून शास्त्रीय आणि सुगम संगीताचे भरपूर कार्यक्रम सादर होऊ लागले. त्यामुळे आपल्या टेपरेकॉर्डर्सच्या साहाय्याने आपल्याला आवडणारी गाणी आणि रागदारी लोक टेप करून ठेवू लागले. याच काळात आचार्य अत्रेंसारखा खंदा नाटककार मराठी रंगभूमीचं पुनरुज्जीवन करू लागला होता. मराठी साहित्यही फोफावू लागलं होतं. नृत्य, चित्रकला यांचाही प्रभाव वाढत होता. साहित्य, नाट्य, आकाशवाणी, नृत्य, चित्र अशा ललितकला क्षेत्रांच्या सर्वच दालनात होत असलेली ही प्रगती आणि विशेषत: ग्राहकाला स्वत:ला हस्तगत झालेलं ध्वनिमुद्रण तंत्र या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन एच.एम.व्ही.ला कधी नव्हे त्या जबरदस्त मंदीला तोंड द्यावं लागलं. नोकरीत असलेल्या कलावंतांना हळूहळू कमी करण्यात येऊ लागलं. १३-१४ वर्षांच्या एच.एम.व्ही.च्या नोकरीत अंभईकरांचा पगार दीडशेच्या दीडशे रुपयेच राहिला होता. पण आता या पगारात ५० रुपयांची कपात मंजूर असेल तरच त्यांची सेवा चालू राहील असे त्यांना सांगण्यात आले. दुसरे जागतिक महायुद्ध संपल्यापासून सुरू झालेली महागाई १९५३ पर्यंत सारखी वाढतच होती. अंभईकरांचा संसारही वाढत होता.

१९५३ साली अंभईकरांचे दुसरं अपत्य शोभा हिचा जन्म झाला. तिचं शिक्षण इंटरपर्यंत झाल्यानंतर १९७४ साली नागपूरला तिचा विवाह श्री. सुधीरराव आपटे यांचेशी होऊन ती सौ. शोभा आपटे झाली. नागपूरच्याच मॅगनीज ओअर इंडिया लिमिटेड या कंपनीत सध्या ती अधिकारी आहे. तिला राहूल व रोहित असे दोन मुलगे आहेत. आपटे यांचा फोटो एन्लार्जमेंट स्टुडिओ आहे.

वाढती महागाई आणि वाढता संसार अशा परिस्थितीत मासिक उत्पन्न केवळ शंभर रुपयांवर येणार त्यामुळे काय करावं असा कूट प्रश्न अंभईकरांपुढे उभा राहिला. त्यांचं सहकारी श्री. सुधीर फडके अत्यंत मेहनती, कल्पक आणि स्वत:च्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास बाळगणारे असल्यामुळे त्यांनी आधीच राजीनामा दिला होता. या श्रेष्ठ कलावंताला पुढे केव्हाही नोकरी करण्याचा प्रसंग आला नाही.

## मुंबई आकाशवाणीत प्रवेश व कार्य :

इकडे आड तिकडे विहीर अशी अंभईकरांची परिस्थिती असताना दैव त्यांच्या मदतीला धावून आलं. ऑल इंडिया रेडिओचे स्टेशन डायरेक्टर कृ. द. दीक्षित यांनी



त्यांना बोलावून घेऊन केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर यांची ओळख करून दिली आणि लाईट म्युझिक युनिट नव्यानंच निघणार असल्याचं सांगितलं आणि थोड्याच दिवसांत मुंबई आकाशवाणीवर म्युझिक प्रोड्यूसर-कंपोझर म्हणून अंभईकरांची नेमणूक झाली. पूर्वीच्या रेकॉर्डिंग कंपनीतल्या पगाराच्या सुमारे तिप्पट पगार आणि ब्रॉडकास्टींगच्या कार्यक्रमाची वेगळी फी मिळू लागली. 'पुरुषस्य भाग्यम्' म्हणतात ते असं.

## आकाशवाणीतल ते संस्मरणीय दिवस :

आकाशवाणीच्या सेवेत रुजू झाल्यानंतर संगीत कार्यक्रमांचं नियोजन आणि प्रसारण याबाबतीत अंभईकरांना चांगलं स्वातंत्र्य आणि अधिकार मिळाल्यामुळे त्यांना आपण करीत असलेल्या कामाबद्दल खरं समाधान (जॉब सॅटिसफॅक्शन) मिळू लागलं. मुंबई आकाशवाणी केंद्रही त्या काळात विविध अंगांनी बहरत होतं. संगीताव्यतिरिक्त अनेक क्षेत्रात आकाशवाणीनं प्रवेश केला होता. कामगार सभा, गावकरी मंडळ, गंमत जंमत, वनिता मंडळ, कुटुंब कल्याण, शालेय कार्यक्रम, श्रुतिका, निरनिराळ्या विषयांवर तज्ज्ञांची भाषणं, साहित्यविषयक कार्यक्रम, कवि संमेलनं, प्रादेशिक वृत्त विभाग, विविध भारती अशा समाजातील निरनिराळ्या वर्गातील श्रोत्यांना आवडतील आणि उपयुक्त ठरतील असे अनेक कार्यक्रम सुरू झाले. ललितकला, साहित्य, शिक्षण, विज्ञान इत्यादींच्या प्रसाराचं एक प्रमुख माध्यम या दृष्टीनं आकाशवाणीला महत्त्व येऊ लागलं होतं. इतर कार्यक्रमांचे निर्मति कल्पकतेनं विविध प्रकारचे कार्यक्रम आणि प्रयोग करीत होतं. अशा वातावरणात अंभईकर चांगले रमले आणि त्यांनीही संगीत विभागात एक नवचैतन्य आणलं. आकाशवाणीवरील कारकीर्द ही त्यांच्या आयुष्यातील सुवर्णखंड मानावा लागेल. १९५३ पासून आकाशवाणीच्या प्रक्षेपणात वि. दे. अंभईकर हे नाव उच्चारलं गेलं नाही असा दिवस अपवादात्मक होता.

## बुजुर्गांचा सहवास :

आकाशवाणीच्या विविध विभागात त्याकाळी अनेक जाणकार मंडळी एकत्रित आलेली होती. पु. ल. देशपांडे, मो. ग. रांगणेकर, नरेंद्र शर्मा, मंगेश पाडगांवकर, राजा बढे, गजाननराव जोशी, मधु कानेटकर, व्ही. जी. जोग, मुजुमदार, केशवराव

भोळे, हफीज अहमद खाँ, अझमत हुसेन खाँ, विजय राघव राव केवळ एवढ्याच नावांचा उल्लेख केला तरी अंभईकरांबरोबरची टीम किती प्रभावी होती याची कल्पना येईल.

पूर्वीचे स्टेशन डायरेक्टर झेड ए. बुखारी आणि स्वातंत्र्य काळातील केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर हे दोघेही हिंदुस्थानी संगीताचे चांगले तज्ज्ञ असल्यामुळे अंभईकरांप्रमाणे इतरही काही पट्टीचे गायक वादक आकाशवाणीच्या सेवेत रुजू झाले. शमसुद्दिन खां, अल्लारखां, कामूराव मंगेशकर, एस. व्ही. पटवर्धन, महंमद हुसेन, नेरूरकर, पोपटकर, केरकर, श्रीपाद नागेशकर यांसारख्या पट्टीच्या तबलावादकांचा सहवास अंभईकरांना लाभला. आकाशवाणीचा प्रसार एवढ्या झपाट्यानं होऊ लागला होता की, १५-२० मिनिटं एवढा कमी वेळ गायला कुरकुर करणारे अनेक श्रेष्ठ कलावंतही आकाशवाणीकडे वळू लागले. त्यामुळे अब्दुल करीम खाँ, हिराबाई बडोदेकर, वझे बुवा, गंगूबाई हनगल, नारायणराव व्यास, मल्लिकार्जुन मन्सूर, निसार हुसेन, फिरोज दस्तुर, अमीर खाँ, बेगम अख्तर, रसूलन बाई, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व यांच्यासारख्या श्रेष्ठ गायक-गायिका या माध्यमांतून घरोघर पोहोचल्या. या सर्व मंडळींच्या मागणीप्रमाणे आकाशवाणीनं नंतर कार्यक्रमाची वेळही काही बाबतीत अर्धा ते दीड तासपर्यंत वाढवली.

## ऑडिशन कमिटीवर बहिष्कार आणि अंभईकरांची यशस्वी मध्यस्थी :

अंभईकर आकाशवाणीच्या सेवेत रुजू झाल्यावर थोड्याच दिवसांत तिथे एक मोठं वादंग निर्माण झालं. नभोवाणी मंत्री डॉ. केसकर चांगले संगीतज्ज्ञ आणि रसिक असल्यामुळे त्यांनी कलावंतांची योग्य श्रेणी ठरविण्याकरिता सर्व गायक-गायिकांची ऑडिशन घेण्याचं ठरविलं. तसं पाहिलं तर यात वावगं काही नव्हतं. पण तोपर्यंत ज्यांचे आकाशवाणीवर अनेकदा कार्यक्रम झालेले होतं अशा अनेक कलावंतांना हे अपमानास्पद वाटलं. शिवाय ऑडिशन कमिटीचे प्रमुख डॉ. रातंजनकर हे पं. भातखंडे यांचे शिष्य असल्यानं नामदार केसकरांनी आपल्या वैयक्तिक आवडीनुसार भातखंडे पद्धती तेवढीच उचलून धरून शेकडो वर्ष परंपरेनं चालत असलेल्या गायक वादकांची इतर घराणी आकाशवाणीवर येऊ न देण्याचा हा पद्धतशीर मार्ग शोधून काढला आहे, असा गैरसमजही त्यांनी संगीत क्षेत्रात पसरवला. परिणामी लहान मोठ्या सर्वच गायक गायिकांनी ऑडिशनवर बहिष्कार घातला आणि असहकार पुकारला.



पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी हे या बहिष्काराचे प्रमुख पुरस्कर्ते होतं.

अंभईकरांनी यावेळी कलाकार मंडळी आणि सरकार यांच्यात प्रभावी मध्यस्थी करून समेट घडवून आणला. गायकाचा दर्जा तज्ज्ञ मंडळाकडून एकदा निश्चित करून घेणं का आणि कसं संयुक्तिक आहे हे त्यांनी विरोधकांना पटवून दिलं. इतर घराण्यांना कमी लेखण्याचा सरकारचा कोणताही उद्देश नाही याचं प्रमाण म्हणून काही महिन्यांपूर्वीच अल्लादिया खाँ घराण्याच्या केसरबाई केरकर यांचा राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते सत्कार केला गेला होता, हे त्यांनी विरोधकांच्या निदर्शनाला आणून दिलं. ऑडिशन ज्युरीवर इतरही एक-दोन घराण्यांचे तज्ज्ञ असणं आवश्यक आहे असं आपलं म्हणणं त्यांनी सरकारपुढे मांडलं आणि ते मान्य झालं. अंभईकरांच्या हातून ही एक फार मोठी कामगिरी पार पडली यात संशय नाही. काही कलाकारांवर मात्र या ऑडिशनचे वेळी अन्याय झाला ही गोष्टही नाकबूल करून चालणार नाही. हा अन्यायही पुढे यथावकाश दूर झाला. पुढे काही वर्षांनंतर अंभईकर ऑडिशन कमिटीवर होतं. काही वर्षे जळगाव केंद्रावर सल्लागार कमिटीवरही होतं.

## संगीत कार्यक्रमात विविधता :

आकाशवाणीवर अंभईकरांनी शास्त्रीय आणि सुगम संगीताच्या कार्यक्रमात खूप विविधता आणली. साँग ऑफ दि मन्थ (मासिक गीत), संगीतिका, चायनिका, श्रुतिका, नाटकाचे पार्श्वसंगीत, भावसरगम, संगीत शिक्षा पाठ, संस्कृत श्लोक व स्तोत्रे, रोज सकाळी पाच मिनिटं चायनिका वाद्यवृंद असे अनेक प्रयोग त्यांनी केले 'शाकुंतल' या संस्कृत संगीतिकेत कण्वमुनींची भूमिकाही त्यांनी केली होती.

चीनचे तत्कालीन पंतप्रधान चौ-एन-लाय मुंबईला आले असताना त्यांच्या भव्य सत्कारप्रसंगी मुंबई आकाशवाणीतर्फे अंभईकरांनी सादर केलेला ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आपल्याला फार आवडल्याचं चौ-एन-लाय यांनी बोलून दाखवलं. याच सुमारास फिल्मस डिव्हिजननं आकाशवाणीच्या संगीत विभागाचे काम कसं चालतं हे दाखविणारा एक अनुबोधपट तयार केला. त्यात अंभईकर संगीत दिग्दर्शक असून ज्योत्स्ना भोळे या गायिका आहेत. हा अनुबोधपट अखिल भारतात सर्व भाषांतून दाखविण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या शताब्दी महोत्सवात ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेली 'यशोधरा' ही मूकाभिनय संगीतिका ३० जणांच्या वाद्यवृंदाच्या साथीने अंभईकरांनी केली.

## परदेश दौऱ्याची संधी हुकली :

अंभईकर आकाशवाणीवर असताना डेन्मार्कच्या कोपनहेगन येथील डॅनिश रेडिओ सर्व्हिसच्या एक अधिकारी श्रीमती गर्टूड मुंबई केंद्राला भेट द्यायला आल्या असताना भारतीय संगीतासंबंधी त्यांनी अंभईकरांबरोबर बरीच चर्चा केली. अंभईकरांच्या काही रचना, लोकगीते आणि ऑर्केस्ट्रा त्यांनी टेप करून घेतल्या. त्यानंतर लवकरच होणार असलेल्या इंटरनॅशनल फोक म्युझिक कॉन्फरन्समध्ये भाग घेण्याकरता अंभईकरांना त्यांनी निमंत्रण दिलं. कोपनहेगनला परतल्यानंतर डॅनीश रेडिओचं अधिकृत आमंत्रणही त्यांनी पाठवलं. त्यात एक महिन्याची संपूर्ण व्यवस्था ते करणार असल्याचा उल्लेख होता. अंभईकरांना कोपनहेगनला पाठविण्याचा प्रस्ताव मुंबई केंद्राने दिल्लीला पाठविला. तो मात्र फेटाळला गेला. डॉ. केसकर म्हणाले, 'वहाँ क्या रख्खा है?' पाठोपाठ अफगणिस्तान आणि तुर्कस्तानला जाण्याची अंभईकरांना आलेली संधीही याच कारणांमुळे निष्फळ ठरली.

## आकाशवाणीतील प्रचंड कार्य :

आकाशवाणीवर अंभईकरांचे स्वतःचे शास्त्रीय आणि सुगम संगीताच्या गायनाचे कार्यक्रम वरचेवर होत असत. त्याव्यतिरिक्त 'अमर संगीत' नावाचा एक कार्यक्रम. पंचविसाहून अधिक संगीतिका आणि चाळीसाहून अधिक वाद्यवृंदांच्या कार्यक्रमांचं संगीत दिग्दर्शन अंभईकरांनी केलंलं आहे. मराठी आणि हिंदी सुगम संगीत विभागाकरिता त्यांनी चाली दिलेली अनेक गाणी त्या काळात फार लोकप्रिय ठरली. त्यांच्यापैकी काहींचा नामोल्लेख करू.

माणिक वर्मांचे 'लावियले नंदादीपा' आणि आशा भोसलेंचं अंभईकरांबरोबरचे 'शंकर नाचत आहे' हे द्वंद्वगीत, माणिक वर्मांचं 'रामचंद्र मनमोहन' आणि 'उघड उघड पाकळी', मालती पांडेचं 'गडद निळे गडद निळे' आणि 'वादळ वाऱ्यापारी', सुमन कल्याणपूरचं 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा', निर्मला गोगटेचं 'आठवते का सांग तुला', आणि 'त्या स्थळी त्याच क्षणी', किशोरी आमोणकरांचं 'नयनमें रघुवीर', मोहनतारा अजिंक्य, मालती पांडे आणि मालती जोशींचं, 'गाइये, गणपती जगवंदना', सुधा मल्होत्रांचं 'उघडी नयन रघुनंदन' आणि आकाशवाणीच्या १६ जणांच्या गायक वृंदांचे 'श्रमिक, कृषिक, वैज्ञानिक, शिल्पी' ही सर्व गाणी फार लोकप्रिय ठरली.



## बालगंधर्वांचे अखेरचे ध्वनिमुद्रण :

बालगंधर्वांच्या उतरत्या काळात मराठी संगीत रंगभूमीला पडलेल्या या गोड स्वप्नांचं एक तरी ध्वनिमुद्रण आकाशवाणीच्या संग्रही असावं या हेतूनं अंभईकर मुद्दाम माहीमला त्यांच्या घरी मोठं टेप रेकॉर्डिंग मशिन, स्टेशन इंजिनियर, सहकारी श्री. व्ही. जी. जोग आणि तबला पेटीवादक अशा लवाजम्यासह गेले. नारायणराव अत्यंत थकलेले, दोन्ही पायांनी पंगु, पूर्वीचा आवाज न राहिलेले आणि मध्येच खोकला आणि दम यांनी बेजार होणारे अशा अवस्थेत पाहून ध्वनिमुद्रण कसं होणार याची सर्वांना चिंताच वाटत होती. शिवाय घर रस्त्यालगतच असल्यामुळे ध्वनिमुद्रणात कावळे, कबुतरांचे आवाज, फेरीवाल्यांचं ओरडणं, मोटारींचे भोंगे इत्यादी 'साऊंड इफेक्टस्' येणार होते. पण ध्वनिमुद्रणाला सुरुवात केल्याबरोबर लगेच बालगंधर्व नेहमीप्रमाणे गानसमाधिस्थ झाले. गाण्यातील शब्द, अर्थ, भावना, स्वर आणि लय यांच्याशी ते इतके समरस झाले की जणू त्यांच्या नसानसातून सूरस्रोत अखंड सुरू झाला. काही मिनिटं ध्वनिमुद्रण झाल्यानंतर त्यांच्या तोंडातली दातांची कवळी पडली तरीही त्यांचं गाणं सुरू होतं. अंभईकरांनी ध्वनिमुद्रण थांबवून त्यांना जणू जागं केलं आणि म्हटलं, 'नाना, कवळी पडली'. यावर ते म्हणाले, 'ठीक आहे देवा, घ्या रिटेक' आणि कवळी बसविल्यानंतर पुन्हा गाणं सुरू झालं. तरीही गंधर्वांच्या त्या विकलांग अवस्थेमुळे मनासारखं ध्वनिमुद्रण मात्र होऊ शकलं नाही.

## संतांबद्दलचे आकर्षण :

बाल्य आणि किशोरावस्थेत अंभईकरांचा अनेक संतांशी संबंध आला होता. हरिहर महाराजांचा उल्लेख मागे आला आहे. त्याशिवाय बाळाभाऊ पितळे, आबामहाराज गिरोलीकर, मौनीबाबा, ताजुद्दीनबाबा, केडगांवचे नारायण महाराज, मसुरकर महाराज, दासगणु महाराज, शिरडीच्या साईबाबांचे गुरू उपासनी महाराज, संत पाचलेगावंकर महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अवतार मेहेरबाबा अशा अनेक संतांना त्यांनी जवळून पाहिलं होतं आणि ते करीत असलेल्या चमत्काराबद्दल तर त्यांना अतिशय कुतूहल असे. मौनीबाबा कधी बोलत नसत. पण पुरुषांनी नमस्कार केला की ते उजव्या हाताचा अंगठा आणि बोट घासून त्यांना सुवासिक बुक्का देत. स्त्रियांनी नमस्कार केला तर त्याच पद्धतीने कुंकू काढून देत. पाचलेगांवकर

महाराज कुठेही असले तरी कोणाला साप चावल्याची तार त्यांना सात तासांच्या आत खामगांवच्या निर्गुण पादुकांच्या नावे पोचली की लगेच केवळ मानसिक सामर्थ्यानं सापाचं विष ते उतरवित आणि रुग्ण बरा होत असे. ते स्वत: धगधगीत निखाऱ्यावरून चालू शकत असतच पण त्यांनी दुसऱ्या कुणाला तसं सांगितलं तर महाराजांच्या उपस्थितीत ती व्यक्तिसुद्धा विस्तवावरून चालू शकत असे. संत पाचलेगांवकर महाराजांचा अंभईकरांवर लोभ असल्यामुळे महाराज १९५९ साली अंभईकरांना बरोबर घेऊन हिमालयाच्या यात्रेला निघाले.

## हिमालयाचा प्रवास आणि पहाडी लता :

अंभईकरांनी महिन्याची रजा घेतली आणि त्यांनी दिल्ली, पानिपत, कुरुक्षेत्र, जालंधर, लुधियाना, होशियारपूर, मंडी, कुलू, मनाली, लाहोल, पिस्ती अशा दीर्घ दौऱ्याला महाराजांसमवेत सुरुवात केली.

या यात्रेतील काही प्रसंग आणि अनुभव सांगण्यासारखे होतं. मंडीच्या आधी रेवाळेश्वर नावाचं क्षेत्र लागतं. इथं बारा महिने थंडी असते. हिवाळ्यात बर्फवृष्टी झाल्यावर सरोवरातील पाणी गोठून काही हिमनग तयार होतात. अंभईकर एका सरोवराच्या काठावर उभे राहिले असता सोसाट्याचा वारा सुरू झाला आणि एक झाडं, झुडपं, दगडमाती असलेला पहाड मंदगतीनं त्यांच्याजवळ आला. या पहाडातून एक सुमधूर लकेर ऐकू आली. आणि थोड्याच वेळात एक गौरवर्ण मध्यमवयीन तिबेटी कन्या त्यांच्याजवळ आली. तिला हिंदी भाषा नीट अवगत नसल्यामुळे बराचसा संवाद खुणांच्या भाषेनंच झाला. आपण बॉम्बेहून आलो असल्याचं त्यांनी सांगताच ती आनंदानं उडी मारून त्यांच्याजवळ येऊन बसली. अंभईकर तिला म्हणाले, 'तुझा आवाज रेवाळेश्वराच्या कृपेने फार गोड आहे.' त्यावर तिनं विचारलं, 'तुमच्या बॉम्बेच्या लाटा मंगुसकर सारखा आहे का?' आणि तिनं सहजगत्या एक लकेर घेऊन ती मध्यमातून तार षड्जापर्यंत येऊन थांबली. त्यावर अंभईकर तिला म्हणाले, 'आमची शहरी लता तर तू पहाडी लता.' एवढ्यात एकाएकी वाऱ्याची दिशा बदलली आणि वेग वाढला. तसा तो डोंगर हालत डोलत मागे सरकू लागला. ती गिरिकन्याही तशाच लकेरी घेत दूर गेली. अंभईकरांना निसर्गाच्या ध्वनिमुद्रिकेवर तिची तान फेडआऊट झाल्यासारखी वाटली.

या यात्रेत अंभईकरांना हिमालयानं मोहिनीच घातली. तिबेटी लोकांचे लोमहर्षण



ऋषींचे मंदिर, चिनी जपानी पद्धतीचे पॅगोडे, बिजली, महादेव ज्वालामाता, झुलते पाळणे, वसिष्ठ कुंड आणि अनेक मंदिरांना त्यांनी भेटी दिल्या. ज्वालामाता या मंदिराचे वैशिष्ट्य असं की दगडाच्या चारही कुंडातील पाण्यात अखंड ज्वाला पेटलेल्या असतात. जोरानं फुंकर मारून एखादी ज्वाला विझवली तर गॅस पेटल्याप्रमाणे क्षणार्धात पुन्हा पेटलेली दिसते. रासायनिक क्रियेमुळे असं होत असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. आख्यायिका अशी आहे की गोरखनाथाने याच गुहेत ज्वाला जळत असलेल्या पाण्यात खिचडी करून खाल्ली. वशिष्ठ कुंडातील एकामध्ये थंड पाणी तर दुसऱ्यात उकळतं. लोक घाणेरडे कपडे आणून त्या पाण्यात धूताना पाहून या पवित्र कुंडात स्नान करण्याचा मोह अंभईकरांनी आवरला. एका ठिकाणी तर त्यांना लयबद्ध सूर निर्माण करणारे वारे ऐकू आले.

## अशीही संगीताची मैफल

भेट दिलेल्या बहुतेक ठिकाणी अंभईकरांचं गाणं ऐकण्याची संधी तेथील स्थानिक मंडळींना मिळाली. मंडी शहरातील एका बैठकीचा हा त्यांचा अनुभव. मंडी शहर पूर्वीची हिमाचल प्रदेशाची राजधानी. सगळे रस्ते चढउताराचे. पहाडातील स्वच्छ पाण्याच्या अखंड प्रवाहात पाणी भरणाऱ्यांची गर्दी होती. अंभईकर उतरले होतं तेथील काही मंडळींनी त्यांच्या गायनाचा एक छोटासा कार्यक्रम केला. गाणं चालू असताना त्यांच्यापुढे एका सिल्कचा रंगीत नक्षीकाम केलेला मोठा रुमाल ठेवला होता आणि कार्यक्रम संपेपर्यंत रसिक त्यावर पैसे टाकीत असत. नायकिणींच्या अदा करून ठुंबरी, गझल, कव्वालीच्या बैठकीत लोक खूष होऊन पैसे तिच्यावरून ओवाळून पुढे ठेवलेल्या चांदीच्या तबकात टाकीत तसाच प्रकार. मात्र अंभईकरांच्या कार्यक्रमाला सारे जाणकार प्रतिष्ठित श्रोते असल्यामुळे त्या रुमालावर पडत असलेला पैशाचा पाऊस पाहून मौज वाटली. तबल्याच्या साथीला मोहिद्दीन खिलजी नावाचा धंद्याने ड्रायव्हर पण हौशी होता. त्याने त्या ढिगातील नाणी वेचून रुमालात बांधून ती गाठोडी अंभईकरांना दिली आणि नोटांची माळ करून ती त्यांच्या गळ्यात घातली. भैरवीने कार्यक्रम संपल्यावर त्या तबलजीच्या ९६ वर्षांच्या पित्यानं मोठ्या संकोचाने दुर्गा राग त्याचा आवडता असल्यामुळे तो ऐकण्याची इच्छा व्यक्त केल्यावरून अंभईकरांनी भैरवीनंतरही त्या वृद्ध रसिकांची इच्छा पूर्ण केली.

## बर्फावरील संगीत आणि तीनशे वर्षांचे महामुनि :

हिमालयाच्या कुशीत गेल्यानंतर तर खाली, वर, मागं, पुढं सगळीकडे बर्फच बर्फ होता. वातावरण इतकं पवित्र वाटत होतं की, अंभईकरांना एखादे ईशस्तवन म्हणावंसं वाटलं. पण सर्व इंद्रियं थंडीत गारठलेल्या स्थितीत असताना तोंड उघडणंही शक्य वाटत नव्हतं. पण एकामागं एक मोठ्या डौलात उभी असलेली हिमालयाची उत्तुंग शिखरं जणू ऋषिमुनींच्या रूपाने श्रोत्यांची भूमिका घेऊन आपलं गाणं ऐकायला उत्सूक झाल्याचा भास त्यांना झाला. इतक्यात एक ३०० वर्षांची तेज:पुंज, उंच, गौरकाय, आजानुबाहू, जटा पायापर्यंत वाढलेल्या, कमरेभोवती हरिणाजिनाचा लहानसा तुकडा गुंडाळलेला, डोळ्याच्या पापण्या गालापर्यंत आलेल्या, हातापायांची नखे दोन–अडीच इंच वाढलेली. सर्वांगाला भस्म लावलेली अशी व्यक्ति दिसली. समोर कोण आहे हे पहाण्याकरता डोळ्याच्या पापण्या झाकणं उघडण्याची 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती । तेथे कर माझे जुळती।' अशी अंभईकरांची स्थिती झाली. उत्स्फूर्तपणे त्यांच्या गळ्यातून 'मज हे सांब दयेचे देणे । चौ शून्यावरी खेचरी मुद्रा । षड्चक्रावरी लेणे ।' हे पद बाहेर पडलं. मन आनंदोत्साहानं भरून आलं. आपण केलंलं शंकराचं स्तवन बर्फाच्या रंगमंचावरून वायुलहरींच्या ध्वनिफितीवरून त्या कैलासराण्यापर्यंत निश्चित पोहोचलं असेल अशी त्यांच्या मनाची भावना झाली.

महिन्याची रजा घेऊन निघालेले अंभईकर या फिरतीवर दोन चार नव्हे तर दहा महिने राहिले. एवढ्यात काळात त्यांनी आकाशवाणीशी संपर्कही साधला नव्हता. पण परतताना दिल्लीत केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. केसकर यांना ते भेटले तेव्हा ताबडतोब मुंबईला जाऊन कामावर रुजू व्हा, असं सांगितल्यामुळे त्यांना आकाशवाणीनं पुन्हा कामावर घेतलं. नाहीतर त्यांची नोकरी संपुष्टात आणण्याची पूर्ण तयारी मुंबई केंद्रात झाली होती. अंभईकर यात्रेवरून परत आल्यानंतर १९६० झाली त्यांना दुसरं कन्यारत्न झालं. या मुलीचे नाव त्यांनी (कदाचित हिमालयाचा प्रभाव अजून मनावर असल्यामुळे) 'हिमगौरी' असं ठेवलं. तिनं खामगावला होमिओपॅथीचे शिक्षण घेऊन ती डॉक्टर झाली. १९८२ साली तिचा नागपूरला डॉ. रवींद्र देशपांडे यांच्याबरोबर विवाह झाला. तिला 'आदिति' नावाची मुलगी आहे.



# न उलगडणारं कोडं



## मुंबईहून खामगांव :

अंभईकर आकाशवाणीच्या सेवेत पुन्हा रुजू झाले खरे पण संत पाचलेगांवकर महाराजांच्या समवेत त्यांनी केलंल्या दहा–अकरा महिन्यांच्या प्रदीर्घ यात्रेत त्यांनी भव्य आणि दिव्य असं पाहिलं होतं. समाज जीवनाचंही निरीक्षण केलं होतं. त्याचा परिणाम म्हणून त्यांना आपल्या रोजच्या जीवनात एक प्रकारचा तोचतोपणा वाटू लागला. अशा मन:स्थितीत ते असताना त्यांच्या गुरुंनी, संत पाचलेगांवकर महाराजांनी नोकरी सोडून खामगांवला सहकुटुंब सहपरिवार येऊन सेवा करण्याची इच्छा नव्हे आज्ञा केली आणि अंभईकरांच्या जीवनाला एकदम कलाटणी मिळणारा एक निर्णय त्यांनी इतर कसलाही विचार न करता घेतला. परिणामी १९६१ ते १९८२ ही २०–२१ वर्षे ते जवळ जवळ विजनवासात गेले. सर्वस्वी अतर्क्य आणि खुद्द अंभईकरांच्या स्वभावधर्माशीही विसंगत ही घटना केवळ नियतीची इच्छा अशी संबोधावी लागेल. त्यांच्या मोठ्या मुलीच्या शब्दांत ते 'ते एक न उलगडणारं कोडं आहे', आपण करतो ते योग्य की अयोग्य अशा काहीसा संभ्रम अंभईकरांनाही पडला होता. समोर आलेल्या पर्यायाचा त्यांनी अविवेकानं स्वीकार केला एवढे मात्र खरं.

वीस वर्षे साहित्य, संगीत, नाट्य इ. क्षेत्रातील चांगल्या जाणकार मंडळींशी

जवळून परिचय झाला असलेले अंभईकर या तिन्ही क्षेत्रापासून दूर राहिल्यामुळे १९८२ साली ७० वर्षांचे होऊन स्वेच्छेने पत्करलेला आपला विजनवास संपवून ते परत आलं तेव्हा त्यांची अवस्था रिपेन्हॅन विकल सारखी झाली. तरी साहित्य, संगीत, नाट्यक्षेत्रात सातत्यानं कार्य करीत राहिलं तरच कलावंत टिकू शकतो. ही क्षेत्रच अशी आहेत दोन दशकांनंतर परत आलेले व वृद्धावस्थेकडे झुकलेले अंभईकर या क्षेत्रांतून दूर फेकल्यासारखे वरवर दिसत असले तरी याही अवस्थेत त्यांचं खंबीर मन गोंधळून न जाता शून्यातून जगत् निर्माण करणाऱ्या म्हणजे उद्याचा संगीत संसार उभा करण्याकडे धाव घेऊ लागलं. जीवन हा सुखदु:खाचा संग्राम असून 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या वचनांप्रमाणं वागण्याचा प्रयत्न केला तरच या अधिभौतिकत्वाचा अतिरेक झालेल्या जगात निभाव लागेल, असं त्यांचं स्पष्ट मत आहे. संत महात्म्यांची वचनं नुसती पाठ करून व्याख्यानं झोडण्याचा धंदा करण्यासाठी भांडवल म्हणून त्याचा उपयोग करण्याकरता नसून ती आपल्या आचरणानं दुसऱ्याला व्यावहारिकजीवनात किती उपयुक्त आहेत हे निर्भिडपणे दाखवून देण्याकरता आहेत, असंही ते म्हणतात. अमाप पैसा नि किर्ती कमावलेल्या कलाकारांपासून अंभईकर जरी दूर गेल्याचा भास झाला तरी त्यांत सर्वस्वी ते दोषी ठरत नाहीत. अनेक क्षेत्रातील ज्या मान्यवरांचा सहभाग त्यांना मिळाला त्यांच्यासंबंधीच्या आठवणी त्यांच्या पूर्वायुष्यातील आहेत.

## न. चिं. केळकरांची वन्देमातरम्‌ला पसंती :

अंभईकरांच्या पुढील चरित्रभाग छापण्याआधी ज्या अनेक क्षेत्रातील मान्यवरांचा सहवास त्यांना मिळाला त्यांच्या संबंधीच्या आठवणी निवेदन करतो.

साहित्यसम्राट न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांचा आणि अंभईकरांचा चांगला परिचय होता. तात्यासाहेबांना संगीताचं ज्ञान चांगलं होतं. मुंबईच्या एका कार्यक्रमाला केळकर अध्यक्ष होतं. त्या कार्यक्रमाच्या शेवटी अंभईकरांनी आपलं मिश्र खंबावती रागाच्या चालीतील वन्देमातरम् गायिलं. कार्यक्रम संपल्यानंतर आपल्या अंगावरचं उपरणं सावरीत, डोक्यावर पगडी आणि पायात पुणेरी जोडा घातलेले तात्यासाहेब स्वत: अंभईकरांजवळ आलं आणि पाठीवर थाप देऊन म्हणाले, 'खंबावती माझा आवडता राग आहे आणि तुम्ही लावलेली चाल मला विशेषच आवडली. कधी पुण्याला आलात तर तुमचं गाणं अवश्य ऐकवा.'



## केळकरांच्या घरची संगीत मैफल :

नंतर मकर संक्रांतीच्या दिवशी अंभईकरांचा गाण्याचा कार्यक्रम तात्यासाहेबांच्या पुष्करणी बंगल्यावर झाला. वेळ सकाळची प्रसन्न आणि सुखद थंडीची. त्यामुळे अंभईकर हिंडोल आणि बिलावल राग गायिले. पण मग तात्यासाहेबांनी बहार राग गाण्याची फर्माइश केली. त्यावर अंभईकर म्हणाले की, 'बहार राग रात्रीचा. तो सकाळी गाणे हिंदुस्थानी संगीत शास्त्राला संमत नाही.' तात्यासाहेब म्हणाले, 'अहो शास्त्र कसलं घेऊन बसलात? आणि शास्त्रात तरी एकमत कुठे असतं. रसिक ठरवतील ते शास्त्र समजावं. संगीत नाटकात रात्रीच्या रागातली पदं दुपारी किंवा सकाळच्या रागातली रात्री म्हटली जातातच ना? निरनिराळ्या प्रकारच्या अत्तरांचा सुवास, निरनिराळ्या प्रहरी कदाचित कमी जास्त मोहवीत असेल पण कोणत्याही प्रहरी त्याला सुवास हा असतोच. पुढे अंभईकरांना ते हिमालयाच्या प्रवासात असताना एका वृद्ध रसिकाच्या इच्छेवरून पहाटे कार्यक्रम संपल्यावर दुर्गा राग गात असताना तात्यासाहेबांच्या वरील उद्गारांची आठवण झाली.

तात्यासाहेबांनी केलेल्या फर्माइशीचा मान राखून अंभईकर मग बहार राग गायिले आणि त्यांनी कार्यक्रम संपविला. पेटीचा सूर धरण्याकरिता त्यांनी एक काडी अडकवली होती. ती काढून पेटी बंद केल्यावर बाजूला फेकली. तात्यासाहेबांच्या लक्षात आलं मात्र, 'असू द्या. संध्याकाळी तिचा उपयोग होईल.' असे म्हणून ती काडी ताबडतोब उचलून त्यांनी काड्याच्या पेटीत घालून ठेवली. दिसायला क्षुल्लक गोष्ट पण डोंगराएवढ्या या माणसाच्या अंगची टापटीप, काटकसर, स्वच्छता इ. गुण प्रत्ययाला आले.

## कल्याणचं साहित्य संमेलन :

नाटक, चित्रपट, साहित्य, पत्रकारिता, आत्मचरित्र, विडंबन काव्य, बाल वाङ्मय आणि शिक्षणशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत चतुरस्त्र उत्कृष्ट कामगिरी केलेले आचार्य अत्रे हे महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व होतं. अंभईकरांचा आणि आचार्य अत्रे यांचा चांगला स्नेह होता. नोव्हेंबर १९४० मध्ये कल्याण येथे मुंबई उपनगर मराठी साहित्य संमेलन भरलं होतं. या संमेलनात अंभईकरांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. दुसऱ्याच दिवशीच्या मेजवानीच्या वेळी अंभईकरांच्या एका बाजूला आचार्य अत्रे आणि दुसऱ्या बाजूला प्रा. गजेंद्रगडकर बसले होतं. अत्रे अंभईकरांना म्हणाले,

'या पंगतीत तुम्हाला श्लोक म्हणायला हवा.' अंभईकर म्हणाले, 'मला श्लोकबिक काही येत नाही.' तेव्हा प्रा. गजेंद्रगडकर म्हणाले, 'श्लोक नाही तर एखादी कविता, नाटकातलं पद म्हटलंत तरी चालेल.' दोघा मान्यवरांच्या आग्रहाचा स्वीकार करून अंभईकरांनी सौभद्र नाटकातले 'कोण तुज सम सांग मज गुरुराया' हे पद म्हटलं. अत्रे म्हणाले, 'वा, छान. आता जिलेबी खा. पण भजी मात्र खाऊ नका. रात्री पुन्हा गायचे आहे.'

## आचार्य अत्र्यांचा 'मी उभा आहे' प्रयोग :

एक दिवस अत्र्यांचा अंभईकरांना निरोप आला की, मला कोल्हापूरला माझ्या 'मी उभा आहे.' या नाटकाच्या प्रयोगाला जायचे आहे. तर तुम्ही माझ्याबरोबर माझ्या गाडीतून चला आणि कोल्हापूरच्या श्रोत्यांना तुमचं गायन आणि वन्देमातरम् ऐकवा. अंभईकरांनी आनंदानं होकार दिला. या प्रवासात अत्र्यांच्या स्वभावातील बहुरूपी, बहुढंगी पैलूंचा त्यांना परिचय झाला. पण त्यांच्याच बरोबर त्यांच्या आयुष्यातील अनेक गंमतीदार प्रसंग यांच्यामुळे चांगली करमणूकही झाली.

कोल्हापूरला हे दोघे पोहोचले त्याच दिवशी रात्री पॅलेस थिएटरमध्ये 'मी उभा आहे' या नाटकाला हाऊसफुल्ल गर्दी होती. तिसऱ्या घंटेनंतर मखमली पडदा वर गेला आणि प्रत्यक्ष नाटककाराचं भव्य नि दिव्श दर्शन होताच कोल्हापूरकरांनी कडकडून टाळी दिली. आपल्या भाषणात अंभईकरांचा परिचय करून देताना आचार्य अत्रे म्हणाले की, 'या तरुण गायकानं वन्देमातरम् राष्ट्रगीताला अत्यंत परिणामकारक गोड आणि गंभीर अशी चाल लावली आहे. हे गीत त्यांचं इतर गायन कोल्हापूरच्या रसिकांना ऐकता यावे म्हणून मुद्दाम मी त्यांना आणलं आहे.'

## ना. सी. फडके तबलजी? :

अंभईकराच्या कोल्हापूरच्या ह्या वास्तव्यात सरस्वती सिनेटोनच्या स्टुडिओमध्ये त्यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. श्रोत्यांमध्ये स्वत: आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, बाबूराव पेंढारकर, मास्टर विनायक, के. नारायण काळे यांच्यासारख्या सिनेसृष्टीतील सन्मान्य व्यक्ति उपस्थित होत्या. बैठकीनंतर खांडेकरांनी सुचविलं की तुम्ही तुमचं गाणं आप्पासाहेब फडक्यांना अवश्य ऐकवा. ते स्वत: चांगले संगीतज्ज्ञ आहेत. प्रा. ना. सी. फडके हे त्या काळात कादंबरी लेखक म्हणून अत्यंत लोकप्रिय असल्यामुळे



अंभईकरांना ही सूचना स्वागतार्ह वाटल्यास नवल नाही. दुसऱ्या दिवशी आगाऊ सूचना देऊन अंभईकर आप्पासाहेबांच्या उभ्या मारुती मंदिराजवळ असलेल्या घरी पोहोचले. उत्तम कादंबरीकार, रसज्ञ टीकाकार, पट्टीचे वक्ते, क्रिकेट आणि संगीतातील जाणकार असलेल्या आप्पासाहेबांसमोर अंभईकरांच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला. तरीही त्यांनी भीतभीत स्वत:चा परिचय करून दिला. तेव्हा आप्पासाहेब म्हणाले, 'इतक्या लहान वयात तुम्ही स्वत:चा एनसायक्लोपीडीयाच सादर केलात. चांगलं आहे. उद्या संध्याकाळी आपण बसू. जमेल ना?' अंभईकरांनी आनंदाने होकार दिला आणि साथीच्या व्यवस्थेबद्दल विचारणा केली. त्यावर अप्पासाहेब म्हणाले, 'ते सर्व मी बघतो. पण एक गोष्ट लक्षात ठेवा की गांधी आणि नेहरूंना तुमचं गाणं आवडलं म्हणून ना. सी. फडक्यांना ते आवडेलच असं मात्र नाही.' अंभईकरांनी विनयाने उत्तर दिले, 'माझा तसा गैरसमज बिलकुल नाही. उलट आपल्यासारख्या संगीततज्ज्ञाचं स्पष्ट मत मला कळलं तर मी सुधारणा आणि प्रगती करू शकेन. अशा प्रांजळ हेतूनेच मी आपल्याला गाणं ऐकवू इच्छितो.'

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी अंभईकर आप्पासाहेबांच्या घरी गेले. खाणंपिणे, गप्पा वगैरे झाल्या. पण साथीदारांचा विशेषत: तबलजींचा पत्ताच नव्हता. जवळ जवळ एक तास वाट पाहिल्यानंतर मात्र एका मिनिटाचाही कधीच अपव्यय न करणारे आप्पासाहेब रागावले आणि म्हणाले, 'वेळेवर येईल तो कलावंत कसला? येईल तेव्हा येवो, तूर्त मीच ठेका धरतो.' असे म्हणून त्यांनी तबला पुढे ओढला आणि सुरात लावला. अंभईकरांनीही गाण्याला सुरुवात केली. गायन संपल्यानंतर आप्पासाहेबांनी पसंतीची पावती दिली आणि अंभईकरांच्या अंगावर मूठभर मांस चढलं. आप्पासाहेब फडक्यांच्या अंगचा वादक कलावंत हा सुप्त गुण या निमित्ताने प्रगट झाला तो वेगळाच.

## स्वातंत्र्यवीर सावरकर :

स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्या काळच्या तरुण पिढीत जणू देवत्व पावलेले महामानव. १९३७ साली प्रबोधनकार केशवराव ठाकरे यांच्या घरी अंभईकरांचं गाणं होतं. त्याला स्वत: तात्याराव सावरकर, बाबाराव आणि डॉ. बाळाराव हे तिघंही बंधू उपस्थित होते. तात्यांची प्रकृती बरी नसल्यानं ते दूर एका खिडकीत बसून ऐकत होतं. नुकतेच ते रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मुक्त होऊन आलं होतं. रात्री १२

वाजता त्यांना झोपायला जायचं असल्यामुळे त्यांनी त्यांच्या 'संन्यस्त खड्ग' या नाटकातले 'सती जातात वीरांगना' हे गीत ऐकविण्याची इच्छा प्रदर्शित केली. म्हणून अंभईकरांनी ते गायलं. तात्यारावांनी प्रसन्न मुद्रेनं मान डोलावली आणि ते झोपायला गेले. स्वातंत्र्यवीरांबरोबरची अंभईकरांची ही पहिलीच भेट.

नंतर पुढल्याच वर्षी नागपूरला अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अधिवेशनात सावरकरांनी त्यांचं वीरसप्रधान ध्वजगीत 'अखिल हिंदु विजयध्वज हा उभवुं या पुन्हां' आणि संपूर्ण वन्देमातरम् म्हणण्याकरता अंभईकरांना मुद्दाम आमंत्रित केलं. दोन्ही गीतं फार आवडल्याबद्दल तात्यारावांनी तिथल्या तिथं त्यांना शाबासकी दिली.

पुढे मदुरा येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला ते जात असताना त्यांचा स्पेशल डबा गर्दी टाळण्याकरता मद्रास रेल्वे स्टेशनच्या यार्डात उभा केला होता. त्यावेळी मागं उल्लेख केलंल्या संगीत परिषदेच्या निमित्तानं अंभईकरांचा मुक्काम मद्रासला होता. तात्यारावांचा डबा रेल्वे यार्डात उभा असल्याची बातमी समजली तेव्हा चंद्रपूरचे दादासाहेब देशमुख वकील, नागपूरच्या 'महाराष्ट्र'चे सहसंपादक श्री. उळाभाजे आणि अंभईकर यांना रहावेना. आधी न कळवता अनाहूतपणे गेलेले बरं नाही याची जाणीव असूनही हे तिघं थेट तात्यांच्या डब्यात शिरले. आपल्या कामात व्यत्यय आल्यामुळे तात्याराव नाराज झाल्याचं त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. पण आलेले तिघेही त्यांच्या पूर्व परिचयाचे असल्यानं त्यांना लागलीच टाळणं तात्यारावांसारख्या लोक संग्राहक नेत्याला उचित वाटलं नाही आणि अगदी थोड्या वेळात त्यांनी प्रत्येकाचा परामर्श घेतला. अंभईकरांना ते म्हणाले की, ''माझा डबा केवळ गर्दी टाळण्याकरता यार्डात लावायला सांगितला. मला बिलकूल वेळ नाही. तुमचं गाण ठीक चाललं आहे ना! दादरला प्रबोधनकारांच्या घरी आणि आमच्या नागपूरच्या अधिवेशनात तुमचं गाणं ऐकल्याचं माझ्या लक्षात आहे. तुम्ही संपूर्ण वन्देमातरम्ची बांगडी (ध्वनिमुद्रिका) काढली तर तिचा प्रचाराला चांगला उपयोग होईल. बरं 'मी लागू आता माझ्या कामाला?'' यानंतर या थोर नेत्याला अभिवादन करून ताबडतोब त्यांचा निरोप घेण्याशिवाय या तिघांना गत्यंतरच नव्हतं.

१९४४ साली मुंबईला सर कॉवसजी जहांगिर हॉलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचे भाषण होतं. भाषणानंतर अंभईकरांनी संपूर्ण 'वन्देमातरम्' राष्ट्रगीत गायनाला सुरुवात केली. 'तुमि विद्या तुमि धर्म' या ओळीनंतर स्मरणशक्तीने त्यांना दगा दिला. पुढची ओळ दोन तीन वेळा आळवली. तात्यारावांच्या लक्षात ही गोष्ट ताबडतोब आली



आणि त्यांनी अंभईकरांकडे पाहून 'तुमि हृदि तुमि मर्म' या ओळीचे प्रॉम्पटिंग केल्यामुळे इतर कोणाला न कळता पुढच्या ओळी ते गाऊ शकले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सहवासातले हे सोनेरी क्षण म्हणजे अंभईकरांचे एक आनंदनिधान आहे.

## डॉ. वि. भि. कोलते :

विदर्भातील विद्वद्वर्य महानुभाव पंथाचे गाढे अभ्यासक आणि नागपूर विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु डॉ. वि. भि. तथा भाऊसाहेब कोलते यांचे बरोबरचा अंभईकरांचा स्नेहसंबंध प्रदीर्घ कालाचा आहे. अमरावती येथे किंग एडवर्ड कॉलेजच्या (आजचं विदर्भ महाविद्यालय) वार्षिक स्नेहसंमेलनात अंभईकरांच्या गायनाचा कार्यक्रम होता. कॉलेजमधील सर्व कार्यक्रम रात्री १२ वाजता बंद झाले पाहिजेत, असा प्रि. टॅटस्विन यांचा दंडक होता. ते स्वत:ही गाण्याला उपस्थित होतं. पण कार्यक्रम रंगत होता व विद्यार्थी वर्ग रसिकतेने ऐकत होता. म्हणून बारा वाजायला आले तेव्हा ह्यांनी ही वेळ एक तास आपणहून वाढवून दिली. कडक शिस्तीचा भोक्ता म्हणून प्रसिद्ध असलेल्या या ब्रिटिश रसिकाने असा अपवाद करून तो स्वत:ही शेवटपर्यंत गाण्याची गोडी अनुभवीत उपस्थित राहिला ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे.

१९३६ साली अंभईकरांनी भाऊसाहेबांच्या पत्नी सौ. उषाताई यांचा आवाज अत्यंत गोड असल्याने लक्षात घेऊन त्यांना काही गाणी शिकवली आणि ते एच.एम.व्ही.त नोकरीला लागण्यापूर्वीच कंपनीतर्फे त्यांच्या गाण्यांच्या तीन-चार ध्वनिमुद्रिका काढल्या. काही काळानंतर कोलत्यांच्या 'लव्हाळी' या काव्यसंग्रहातील दोन गीते स्वत: गाऊन वऱ्हाडी गीतांचा साज अखिल महाराष्ट्रापुढे आणण्याकरिता 'माझ्या छकुलीचे डोळे' आणि 'काय झालं सोनुलीला' ही दोन बालगीतें एच.एम.व्हीमार्फत ध्वनिमुद्रित केली. भाऊसाहेबांनी रचलेले 'महात्मन् तुझे नाम घेता मुखी' हे सुप्रसिद्ध गीत अंभईकरांनी मुंबई व नागपूर दूरदर्शनवर दोन वेळा सादर केलं. अंभईकर आणि कोलते या दोघा वयोवृद्धांची परस्परांबद्दलची आपुलकी अद्यापही टिकून आहे.

## ग. त्र्यं. माडखोलकर :

नागपूरच्या 'तरुण भारत'चे संस्थापक, संपादक आणि सुप्रसिद्ध कादंबरीकार व टीकाकार ग. त्र्यं. माडखोलकर यांनाही अंभईकरांबद्दल फार प्रेम वाटत असे. एकदा

तर मुंबईला अंभईकरांच्या घरी प्रा. वि. ह. कुळकर्णी आणि प्रा. अनंत काणेकर या प्राध्यापकद्वयांसह ते आले. या त्रिमूर्तींच्या दर्शनाने अंभईकरांना फार आनंद झाला. ते रोजचा रियाज करीत होतं. पण या तिघांना पाहताच त्यांनी तंबोरा खाली ठेवला आणि पुढे होऊन त्यांचे स्वागत केलं. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर भाऊसाहेब म्हणाले, 'तुम्ही नागपूर सोडल्यापासून तुमचा आवाज ऐकला नाही. तेव्हा आज तुमचं गाणं किंवा एखादं भावगीत तरी ऐकल्याशिवाय जाणार नाही.' अंभईकरांनी नकार देणे शक्यच नव्हतं. त्यांनी लगेच पेटी काढली आणि दोन भावगीतं म्हटली. त्यातलं दुसरं होतं, 'वळवाच्या सरी परी आलिस माझ्या दारी' हे कवि बा. भ. बोरकर यांचं. या कवितेतील 'थरारली ही कमळे सगळी' ही ओळ पुन्हा पुन्हा आळवून म्हणताना ते 'थरारली ही सगळे कमळी' असं म्हणू लागले. तिघांपैकी कोणीच काही प्रतिक्रिया तेव्हा व्यक्त केली नाही. पण गाणे संपल्यानंतर मात्र भाऊसाहेब म्हणाले, 'अंभईकर, सगळे कमळी ही काय भानगड आहे!' तेव्हा कुठे त्यांच्या लक्षात चूक आली. नंतर चुकीची दुरुस्ती करून 'थरारली ही कमळे सगळी । मकरंदाला फुटली उकळी' अशी व्यवस्थित ओळ गाऊन ते गीत पुन्हा एकदा सर्वांना ऐकवले. एवढ्यात कॉफी आली. पण आपल्या चुकीमुळे अंभईकर थोडेसे शरमिंदे झाल्याचे वाटल्यावरून अनंत काणेकर त्यांना मिस्किलपणे म्हणाले, ''अंभईकर, त्याचे काही वाटून घेऊ नका. 'टंग ऑफ स्लिप' मुळे असं कधी कधी होतं.'' स्लिप ऑफ द टंगमध्ये स्वत:च टंग स्लिप करून काणेकरांनी हेतुपुरस्पर 'टंग ऑफ स्लिप' असे म्हटल्यामुळे उपस्थितात प्रचंड हंशा झाला.

## लता मंगेशकर :

लता मंगेशकर म्हणजे सुगम संगीताला पडलेलं सोनेरी स्वप्नच. एच. एम.व्ही. आणि आकाशवाणीवर लतादीदींनी गायलेल्या अनेक हिंदी आणि मराठी बोलपटातील गीताचं, भावगीतांचं आणि भक्तिगीतांचं ध्वनिमुद्रण अंभईकरांनी केलेलं असल्यामुळे जवळून परिचय झाला. संगीत दिग्दर्शकाने एक-दोनदा सबंध गाण्याची चाल ऐकवली म्हणजे ती सर्व बारकाव्यासह लताच्या लक्षात रहाते आणि वाद्यवृंदाकडून ते गाणे आधीच घटवून घेतलेलं असल्यामुळे ध्वनिमुद्रण जवळ जवळ लगेच सुरू करता येतं ह्या आता सर्वश्रुत असलेल्या गोष्टीचा प्रत्यय अंभईकरांना अनेकदा आला आहे. गाण्याच्या शब्दातील अर्थाशी आणि चालीतील स्वरभावनांशी सुहास्य मुद्रेनं तादात्म्य



पावून क्वचित संगीत दिग्दर्शकानं न सुचविलेली एक दोन सौंदर्यस्थळं पदरची घालून त्या ध्वनिमुद्रण पुऱ्या करून मोकळ्या होतात हा एक सुखद अनुभव असतो. स्टुडिओत लताजी असल्या की सारं वातावरण प्रसन्न, आनंदित होत असते. कधी काही तांत्रिक बिघाड झाला आणि पाच-दहा मिनिटं थांबावं लागलं तर तेवढा वेळ त्या मनमोकळेपणानं सहकाऱ्यांबरोबर गप्पा मारीत. किंवा क्वचित त्यांची टिंगल करीत घालवीत. अंभईकरांना त्या काळात गोवा लॉटरीची चार चार आण्याची काही तिकिटं दर आठवड्याला घ्यायची सवय असल्याचं लताजींना माहीत होतं. असेच एकदा थोडावेळ ध्वनिमुद्रण थांबवण्याचा प्रसंग आला, तेव्हा अंभईकरांच्या खिशातून डोकावणारं त्यांचं लॉटरीचं तिकीट पाहून त्या म्हणाल्या, 'दादा, गेल्या आठवड्याच्या तिकिटाचे पाच हजार आणि या आठवड्यातल्या तिकिटांचे पाच हजार मिळून दहा हजारांचे तरी तुम्ही धनी होणार.' यावर एकच हंशा झाला. गोवा लॉटरी अंभईकरांना कधी प्रसन्न होत नाही, हे सर्वांनाच माहीत होते.

त्या काळात मुंबईच्या फोर्ट विभागात आजच्या एवढी रहदारी नसे. एकदा तर भरदुपारी ध्वनिमुद्रण संपलं आणि रस्त्यावर रहदारी तुरळक दिसली म्हणून लतानं अंभईकरांना घरापर्यंत सोबत येता का असं विचारलं. स्वाभाविकच त्यांनी मान्यता दिली. आणि मग चार आण्याच्या व्हिक्टोरियातून जाताना लताच्या नाना चौकाजवळील शास्त्री हॉलमधील निवासस्थानी पोहोचेपर्यंत वाटेत झालेल्या गप्पांतून लताचा मनमोकळेपणा, उत्साह, आत्मविश्वास, निरहंकार आणि कामाबद्दलच्या निष्ठेची त्यांना जाणीव झाली.

## मा. कृष्णराव :

कृष्णा मास्तर उर्फ कृष्णराव फुलंब्रीकर म्हणजे त्या काळातलं संगीत क्षेत्रातलं एक बडं प्रस्थ. अनेक बैठकीत अंभईकरांनी त्यांच्यामागं तंबोरा धरून कंठ साथही दिली आहे. नागपूरला श्रीमंत बाबूराव देशमुखांच्या घरी झालेल्या एका बैठकीत 'वद जाउ कुणाला शरण' हे पद मास्तरांनी सव्वा तास गाऊन रेकॉर्ड मोडलं. पण एकदा घेतलेली हरकत सव्वा तासात पुन्हा झाली नाही हे तंबोऱ्यावर असलेल्या अंभईकरांना जाणवल्याशिवाय राहिलं नाही. मास्तरांबद्दलचा त्यांचा आदर या एका बैठकीत द्विगुणित झाला. तबल्यावर अहमदजान तिरखवाँ, सारंगीवर कादरबक्ष आणि ऑर्गनवर हरीभाऊ देशपांडे अशा या त्रिवेणी संगमाची बैठक चिरस्मरणीय ठरली.

सोप्या आणि कोणाचाही गळ्यात बसतील अशा चाली लावण्यात मास्तरांचा हात कोणी धरू शकत नसे. त्यामुळे 'झिंझोटी' हा राग मास्तरांचा अतिशय आवडता होता. कारण रागाचं नाव आक्रस्ताळेपणाचं वाटलं तरी बाळबोध वळणाच्या स्त्रियांना सहज गाता येईल असा राग आहे. 'शारदा' नाटकातील 'कधी करिशी लग्न माझे तुज ठावे ईश्वरा' आणि 'सौभद्र' नाटकातील 'वैशाख मासि वासंतिक समय शोभला' ही या रागाची प्रसिद्ध उदाहरण. रागाचं हे सुबोधपण लक्षात घेऊनच मास्तरांनी 'वन्देमातरम्' या गीताला 'झिंझोटी' रागातली चाल लावली होती. याच काळात अंभईकर वन्देमातरम्ची आपली 'मिश्र खंबावती' रागातली चाल सर्वत्र लोकप्रिय करीत होते.

या घटनेतून एक विचित्र संघर्ष उभा राहिला. आचार्य अत्र्यांनी 'वसंतसेना' बोलपट भव्य प्रमाणात निर्माण करण्याचं ठरवलं. त्याचं संगीत दिग्दर्शन मास्तर कृष्णराव यांच्यावर सोपवलेलं होतं. अत्रे यांच्याशी परिचय असल्यामुळे आणि मास्तरांचं ज्येष्ठत्व मानीत असल्यामुळे अंभईकरांनी आपणास मास्तरांचा सहाय्यक संगीत दिग्दर्शक म्हणून घ्यावं, अशी विनंती अत्र्यांना केली. अत्र्यांची याला हरकत नव्हती परंतु ते म्हणाले की, आधी मास्तरांशी बोलून घ्या, मग पुढचं सर्व मी करतो. दोन दिवसांनी अंभईकर मास्तरांना त्यांच्या घरी जाऊन भेटले. तेव्हा मास्तर म्हणाले, 'बरं झालं तुम्ही आलात ते. कालच अत्रे तुमच्याबद्दल मला बोलले आणि संगीतातला तुमचा अनुभव एवढा आहे की, सहाय्यक म्हणून मला तुमचा बराच उपयोग होईल. पण...' अंभईकरांनी पण काय म्हणून विचारलं. तेव्हा मास्तरांनी दिलेल्या उत्तरानं ते दिङमूढच झाले. मास्तर म्हणाले, 'आपण दोघे मिळून 'वसंतसेना' चित्रपटाचं संगीत अति उत्कृष्ट करून दाखवू. पण माझी अट अशी आहे की तुम्ही वन्देमातरम्च्या तुमच्या 'मिश्र खंबावती'तील चालीचा आग्रह सोडून माझ्या 'झिंझोटी'तील चालीचा प्रसार करण्याचं कबूल केलं पाहिजे.' मास्तरांच्या या उद्गारातच त्यांच्या चालीचा पराभव सिद्ध झाला आहे. अंभईकरांनी मास्तरांची अट मानली नाही आणि परिणामी त्यांना 'वसंतसेना' चित्रपटाचे सहाय्यक संगीत दिग्दर्शक होता आलं नाही.

हा एक प्रसंग सोडला तर अंभईकरांचा आणि मास्तरांचा स्नेह अखेरपर्यंत टिकून होता. मास्तरांच्या आजारपणात अंभईकर पुण्याला त्यांच्या भेटीला गेले असताना दोघांनी मिळून अनेक जुन्या आठवणींची उजळणी केली. मास्तरांनी त्यावेळी अंभईकरांना स्वरचित रागमालेचे पुस्तक सप्रेम भेट दिलं आणि अंभईकरांनी त्यांच्या इच्छेनुसार मास्तरांचं एक आवडतं गीत 'सहकुटुंब सहपरिवार तुझा मी दास विठुराया'



काहीही साथीशिवाय हलक्या आवाजात गाऊन दाखविलं. मास्तरांचा कंठ दाटून आला आणि त्यांनी अंभईकरांना शुभेच्छा दिल्या.

## अब्दुल करीम खाँ :

अब्दुल करीम खाँ साहेब त्या काळात हिंदुस्तानी संगीतातील अनभिषिक्त सम्राट मानले जात. सर्व गायक आणि वादक यांच्यात त्यांच्याबद्दल दबदबा होताच. पण कार्यक्रमाचे संयोजक आणि श्रोतेसुद्धा त्यांना वचकून असत. त्यांच्या करड्या स्वभावाची जाणीव करून देणारा एक प्रसंग मोठा गंमतीदार आहे. अंभईकर अब्दुल करीम खाँ साहेबांबरोबर विदर्भात दौऱ्यावर होतं. एका गावी गाणं न कळणाऱ्या श्रोत्यांचाच भरणा अधिक होता. खुर्चीवरील काही 'वऱ्हाडी माणसं' तर समोरच्या रिकाम्या खुर्च्यांवर पाय पसरून बसली होती. अंभईकर तंबोऱ्यावर होतं. त्यांना श्रोत्यांची ही वर्तणूक खाँ साहेबांना मानवणार नाही याची जाणीवही होती. पण ते काही करू शकत नव्हते. गाणं सुरू होऊन पाच सात मिनिटातच काही अपेक्षित जागी वाहवा, बहुत अच्छा, असा काही प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा खाँ साहेब मागे वळून अंभईकरांना म्हणाले, 'यहा सब गधे बैठे है । उनके सामने क्या गाना? चलो, तंबोरा बंद करो ।' आणि मॅनेजरला म्हणाले, 'तुम्हारी बिदागी हमको नही चाहिये । हमको सीधा स्टेशन छोड दो ।' आणि सर्वजण स्टेशनवर पोहोचले. गाडीची वेळ लक्षात घेऊन कार्यक्रमाची वेळ ठरविली असल्यामुळे सर्वांना स्टेशनवर दोन–अडीच तास बसून रहावं लागलं. या वेळात खाँसाहेबांबरोबर झालेल्या संभाषणातून अंभईकरांना खूप काही शिकायला मिळालं. भवभूति या सुप्रसिद्ध संस्कृत नाटककाराने 'अरसिकषु कवित्व निवेदनम्, शिरसि मलिख, मलिख, मलिख' अशी त्रिवार प्रार्थना केली ती म्हणूनच.

## कुमार गंधर्वाची समयसूचकता :

१९३९ साली अलाहाबादला प्रयाग संगीत समितीतर्फे अखिल भारतीय संगीत परिषद भरली होती. प्रा. बी. आर. देवधर, नारायणराव व्यास, निसार हुसेन खाँ, विनायकबुवा पटवर्धन, कुमार गंधर्व इ. कलावंतांबरोबर अंभईकरांचं गाणं झालं होतं. अंभईकरांच्या गाण्याच्या दिवशी ही सर्व मंडळी गप्पा मारीत असता तेव्हा अगदी तरुण असलेले कुमार गंधर्व अंभईकरांना म्हणाले, आज रात्रीच्या तुमच्या

कार्यक्रमाला व्हायोलिनवर व्ही. जी. जोग आणि तबल्यावर पं. अनोखेलाल यांची नावं आहेत. पण तुम्हाला अनोखेलाल झेपणार नाहीत. ते सोलो वाजविणारे तबलजी आहेत. तेव्हा गाण्याचा विचका व्हायला नको असेल तर तुम्ही आपल्या नारायणराव इंदोरकरांना बरोबर घ्या. अंभईकरांना हे ताबडतोब पटलं. एवढंच नव्हे तर देवधर मास्तरांनीही कुमारच्या या स्पष्टवक्तेपणाचं कौतुक केलं. मग रात्री नारायणराव इंदोरकर आणि व्ही. जी. जोग यांच्या साथीने अंभईकरांचं गाणं उत्तम पार पडलं.

कुमार गंधर्वांनी लहानपणापासून कोण कसा गातो, कोण कसा वाजवतो यांचं बारकाईनं अवलोकन करून बैठक रंगायला हवी असेल तर काय केलं पाहिजे याचे काही आडाखे स्वत: बांधले होते. तबल्याचा लयबद्ध ठेकाच बैठक अधिक रंगवतो असे त्यांचं मत होतं. म्हणूनच त्यांनी वरीलप्रमाणे अनाहूत सल्ला अंभईकरांना देऊन त्यांची महफिल यशस्वी करून दिली.

## ग. दि. मा. :

आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांचा आणि अंभईकरांचा चांगला परिचय होता. माडगूळकरांची 'यशोधरा' ही संगीतिका अंभईकरांनी सादर केल्याचा उल्लेख मागे आला आहेच. अंभईकरांनी 'संगीत सुधाकर' ही पदवी मिळवली असल्यामुळे माडगूळकर त्यांना 'सुधाकर' अशीच हाक मारीत असत. माडगूळकर आमदार असताना अधिवेशनाच्या काळात माहीमला रहात असत. अंभईकर एकदा त्यांना भेटण्यास गेले तेव्हा त्यांनी बेल वाजविल्यावर माडगूळकरांनी स्वत:च दार उघडलं. उघडेबंब, कमरेला टॉवेल गुंडाळलेला आणि हातात काठी असा त्यांचा अवतार पाहून अंभईकर काही बोलणार तोच माडगूळकर हसून म्हणाले, 'सुधाकर, घाबरू नका. तुमचा आणि काठीचा संबंध नाही. आताच स्नान झालं. धोतर धुवून वाळत घालत होतो.' नंतर काही वेळ थोडं बोलणं झाल्यावर अंभईकरांनी मासिक गीताकरिता एखादं गीत द्या असे त्यांना सुचवलं. माडगूळकर म्हणाले, 'त्याचं बघू. आधी चहा पिऊ.' नंतर त्यांनी स्टोव्हवर स्वत: चहा केला आणि तो घेऊन आले. चहा घेऊन दोघे बाहेर पडले. वाटेतच माडगूळकरांना 'अंगणी खेळतात बाळे' हे पुढे लोकप्रिय झालेलं मासिक गीत सुचलं. अंभईकरांना माडगूळकरांच्या साध्या राहणीचा आणि काव्यसिद्धीचा अशा प्रकारे प्रत्यय आला. कृष्णा कल्ले आणि बालकराम यांनी मिळून ते गीत आकाशवाणीवर गायलं.



त्यापूर्वी एकदा पुण्याला अंभईकर त्यांना भेटायला गेले असता कविराज झोपाळ्यावर बसून अडकित्त्याने सुपारी कातरत बसले होतं. अंभईकरांना म्हणाले, 'सुधाकर, माझ्यात काय फरक दिसतोय?' अंभईकरांच्या काही लवकर लक्षात आलं नाही. मात्र हातातला अडकित्ता चकाकताना दिसला. कविराज म्हणाले, 'सुधाकर, हा चांदीचा अडकित्ता पहा. चंचीतला पूर्वीचा जुना लोखंडाचा गेला. माझे दिवस चांगले आले की नाही?' यावर अंभईकरांनी हर्षभरानं त्यांचं मिठी मारून खूप कौतुक केलं.

## न्यायमूर्ती डॉ. भवानी शंकर नियोगी :

न्यायमूर्ती भवानी शंकर नियोगी हे आजच्या पिढीला फारसे माहीत नसले तरी १९८७ साली १०० वर्षांचं परिपूर्ण आयुष्य भोगून त्यांचं निर्वाण होईपर्यंत विदर्भ आणि महाराष्ट्रातील ते एक प्रगल्भ व्यक्तिमत्त्व होतं. अंभईकरांचा आणि त्यांचा फार जुना ऋणानुबंध होता. १९२९ साली नागपूर येथील मोतीबाबा जामदार हायस्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी ते अध्यक्ष असताना अंभईकरांचं गाणं त्यांनी प्रथम ऐकलं. संगीताची जाण चांगली असल्यामुळे तरुण वयातील अंभईकरांच्या अंगचे गुण त्यांनी हेरले आणि त्यांना अनेकवेळा निरनिराळ्या प्रकारे प्रोत्साहन दिलं.

१९४० साली मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यालयातर्फे महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या सत्कार समारंभाला न्या. नियोगी मुद्दाम नागपूरहून आले होते. सरदारगृहात त्यांचा मुक्काम होता. समारंभ आटोपल्यावर त्यांनी मोठ्या अगत्यानं अंभईकरांना आपल्याबरोबर रात्री जेवायला बोलावलं म्हणून अंभईकर रस्त्यावर टॅक्सी किंवा व्हिक्टोरिया मिळते का ते पाहू लागले. तेव्हा नियोगी त्यांना म्हणाले, 'त्या फंदात पडू नका. आपण ट्रॅमनंच जाऊ.' अंभईकर म्हणाले, आपल्यासारख्या मोठ्या न्यायाधिशांनी ट्रॅमने जाणे मला प्रशस्त वाटत नाही.' पण ते उत्तरले, 'न्यायाधीश कोर्टात, रस्त्यावर त्याचं काय काम?' आणि दोन आण्यात दोघं ट्रॅमनं सरदारगृहात पोहोचले. न्यायमूर्तींच्या आचारातील काटकसरीचं आणि साधेपणाचं हे मोठं बोलकं उदाहरण आहे.

१९७५ साली अंभईकर आपल्या पत्नी सौ. मंदाकिनीसह त्यांच्या अंबाझरी तलावाजवळ असलेल्या बंगल्यावर त्यांना भेटायला गेले होते. तेव्हा नियोगी दांपत्याबरोबर त्यांच्या अनेक विषयांवर मनमोकळ्या गप्पा झाल्या. अंभईकर त्यांना

म्हणाले, 'बऱ्याच लोकांचा असा समज झाला आहे की, तुम्ही बौद्ध धर्म स्वीकारलात.' त्यावर इंदिराबाई ताडकन म्हणाल्या, ''बौद्धांच्या मेळाव्याला उपस्थित रहाणं, त्यांच्या सभा-संमेलनांचं अध्यक्षस्थान स्वीकारणं, त्यांना आशीर्वाद व सदिच्छा देणं म्हणजे बौद्धधर्म स्वीकारणं नव्हे.'' तीन तासांहून अधिक वेळ अंभईकर त्यांच्याकडे होतं. नंतर त्यांनी अंभईकरांकडून वन्देमातरम् गीत गाऊन घेतलं. आणि नंतर नागपूर विद्यापीठाचा सर्व परिसर त्यांना बरोबर हिंडून दाखविला. इतकंच नव्हे तर दोघंही अंभईकरांना पोहोचवायला बसस्थानकापर्यंत आली. एक थोर, शिक्षणतज्ज्ञ, न्यायप्रिय, सद्गुणोपासक, योगी आणि संगीततज्ज्ञाच्या अंगी असलेला मोठेपणा पाहून अंभईकर प्रभावित झाले.

## विद्याधर गोखले :

पंडितराज विद्याधर गोखले आणि अंभईकरांची मैत्री कदाचित् हीरकमहोत्सवी म्हणावी लागेल. त्यांचे वडील अमरावतीचे माजी शिक्षणमंत्री संभाजीराव गोखले यांच्याकडे अंभईकरांचे सर्वात वडील बंधू अंबादासपंत यांचं जाणं येणं असे. त्यामुळे त्यांचा आणि विद्याधरपंतांचा स्नेह ६०-७० वर्षांचा आहे. मराठी, फारशी व संस्कृत वाङ्मयाचा गाढा व्यासंग, कवित्व, वक्तृत्व, हिंदुत्वनिष्ठा, पत्रकारिता, नाट्यलेखन, विनोदबुद्धी, आत्मविश्वास, निर्भिडपणा अशा गुणसमुच्चयामुळे लोकप्रियता विद्याधरपंतांकडे चालूनच आली. 'लोकसत्ता' दैनिकाचे ते दीर्घकालपर्यंत संपादक असताना अंभईकरांचे अनेक संगीतविषयक लेख आणि 'लोकमानस' या सदरात इतर विषयांवरील प्रतिक्रिया व्यक्त करणारी पत्रं त्यांनी प्रसिद्ध केली. त्यांच्या घरी किंवा कार्यालयात ते शिवसेनेचे खासदार असतानाही अंभईकरांना कायमचं मुक्तद्वार होतं व आहे.

अलीकडेच दोघांच्या गप्पा चालू असताना अंभईकरांच्या बोलण्यात अनेक प्रतिष्ठित व्यक्तींबाबतच्या त्यांच्या आठवणी आणि त्यांच्या आयुष्यानं घेतलेली निरनिराळी वळणं यांचा उल्लेख आला. तेव्हा गोखले म्हणाले, 'हे सर्व ग्रंथनिविष्ट होण्याच्या योग्यतेचे आहे. तेव्हा तुम्हाला स्वत:ला वयपरत्वे शक्य नसेल तर दुसऱ्या कुणाच्या सहाय्यानं तुमच्या सर्व आठवणींसकट तुमचे चरित्र तयार करून घ्या. मग पुढचं काय ते पाहू.' त्यामुळे श्री. विद्याधर गोखले हेच या चरित्राचे खरे संकल्पनाकार आणि प्रेरणास्थान आहेत.



## आचार्य दादा धर्माधिकारी :

सर्वोदय नेते व संपादक आचार्य दादा धर्माधिकारी यांचा अंभईकरांचा जुना स्नेह. त्यांनीच अंभईकरांचे शास्त्रीय गायन डॉ. राजेंद्रप्रसादजींना ऐकविण्याचा कार्यक्रम वर्ध्याला आयोजित केला होता. तसंच दिल्लीला आचार्य कृपलानी, एच. व्ही. कामथ, सुचेता कृपलानी वगैरेंच्या ओळखी त्यांच्यामुळेच झाल्या. एकदा सहज अंभईकरांनी दादांना त्यांनी घेतलेल्या त्रासाबद्दल आभार प्रदर्शनाचं पत्र पाठवलं त्याला पाठवलेल्या उत्तरात ते म्हणतात, 'आभार बिभार मानण्याचा वाह्यातपणा करण्याची काही जरूर नाही. तुमचं काय काम असेल ते सांगत जा.'

दुसरा प्रसंग असा. नागपूरला नवीनच रेडिओ स्टेशन निघायचं होतं. त्यासाठी अंभईकरांना दादांची शिफारस हवी होती. त्याकरता ते मुंबईहून मुद्दाम नागपूरला गेले. आणि धंतोलीवर त्यांच्या प्रशस्त बंगल्यावर भेटले. त्यावेळी त्यांना भेटायला येणाऱ्यांची गर्दी होती. वाटलं पुढाऱ्यांच्या घरी नेहमीच गर्दी असते. तरीपण त्या मंडळींतून जरा बाजूला बोलावून अंभईकरांनी त्यांना आपल्या येण्याचा उद्देश सांगितला. त्या स्थितप्रज्ञ योग्यानं त्यांचं म्हणणं शांततेनं नीट ऐकून घेतलं व 'लवकरच काय ते कळवितो' असं सांगून 'तुम्ही काळजी करू नका' असे सांगितलं. इतक्यात तेथील काँग्रेसचे पुढारी ए. श्री. पटवर्धन यांनी अंभईकरांना बाजूला नेऊन सांगितलं, 'काल रात्री दादांच्या मुलाचा टायफॉइडने मृत्यू झाला म्हणून ही मंडळी भेटायला येत आहेत.' हे ऐकताच अंभईकरांना धक्काच बसला आणि अत्यंत पश्चात्ताप झाला. कारण त्यांना या दु:खद घटनेची आधी कल्पनाच नव्हती. स्वत:च्या सुखदु:खाची पर्वा न करता दुसऱ्याच्या कामाकरता तळमळणारे नेते कसे त्यागी व उदार असतात त्यांचं हे बोलकं उदाहरण.

## 'निर्भिड'चे अ. ह. गद्रे :

अंभईकर नागपूरहून मुंबईला येताना माडखोलकरांनी त्यांना दोन पत्रे दिली होती. एक अनंत काणेकरांना व दुसरे मुंबई मराठी साहित्य संघाचे श्री. वा. रा. ढवळे यांना. त्यामुळे त्यांची फार मदत झाली आणि घनिष्ट संबंध प्रस्थापित होऊन साहित्य संघात काम करण्याची संधी मिळाली. 'निर्भीड'साप्ताहिकाचे संपादक अनंत हरी गद्रे यांच्याशी स्नहे झाला. अस्पृश्यता निवारणार्थ केलेल्या अनेक झुणकाभाकर,

सत्यनारायण पूजोत्सवात गाण्याकरता आमंत्रणे देण्यासाठी गिरगावातून दादरला विजयनगरमधील अंभईकरांच्या घरी तीन मजले चढून येत असत. अंभईकरांनी नाट्यक्षेत्रात पदार्पण करून धैर्यधर, अश्विनशेठ, अर्जुन इ. भूमिका ते गायक असल्यामुळे कराव्यात अशी त्यांची फार तळमळ होती. कधीकधी साहित्य संघाच्या कामातून बाहेर जरा मोकळी हवा खाताना एक आण्याचा बटाटावडा व दोन पैशाचा नवटाक चहा मारताना मजा यायची. कोकणातून आलेल्या ओल्या काजूच्या उसळीची चव तर अद्याप अंभईकरांच्या जिभेवर आहे. माणसानं स्वस्थ न बसता नेहमी काहीतरी केलं पाहिजे असं, गद्रे म्हणत असत. मौजेच्या भागवंताकडे त्यांचं नेहमी जाणं-येणं असे.

## सादुल्ला ए. ब्रेलवी व त्र्यं. वि. पर्वते :

मुंबईच्या 'बॉम्बे क्रॉनिकल' या इंग्रजी दैनिकाचे त्र्यं. वि. पर्वते यांचेमुळे प्रमुख संपादक एस. ए. ब्रेलवी यांच्याशी अंभईकरांचा स्नेह जमला. त्यांनी त्यांचं गाणं काँग्रेस हाऊसमध्ये व इतरत्र ऐकलं होतं. खास वन्देमातरम्‌चा कार्यक्रम त्यांनी क्लब ऑफ जर्नालिस्टमध्ये आयोजित केला होता. ते म्हणतात,

"I Have heard Vande mataram on various occassions but (Never) ever have I heard it in extraordinary way in which Mr. Ambhikar sang at the club of Journalists Association and at the Congress House.'

पर्वते क्रॉनिकलमधून निवृत्त होऊन पणजी येथे 'गोवा इव्हिनिंग न्यूज' चालवीत. अंभईकर रेडिओच्या कार्यक्रमाकरता गेले असता त्यांचा त्यांचंकडेच मुक्काम होता. एक दिवस त्यांना गाणं ऐकवलं ते आणि त्यांच्या पत्नी या दोनच श्रोत्यांसमोर.

## पु. ल. देशपांडे :

अनेक पदव्या नि मानसन्मान प्राप्त झालेले महाराष्ट्राचे लाडके पु.ल. यांच्याविषयी काय लिहिणार! त्यांनी स्वत:करता प्रत्येक मराठी माणसाच्या मनात कायम स्थान मिळवून ठेवलं आहे. लता मंगेशकरचा स्वर, पु. लं. चा विनोद, ग. दि. मां.चे काव्य हे माणसाला नेहमी आनंदित आणि प्रसन्न ठेवणारं आहे.

एकदा पं. रविशंकर परदेशाच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी रेडिओ स्टेशनवर आले. स्टेशन डायरेक्टर व पु. लं. बरोबर बोलत येत असता अंभईकर भेटले. बऱ्याच



दिवसांनी भेट झाल्याचा आनंद व्यक्त करताना 'मुझे बुड्ढा मिल गया' म्हणत त्यांनी अंभईकरांना एकदम मिठी मारली. पु. ल. म्हणाले, 'क्यों भाई, इनको इतना जल्दी बुड्ढा बना रहे?' आणि हंशा झाला.

## वा. म. जोशी आणि देवदास गांधी :

संगीताचा कान नसलेले थोर कादंबरीकार वामन मल्हार जोशी यांच्या बाबतीतील एक आठवण अशी, १९३६-३७ साली अंभईकरांचा मुंबई आकाशवाणीवर कार्यक्रम होता. वेळेच्या आधी अर्धा तास वेटिंग हॉलमध्ये ते जाऊन पोहोचले. शेजारीच वामन मल्हार जोशी त्यांचं संध्याकाळच्या सुमारास होणाऱ्या त्यांच्या भाषणात काटछाट व दुरुस्त्या करण्यात गर्क झाले होतं. म्हणाले, 'तुमचं गाणं बिणं आहे वाटते?' अंभईकर म्हणाले, 'अर्ध्या तासानंतर आहे. पण तुम्हाला ऐन वेळी भाषणात बदल, काटछाट करताना त्रास होत नाही काय?' यावर ते म्हणाले, 'सरकारी यंत्रणेत माझं भाषण बसत नसल्यानं, त्याचं ऑपरेशन करून नवीन शब्द-रक्त पुरवठा करीत आहे. पारतंत्र्यच ते. भाषणलेखन स्वातंत्र्याची गळचेपी नाही तर काय होणार?'

अंभईकर दिल्लीला वन्देमातरम्‌च्या कामासाठी गेले असता महात्माजींनी आपले सुपुत्र देवदास गांधी, संपादक 'हिंदुस्थान टाइम्स' यांना एक पत्र दिले व त्यांत 'हा तरुण गायक दिल्लीत नवीन असल्यामुळे त्याला मार्गदर्शन व मदत करावी.' असे सुचवलं. देवदास गांधींना भेटून पत्र दिल्यावर ते म्हणाले, 'सध्या मला वेळ नाही. पुढच्या आठवड्यात या.' अर्थात अंभईकरांना एक आठवडा दिल्लीला काढणं त्यावेळी शक्य झालं नाही व तसंच परत यावं लागलं. पितापुत्राच्या स्वभावात असा फरक.

## कुष्ठरुग्णांकरता कार्यक्रम आणि रंगभूमी-दिन :

विदर्भात अमरावतीजवळ तपोवन येथे शिवाजीराव पटवर्धन यांनी चालविलेल्या कुष्ठधामात एकदा कार्तिकी एकादशीला अंभईकरांचं गाणं ठेवलं होतं. स्वत: शिवाजीराव पटवर्धन, पार्वतीबाई पटवर्धन, डॉ. आळशी, संत अच्युतमहाराज इ. प्रतिष्ठित मंडळी होती. गाणं सुरू झालं पण तंबोरा धरायला कोणी नसल्यामुळे तो तसाच पडून होता. परंतु संत अच्युतमहाराजांनी ही अडचण ओळखून समोरून उठून रंगमंचावर ताबडतोब येऊन अंभईकरांच्या मागे तंबोरा धरून बसले. सर्वांनाच आश्चर्य वाटलं.

अंभईकरांनाही संकोचल्यासारखं झालं. खरे संत दुसऱ्याच्या उपयोगी ऐनवेळी देवासारखे कसे धावून येतात त्याचं हे उदाहरण.

## आयुष्य एका वळणावर! :

मागे लिहिलंच आहे की आकाशवाणीच्या सेवेतून अंभईकर एका प्रदीर्घ अज्ञातवासात गेले आणि तिथून परत आल्यावर त्यांचं जीवन संथपणे सुरू आहे. तोपर्यंतच्या त्यांच्या आयुष्यात त्यांचा ज्या अनेक क्षेत्रातील मान्यवरांबरोबर संबंध आला व त्याचं निवेदन करून झालं असल्यामुळे आता अंभईकरांच्या पुढील चरित्रभागाकडे वळण्यापूर्वी थोडी पार्श्वभूमी सांगणं आवश्यक आहे. अंभईकरांना लहानपणापासून अनेक साधुसंत भेटले आणि त्यांनी केलंले लहानमोठे चमत्कार त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. चमत्काराशिवाय नमस्कार नसला तरी तो पाहिल्यानंतर नमस्कार केलाच पाहिजे असा काही दंडक नाही. पण अंभईकरांच्या मनात मात्र चमत्काराबद्दल एक विलक्षण आकर्षण सतत जागतं होतं.

अनेक विद्वानांना चमत्कार म्हणजे जादू वाटते. त्यांच्यात चिकित्सा व संशोधनाचे विचार नसले तर गैरसमजाला वाव मिळतो असं अंभईकर म्हणतात. पं. नेहरूंच्या गळ्यात पाचलेगांवकर महाराजांनी विषारी सापांचे हार घातले. हे पहाताच अस्वस्थ झालेल्या इंदिरा गांधींना तो प्रसंग जादूसारखा वाटला. पण 'स्वामीजींनी सर्पशास्त्राचा अभ्यास केला असून माझ्याशी केलंल्या चर्चेमुळे माझी खात्री झाली. तेव्हाच मी न घाबरता गळ्यात साप घालून घेतले.' या उत्तराने इंदिराबाईंचे समाधान झालं. पूर्वी गांधीजींच्या गळ्यातही महाराजांनी साप घातले होतं व ते घाबरले नाहीत. सर्पविष आत्मसामर्थ्यानं कसं उतरतं, त्याचा शास्त्रीय आधार इ. विषयावर दोन दिवस चर्चा झाली होती. सरदार पटेल, जमनालाल बजाज इ. नेते याप्रसंगी उपस्थित होतं.

पाचलेगांवकर महाराजांना अग्निसिद्धी आणि सर्पसिद्धी प्राप्त झाल्या असल्याचा मागं उल्लेख झाला आहे. पण इतरही त्यांनी केलंले काही चमत्कार अंभईकरांनी अनुभवल्यामुळं त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात आकर्षण निर्माण झालं होतं. शिवाय महाराजांच्या श्रमदान, राष्ट्रधर्मप्रचार, श्रमप्रतिष्ठा इत्यादी क्षेत्रातील कार्याचा प्रभावही त्यांच्यावर पडला होता.

अंभईकरांच्या तरुण वयात नागपूरला सिताबर्डीवरील भिडे कन्या शाळेच्या गणेशोत्सवात त्यांचं 'नरवर कृष्णासमान' हे पद ऐन रंगात आलं असताना रस्त्यापर्यंत



जमलेल्या तुफान गर्दीतून वाट काढण्याकरीता एक टांगा हळूहळू जात असताना त्यात बसलेल्या व नुकतेच एक व्याख्यान संपवून परत चाललेल्या पाचलेगावकरांनी कोण गातंय याची चौकशी केली तेव्हा सोबतच्या गृहस्थानं 'हा इथलाच एक गाणारा मुलगा आहे', असं सांगितलं. तेव्हा महाराज म्हणाले, 'तर मग त्याला एकदा आपल्या घरी बोलवा. म्हणजे पोटभर गाणं ऐकायला मिळेल.' महाराजांनी व्यक्त केलंल्या इच्छेनुसार अंभईकरांचं त्यांच्यासमोर एक दिवस गाणं झालं. महाराजांनी त्यांना श्रीफळ व भस्म दिलं. पाचलेगांवकर महाराजांबरोबरची १९२६ सालात ही पहिली भेट. नंतर महाराजांच्या सामाजिक व धार्मिक उपक्रमाची माहिती त्यांना अंभईकरांना मिळत राहिली. तसंच मधून मधून त्यांचा सहवासही लाभत असे.

१९३८ साली अमरावतीला वडील बंधू अंबादासपंत तथा दादा रहात असताना अंभईकर विषमज्वर आणि अपेंडिसायटिसनं आजारी पडले. कुटुंबातील सर्वांनाच काळजी वाटू लागली. पण एका रात्री अंभईकरांना स्वप्नात महाराजांनी 'काळजीचं कारण नाही', असं सांगितलं. दोनच दिवसांनी महाराजांचं काश्मिरहून पत्र आलं की प्रकृतीला लवकरच आराम पडेल. महाराज काश्मिरला असल्याचं अंभईकर कुटुंबीयांना ठाऊक नव्हतं आणि अंभईकर अमरावतीला आजारी असल्याचं महाराजांना काश्मिरला कसं समजलं याचा सर्वांना अचंबा वाटला. अंभईकर विषमज्वरातून उठले, पण डॉक्टरांनी अपेंडिसायटीसचं ऑपरेशन लवकर करणं आवश्यक आहे असं सांगितलं. पुढे महाराजांची भेट झाल्यावर त्यांनी मात्र ऑपरेशन करू नये असा सल्ला दिला. आणखी काही दिवसांनी सुप्रसिद्ध डॉ. ना. भा. खरे यांना अंभईकरांनी आपली प्रकृती दाखविली तेव्हा त्यांनी ऑपरेशनची गरज नाही, रोज सकाळी एक छटाक लोणी व खडीसाखर खात जा आणि जेवणात भरपूर पालेभाज्या खात जा असं सांगितलं. हा उपाय लागू पडून त्यांची प्रकृती सुधारू लागली.

## पाणी न पिता संगीत परिषदेकरिता प्रवास :

एवढ्यात त्यांना अलाहाबादच्या संगीत परिषदेचं आमंत्रण आलं. गंभीर आजारातून नुकतेच उठले असल्यानं इतक्या दूरचा व कडक थंडीतला प्रवास त्यांनी करू नये असा सल्ला डॉक्टरांनी दिला. घरातील सर्वांनाही तसंच वाटत होतं. अंभईकरांच्या मनातून मात्र ही संधी सोडायची नव्हती. एवढ्यात पाचलेगांवकर महाराजांची स्वारी नागपूरात आल्याचं समजल्याबरोबर त्यांना भेटून मी संगीत परिषदेला

जाऊ काय असं विचारलं. त्यावर महाराज म्हणाले की, 'तुझ्या मनातून जायचं असेल तर जा. पण निघाल्यापासून परत येईपर्यंत कुठंही पाणी प्यायचं नाही.' महाराजांवरील श्रद्धेमुळे कुठंही पाणी न पिण्याचं ठरवून अंभईकर अलाहाबादच्या संगीत परिषदेला जाऊन सुखरूप परत आले. समजा डॉक्टरांनी हा सल्ला महाराजांऐवजी दिला असता तर डॉक्टरवर श्रद्धा ठेवून घेतलेल्या औषधाप्रमाणे 'पाणी न पिणे' हा एक उपचार म्हणून केलाच असता असं ते म्हणतात. संपूर्ण दहा दिवसांच्या अलाहाबादच्या मुक्कामात ते चहा व क्वचित सोडा वॉटरवरच राहिले आणि त्यांचा कार्यक्रमही चांगला झाला. परत आल्यावर प्रकृतीही सुधारली.

## आगगाडी थांबली :

अंभईकर एकदा पाचलेगांवकर महाराजांबरोबर मोगलाईत प्रवास करीत असताना कळमनुरी स्टेशनवर गाडी थांबली. स्टेशनमास्तर भाविक असल्यामुळे त्यांनी महाराजांना उतरवून आपल्या खोलीत बसवलं. पाणीबिणी पिऊन झाल्यावर थोड्या गप्पागोष्टी झाल्या. नंतर महाराज म्हणाले, की 'मास्तर, आता आम्ही निघतो. गाडीला उशीर होतो आहे.' मास्तर म्हणाले, 'फार दिवसांनी दर्शन झालं. आणखी थोडावेळ बसावं. गाडी सोडणं माझ्याच हातात आहे.' त्याप्रमाणं थोड्यावेळ थांबल्यावर महाराज आणि अंभईकर गाडीत जाऊन बसले. स्टेशनमास्तरनं गाडीला सिग्नल दिला आणि तो महाराजांच्या डब्याजवळ हात जोडून निरोप देण्याकरता उभा राहिला. पण गाडी सुरू होईना. ड्रायव्हर, गार्ड, स्टेशनमास्तर सर्वांनी मिळून इंजिन तपासलं. पण कसलाच दोष आढळला नाही. एवढ्यात महाराज म्हणाले, 'अरे, माझ्या खडावा कुठं आहेत?' तेव्हा कोणीतरी जाऊन स्टेशनमास्तरांच्या खोलीत राहिलेल्या खडावा त्यांना आणून दिल्या. महाराजांनी त्या पायात घातल्या आणि गाडी चालू झाली.

## गाणगापूरातील चमत्कार :

१९४९ साली महाराजांबरोबर अंभईकर श्रीक्षेत्र गाणगापूर इथं गेले होतं. भीमा अमरजा नद्यांच्या संगमावर स्नान करायला जाताना ते सहज मंदिरात डोकावले. तेवढ्यात पुजारी त्यांच्या अंगावर धावून आला व ओरडला, 'मंदिरात पारोशानं जायचं नसतं. नियम बियम वाचता येतात की नाही? चला, दुपारी बारानंतर दर्शनाला या.' त्यावर बरोबरच्या मंडळींनी सांगितलं की, 'आम्ही मंदिरात येत नाही. पण



आमच्याबरोबर हे संत महाराज आहेत. म्हणून केवळ आत एक दृष्टिक्षेप टाकण्याकरता आम्ही या रस्त्यानं आलो.' तेव्हा तो पुजारी कडवटपणानं म्हणाला, 'आम्ही संत वगैरे जाणत नाही. इथं देवाच्या घरी सर्व सारखे आहेत.' मग सर्व मंडळी संगमावर स्नानाकरता गेली आणि यथेच्छ स्नान करून कपडे धुवून परत जायला निघेपर्यंत बारा वाजून गेले होतं. मंदिरात आरतीची वेळ झाली. अनेक भाविक, भक्तमंडळी कोणी ओल्या वस्त्रांनं तर कोणी सोवळ्यात उभे होतं. पण आरती काही पेटेना. दोन आगपेट्या संपल्या तरी आरती पेटण्याचं चिन्ह दिसेना. शेवटी कुणीतरी शंका काढली की, सकाळी कोणी एक संत मंदिराच्या बाजूने गेले. त्यांना त्याबद्दल विचारावं. महाराज संगमावर पार्थिव पूजा, जप वगैरेंमध्ये गुंतले होतं. तिथं पुजाऱ्यांसह ४०-५० माणसांचा घोळका आला आणि त्यांनी महाराजांना घडलेला प्रकार सांगितला. इतक्यात भक्तांचा दुसरा घोळका 'सद्गुरुनाथ, सद्गुरुनाथ आम्ही अपराधी घ्या पदरात' म्हणत टाळ मृदंगाच्या निनादात येऊन पोहोचला. पुजाऱ्यानं क्षमायाचना केली. त्यावर महाराज म्हणाले, 'तुम्ही पुढं व्हा, आम्ही निघालोच.' आणि संगमावर आलेली मंडळी मंदिरात परत पोहोचण्याच्या आतच इकडे आरती पेटली आणि शंख, घंटा व नगाऱ्याच्या निनादात मोठ्या उत्साहात सुरू झाली.

वर निवेदन केलेल्या वेचक चमत्कारांशिवाय महाराजांनी केलेले आणखीही काही चमत्कार अंभईकरांनी प्रत्यक्ष पाहिले असल्यामुळे त्यांच्यावर त्यांची दृढ श्रद्धा बसली. तरीपण केवळ चमत्कार पाहून माझी त्यांच्यावर श्रद्धा बसली नाही तर त्यांचं लोकोपयोगी कार्य, श्रमदान, श्रमयज्ञ, श्रमतपस्या, राष्ट्रधर्म प्रचारार्थ व्याख्यानं, प्रवचनं, चर्चा, लोकात भक्तिभाव निर्माण करून, जागृती करून राष्ट्रांत चैतन्य उत्पन्न करणारी त्यांची अनेक सामाजिक कामं पाहिल्यामुळे श्रद्धा बसली.' असं ते म्हणतात.

## श्रमदानाची विविध कामे :

संत पाचलेगांवकर महाराजांनी नुसते चमत्कारच केलं असं नाही. धर्माचं अधिष्ठान ठेवून त्यांनी समाजाची सर्वांगीण उन्नति साधण्याकरता अनेक प्रकारचं विधायक कार्यही केलं. श्रमदान, संघटन, महायज्ञ, कृषिसेवायज्ञ, सामुहिक शेती, रस्ते व तलाव बांधणं, नद्यांचे प्रवाह बदलून ओसाड जमिनीला पाणी उपलब्ध करून देणं, कंपोस्ट खतं तयार करणं, धान्य बँकांची स्थापना, सामूहिक शीलजागृतिकरता ठिकठिकाणी राष्ट्रधर्म उपासकमंडळाची स्थापना, 'समष्टिधर्म' या ग्रंथाचं चार खंडात

लेखन आणि त्याच नावानं मासिक चालवणं अशी अनेक लोकोपयोगी कामं त्यांनी केली असून त्यात गुलझारीलाल नंदा, माजी केंद्रीय कायदामंत्री बी. एन. दातार, पं. रविशंकर शुक्ला, पं. द्वारकाप्रसाद मिश्र, ब्रिजलाल बियाणी आदींचा सहभाग त्यांनी घेतला होता. स्वत: हातात कुदळ, फावडं व डोक्यावर घमेलं घेऊन श्रमदान केलं होतं. रोग, अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धा याविरुद्ध त्यांनी लढा दिला. नित्य काम्यकर्म परमेश्वरार्पण बुद्धिनं करणं हीच आजच्या काळातली गरज असून जातिभेद न करता अखिल मानवाचं कल्याण करणारा तोच धर्म अशी महाराजांची शिकवणूक असे. महाराष्ट्र शासनानं त्यांना 'दलित मित्र' हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता.

पाचलेगांवकर महाराजांनी केलेले चमत्कार आणि त्यांचं हे कार्य या दोन्हीमुळे अंभईकर प्रभावित झाले होतं. शिवाय नुकतीच त्यांनी महाराजांबरोबर १०-११ महिन्यांची हिमालयाची अनुष्ठान यात्रा केलेली होती. या यात्रेत त्यांना अनेक ऋषिमुनींचं दर्शन घडलं. नवीन प्रदेश, नवी माणसं, त्यांची संस्कृति, भाषा, इतिहास, शिक्षण इ. ची माहिती मिळाली. लुधियाना व हुशियारपूरच्या गुरुद्वारात ग्रंथसाहेबांसमोर हजारो भक्तांच्या उपस्थितीत महाराजांचं एवढं प्रभावी प्रवचन झालं की तिथून निघताना महाराजांच्या मोटारीपुढं अनेक शीख बांधव रस्त्यावर आडवे पडले आणि महाराजांना त्यांचा मुक्काम वाढवायला लावला. भिंड व मोरेना या दरोडेखोरांच्या राज्यात तर सामूहिक पूजा, आरती आणि उपासनेला दरोडेखोर राजा मानसिंग आणि त्याचे साथीदार भक्तिभावानं उपस्थित रहात असत.

## आकाशवाणीतील औट घटकेचे पुनरागमन :

अंभईकर आकाशवाणीच्या सेवेत पुन्हा रुजू झाले खरे पण संत पांचलेगांवकर महाराजांच्या समवेत त्यांनी नुकत्याच केलेल्या दहा-अकरा महिन्यांच्या प्रदीर्घ यात्रेत त्यांनी भव्य आणि दिव्य असं पाहिलं असल्यामुळे त्यांना आता रोजच्या जीवनात एक प्रकारचा तोच तो पणा जाणवू लागला. त्यांच्या अशा मन:स्थितीत १९५९-६० साली महाराजांनी अंभईकरांना 'तू मुंबई सोडून माझ्या खामगांवच्या आश्रमात ये. मी सर्वांची रहाण्याची आणि जेवणाखाण्याची सोय करीन. तुझ्या मुलांचं शिक्षणही करीन. धर्मरक्षणाच्या कार्याला तुझा संगीतकलेसह हातभार लागावा अशी माझी इच्छा आहे. ही गुरूची आज्ञाच समज.' असं सांगितलं. याच्या आधीही एकदोनदा अशी सूचना महाराजांनी अंभईकरांना केली होती. पण त्यावेळी त्यांनी ती मनांवर घेतली नव्हती.



पण यावेळी 'गुरूची आज्ञा' असे शब्द महाराजांनी वापरल्यामुळे अंभईकरांच्या मनाची चलबिचल झाली. त्यांनी मुंबई सोडून खामगांवला जायला त्यांची पत्नी, आप्तेष्ट, मित्र, चहाते वगैरे सर्वांचाच विरोध होता. मुंबई आकाशवाणीचे तेव्हाचे केंद्रसंचालक कृष्णस्वरूप मलिक यांनी मुंबई सोडायची असली तर पुणे किंवा अंभईकरांचे मूळ गाव नागपूर यापैकी कुठंही बदली देण्याची तयारी दाखविली होती. पण अंभईकर याबाबतीत स्वयंकेंद्रित झाले होतं, असं म्हणावं लागतं. कारण मुंबईत १९४० पासूनच्या २१ वर्षांत त्यांनी चांगली प्रतिष्ठा मिळविली होती आणि विविध क्षेत्रातील नामवंतांच्या निकट सहवासात त्यांचं आयुष्य समृद्ध आणि परिपूर्ण झालेलं होतं. अशा स्थितीत खामगांवला जाण्याचा निर्णय अव्यावहारिक होता. उलटपक्षी गुरुची आज्ञा अव्हेरायलाही ते तयार नसल्यामुळे त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला.

## मुंबईहून खामगांव आणि आश्रमातील दिनचर्या :

पण अखेर नियतीचा दु:संकेत घेऊन अंभईकरांच्या आयुष्यात एक दिवस चोरपावलानं उगवलाच. महाराजांनी 'प्रथम महिनाभर रजा घेऊन ये, बरं वाटलं तर राजीनामा देऊन कायम रहा नाहीतर मुंबईला परत जा' असं सांगितलं असूनही अंभईकरांनी त्या दिवशी आकाशवाणीकडे आपल्या नोकरीचा राजीनामा पाठवून दिला आणि त्यांनी सर्व कुटुंबासहवर्तमान कायम खामगावला जाण्याकरता मुंबई सोडली. अंभईकरांच्या जीवनाला मिळालेली ती कलाटणी सर्वस्वी अतर्क्य आणि त्यांच्या स्वत:च्या स्थायी स्वभावधर्माशीही विसंगत असल्यामुळे केवळ नियतीची इच्छा अशी संबोधावी लागेल. त्यांच्या मोठ्या मुलीच्या शब्दांत 'ते' एक न उलगडणारे कोडे आहे. अंभईकर कुटुंब खामगांवला पोहोचले त्याच्या दुसऱ्याच दिवशी महाराज त्यांना बरोबर घेऊन दौऱ्यावर गेले. त्यामुळे मंदाकिनीवहिनींना आपली सर्व व्यवस्था इतरांच्या सहकार्यानं स्वत:च लावून घ्यावी लागली. दौऱ्यावरून परत आल्यावर अंभईकर नवीन वातावरणाशी समरस होण्याचा प्रयत्न करू लागले.

आश्रमातील दिनचर्या ठरलेली असे आणि ती पाळण्यावर महाराजांचा कटाक्ष असे. सकाळी सहापूर्वीच सर्वांना स्नानासकट सर्व प्रातर्विधी उरकावे लागत. सहा वाजता घंटा वाजत असे. ती वाजली की, सर्वांनी प्रार्थनेकरता हजर व्हायचं. प्रार्थना तबला पेटीच्या साथीनं होत असे. अंभईकर पेटी वाजवीत असत. तबला जो कोणी त्या वेळी उपलब्ध असेल तो बडवी. प्रार्थना संपल्यावर सामूहिक सूर्यनमस्कार,

योगासनं इ. कार्यक्रम असत. नंतर पूजा, जप, ध्यानधारणा, अभ्यास, वाचन इ. पाठ असत. दुपारी बारा-साडेबारा वाजता जेवणाची घंटा वाजली की आपापलं ताट, वाटी, पेला घेऊन भोजनगृहात सर्वांनी एकत्र मिळून जेवायचं.

भोजनोत्तर विश्रांती. अंभईकरांना मात्र महाराजांच्या 'समष्टिधर्म' मासिकावरता लेखांची जुळवणी, प्रुफं तपासणं, लेख लिहिणं इ. पासून तो पत्रे लिहून अंक पोष्टात टाकीपर्यंतची सर्व कामं या वेळात करावी लागत. दुपारी चार वाजता महाराज मुक्कामी असले म्हणजे ते स्वत: बौद्धिक वर्ग घेत असत. वर्ग दोन-अडीच तास चाले. संध्याकाळी सात वाजता देवळात सामूहिक आरती, गीतेचा दुसरा अध्याय, सूक्त, उपासना आणि पुन्हा थोडावेळ प्रवचन होई. नंतर रात्रीचं जेवण आणि झोप.

मुंबईचं राहणीमान आणि आश्रमातला नित्याचा वरणभाकरीचा आहार यातील तफावत आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचा अभाव यामुळे अंभईकरांचं मन बरेचदा विषण्ण होत असे. इतरही लहानसहान गोष्टींवरून वातावरण तापे. कोठून आपण या फुफाट्यात येऊन पडलो असं त्यांना होई. शिवाय या फुफाट्यात ते आलं होतं ते आगीतून नव्हे तर गुलाबशय्येवरून.

अशा काही प्रसंगी अंभईकर नाराज झाले आहेत हे महाराजांच्या लक्षात आलं म्हणजे ते त्यांना सांगत, 'माझ्यावरचा विश्वास अढळ ठेव. इतरांबरोबर द्वेष, मत्सर, कलह, हेवेदावे इ. विकारांपासून दूर रहा. या युगातील तपश्चर्या हीच असून गुरूच्या आज्ञेत राहून पूजा आणि ध्यानधारणा अशा आध्यात्मिक गोष्टी साध्य करणं हे नि:श्रेयस संपादन करण्याचं एकमेव साधन आहे. आजच्या युगात जंगलात किंवा एकांतात जाऊन कोणी तपश्चर्या करू शकत नाही. गृहस्थाश्रमात आणि समाजात राहून कायिक, वाचिक आणि मानसिक प्राप्तकर्म परमेश्वरार्पण बुद्धीनं करणं हीच पूजा, हीच भक्ती, हाच धर्म होता होता तू व्यक्ती, समष्टी आणि परमेष्टी गाठू शकशील असा मला विश्वास वाटतो आणि म्हणूनच मी तुला इथे आणलं आहे.' महाराजांच्या ह्या आश्वासक शब्दांमुळे अंभईकरांच्या मनावरचं मळभ तात्पुरतं दूर होई आणि काहीसा दिलासा मिळे.

## कृती आणि बोल यातील फरक :

सर्व आश्रमवासी अंगणातल्या आणि आसपासच्या काड्या, पालापाचोळा गोळा करून स्नानाकरिता पाणी तापवीत असत. भगिनीवर्ग आळीपाळीने स्वयंपाक



करी. पण तो चुलीवर आणि लाकडं, गोवऱ्या, फुंकणी आणि धूर यांच्या वातावरणात.

एखादी प्रतिष्ठित व्यक्ती आश्रमाला भेट द्यायला आली तर केवळ त्यांच्याकरता म्हणून सुग्रास, षड्रसयुक्त जेवण तयार केलं जाई. अंभईकरांनी महात्मा गांधींचा आश्रम, हृषिकेशचा महेश योगींचा आश्रम आणि अवतार मेहेरबाबांचा आश्रम पाहिलेला होता. या सर्व आश्रमात कोणीही कितीही मोठा अतिथि आला तरी त्याला सर्वांबरोबर नित्याचंच भोजन मिळे हे अंभईकरांनी प्रत्यक्ष अनुभवलं असल्यामुळे त्यांना हा भेदभाव अधिकच खटकत असे.

एखाद्या गावी राष्ट्रधर्म प्रचारक वर्ग, शिबिर किंवा श्रमदान यज्ञ योजलेला असला तर संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी म्हणतात त्याप्रमाणे आश्रमवासीयांना पूर्वतयारी करताना जिवापाड श्रम पडत असत. आश्रमातील भगिनींना सडा, सारवण, झाडझूड, धान्य निवडणं, पाखडणं, स्वयंपाक करणं या नित्याच्या कामाव्यतिरिक्त कितीतरी अधिक श्रम पडत. मंदाकिनीवहिनींना ते न झेपल्यामुळे त्यांना हृदयविकाराचं दुखणं जडलं आणि ते अजूनही आहे.

मुंबईहून गेल्यानंतरच्या पहिल्या दोन वर्षांत अंभईकरांना दोन-तीन संगीत परिषदांची निमंत्रणं आली. पण पुन्हा त्या मायाजालात गुंतू नकोस असं सांगून महाराजांनी त्यांना परिषदात सहभागी व्हायला परवानगी नाकारली. अंभईकर मधून मधून काही भजनं म्हणत असत आणि सवड मिळाली तर रियाजही करीत असत. हे खरं असलं तरी आपली संगीत कला खुंटण्याच्या मार्गावर आहे हे त्यांच्या लक्षात यायला लागलं. आणि तोपर्यंत 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने', 'जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी तेणे पथ्ये सांभाळावी', इ. बोधवचने अंगी बाणवण्याचा प्रयत्न करणारे अंभईकर 'दुरून डोंगर साजरे' असं म्हणू लागले.

## महाराजांचा उपदेश :

आश्रमाच्या तळघरातील श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींच्या निर्गुण पादुका आणि श्रीनृसिंह सरस्वती स्वामींच्या मूर्तीची पहाटेची षोडशोपचारयुक्त पूजा ही आश्रमातील मुख्य सेवा अंभईकरांकडे असे आणि ती ते अत्यंत श्रद्धायुक्त मनानं करीत असल्यामुळे त्यांना आत्मिक समाधान लाभे.

शिवाय धर्मप्रचाराच्या दौऱ्याहून महाराज परत खामगावला आलंम्हणजे ते दोन, तीन तास बौद्धिक वर्ग घेत असत. त्यात अनेक उदाहरणं, शास्त्रज्ञांची मतं,

इतिहास, संस्कृति, शिक्षण, विज्ञान आणि प्राचीन ऋषीमुनींचे शोधबोध इत्यादींची रेलचेल असल्यामुळे लक्ष देऊन ऐकणाऱ्याला भावी आयुष्यात उपयुक्त ठरण्यासारखे अनेक मार्गदर्शक विचार असत. ज्या कृतीनं मानवाचं कल्याण होतं तोच धर्म अशी अत्यंत सोपी, सुटसुटीत पण अर्थपूर्ण अशी त्यांची धर्माची व्याख्या होती. हीच व्याख्या त्यांनी भारत सेवक समाजात आणि हरिद्वारच्या व्यासधर्म परिषदेत मांडून तिला विद्वत मान्यताही मिळविली होती. चातुर्वर्ण्य केवळ व्यवसायावरून निर्माण झालं असल्यामुळे त्याची बंधनं ते मानीत नसत. आपल्याला मनुष्यजन्म प्राप्त होतो तो मुख्यत: श्रमासाठी अशी त्यांची धारणा असल्यामुळे श्रम करा, श्रमदान करा आणि श्रमाची प्रतिष्ठा वाढवा असा त्यांचा संदेश असे.

## खर्चाची ओढाताण मात्र पैशांपेक्षा आशीर्वाद श्रेष्ठ :

अंभईकरांच्या खामगाव येथील वास्तव्यातच त्यांचा मोठा मुलगा सतीश यानं जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चा कमर्शियल आर्टचा डिप्लोमा मिळवला. मुलगी शोभा इंटरपर्यंत शिकली. तिचं १९७३ साली नागपूर इथं लग्न झालं. हिमगौरीला घेऊन अंभईकर खामगांवला आलं तेव्हा ती चार महिन्यांची होती. पुढे तेथेच तिनं होमिओपॅथीचा कोर्स पूर्ण करून ती डॉक्टर झाली. अंभईकर खामगांवला असतानाच १९६३ साली अमळनेर येथे त्यांना आणखी एक मुलगा झाला. त्याचं नाव गिरीश. त्याचं शालेय शिक्षण खामगांवलाच झालं. अंभईकर सांगतात की या चारही मुलांच्या शिक्षणाकरता आणि इतर काही कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याकरता महाराजांकडून पैसे वेळेवर कधीच मिळत नसत. त्यामुळे ते खामगांवला असतानाच त्यांच्याजवळ असलेली पुंजी संपली. कधी काही पैसे मागितले की ज्याच्याकरता ते मागितले असतील तो खर्च वायफळ किंवा चैनीचा ठरवून महाराज पैसे देत नसत.

महाराजांकडे प्रचंड ग्रंथ भांडार होतं. वास्तविक पुस्तकं म्हटली म्हणजे ती जास्तीत जास्त लोकांकडून वाचली जायला हवीत. पण इथं तसा प्रकार नव्हता. महाराज स्वत: ग्रंथालयांत तासनतास घालवित. पण कोणाही आश्रमवासीयाला ग्रंथालयातील एकही पुस्तक ते कधीच वाचू देत नसत. परंतु दुसऱ्यांकडून ते तासनतास वाचून घेत असत.

एकदा महाराजांचा मुक्काम विदर्भात वाशिम येथे असता तेथील नानासाहेब धनागरे, कृष्णराव देशपांडे, आबासाहेब देशपांडे इ. प्रतिष्ठित वकील मंडळींनी त्यांना अंभईकरांबद्दल विचारलं असता महाराजांनी बिनदिक्कतपणे सांगितलं की, मी त्याला इथं आणलं नाही. आकाशवाणीत नोकरीत असता तेथील अधिकारी त्याला त्रास देत



म्हणून तो माझ्या आश्रयाला आला. महाराजांसारख्या सत्पुरुषाच्या तोंडचा हा सत्यापलाप अंभईकरांना सहन होणं शक्यच नव्हतं. म्हणून त्यांनी वाशिमला मुद्दाम जाऊन या वकील मंडळींना भेटून महाराजांनी जाणुनबुजून केलेला गैरसमज दूर केला. याच वाशिमला राजे वाकाटक वाचनालयाच्या शतसांवत्सरिक महोत्सवप्रसंगी होणाऱ्या गायनाच्या कार्यक्रमासाठी अंभईकर गेले असता त्यांचा मुक्काम तेथील प्रसिद्ध वकील श्री. कृष्णराव देशपांडे यांजकडे होता. उत्सवाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार कै. गं. त्र्यं. माडखोलकर हेही तेथेच उतरले होतं. अंभईकर नोकरी सोडून श्री. पाचलेगांवकर महाराजांच्या आज्ञेवरून खामगांवच्या आश्रमात आलं असल्यामुळे तो एक चर्चेचा विषय झाला होता. एका भोजनप्रसंगी कृष्णराव देशपांड्यांनी माडखोलकरांना विचारले, 'भाऊसाहेब, मुंबईची नोकरी सोडून अंभईकर सहकुटुंब सहपरिवार महाराजांच्या आश्रमात का आलंयाचे आम्हा सर्वांना आश्चर्य वाटते.' यावर भाऊसाहेब म्हणाले, 'महाराजांनी त्यांना बोलावले ही महाराजांची पहिली चूक आणि त्यांच्या इच्छेवरून अंभईकर आलंही अंभईकरांची दुसरी चूक.' त्यानंतर वर्षामागून वर्ष गेली. आणि अचानक महाराजांनी अंभईकरांना बोलावून सांगितलं, 'अरे, तुला मुंबईला परत जायचं असेल तर जा.' आश्चर्य म्हणजे यापूर्वी चार-पाच वेळा महाराजांनी नकार दिला असताना यावेळी मात्र ते म्हणाले, 'तुला जायचंच असेल तर जा.' वीस वर्षापूर्वी अंभईकरांनी मुंबई सोडली तेव्हा ते म्हणाले होतं की, 'तिथली विजयनगरमधली जागा सोडू नको. पुन्हा परत यायचं आहे.' या त्यांच्या बोलण्याचं स्मरण होऊन खामगावचं २०-२१ वर्षांचं वास्तव्य संपवून पुन्हा मुंबईला येण्याचं अंभईकरांनी ठरवलं. निघण्याच्या दिवशी निरोप घेताना महाराजांनी सौ. मंदाकिनी वहिनींना विचारलं, 'जा. तिथं तुमची पानं वाढून ठेवली आहेत. आणखी काय देऊ? पैसे की आशीर्वाद?' परंतु इतकी वर्षे व्रत म्हणून हाल-अपेष्टा सोसाव्या लागल्या असतानाही त्या म्हणाल्या, 'आशीर्वाद'. तेव्हा महाराजांनी शुभास्ते पंथा: असं म्हणून आशीर्वाद दिला.

# पुनश्च हरि: ॐ



## मुंबईत पुनरागमन :

अंभईकरांच्या आयुष्याच्या वाटेवरील ही दोन्ही आडवळणं अभ्यासकाला गोंधळून टाकतात. या लेखनप्रसंगीही मी इतर बाबतीत केली नसेल एवढी प्रदीर्घ तपशीलवार चर्चा अंभईकरांबरोबर त्यांच्या जीवनातील या दोन टप्प्यांबद्दलच केली.

१९८१-१९८२ साली अंभईकरांची परिस्थिती काय होती? हिमगौरी उपवर झाली होती. गिरीशचं फक्त शालेय शिक्षण पूर्ण झालेलं होतं. मोठ्या सतीशलाही नोकरी नव्हती. एकटी विवाहित शोभा तेवढी सासरी सुखात होती. अशा परिस्थितीत पत्नी, दोन मुलगे आणि एका अविवाहीत मुलीला घेऊन ते इथं नसलेल्या २१ वर्षांत अधिकच स्पर्धात्मक झालेल्या मुंबईत पुनश्च हरि ॐ म्हणून बस्तान बसवणं त्यांना कितपत शक्य होतं? ते स्वत: ७० वर्षांचे झालेले होतं. आणि जन्मजात कवचकुंडलं सूर्याला कापून देणाऱ्या कर्णासारखी किंवा आपला अंगठा गुरुदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यांनी तोडून दिलेल्या एकलव्यासारखी त्यांची स्थिती झाली होती.

अंभईकर खामगावला असतानाच्या दोन दशकांत संगीतक्षेत्र अनेक परीनं बहरलं होतं. शास्त्रीय आणि सुगम संगीताच्या क्षेत्रातील अतिरथी महारथींची संख्या मोजायला दोन्ही हातांची आणि पायांची बोटंही अपुरी पडू लागली होती. शिवाय १९७२ साली म्हणजे दहा वर्षांपूर्वीचं अनेक कलाकारांना नानाविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून



देणारं 'दूरदर्शन' मुंबईला सुरू झालं होतं. २० वर्षांच्या झोपेतून जागे झालेल्या अंभईकर नाव सांगणाऱ्या रिप व्हॅन विकलला आता या क्षेत्रात कोण विचारणार होतं? खामगावला निदान सर्वांचं जेवणखाण, रहाणं, शिक्षण हे कसं का होईना चाललं होतं. तर मुंबईला आल्यावर दुसऱ्या दिवसाचीही भ्रांत पडणार होती. खामगावला जाताना बरोबर नेलेली पुंजी संपून गेली होती. थोर माणसांच्या बाबतीत निश्चित सांगणं कठीण असलं तरी माझ्या मते यावेळी महाराजांनी अंभईकरांना जाण्याची परवानगी दिली ती या परिस्थितीत ते जाऊच शकणार नाहीत असं त्यांना वाटल्यामुळे सांगितलं असण्याची शक्यता आहे. किंवा मागं सांगितल्याप्रमाणं महाराजांना स्वत:चा अंत:काल समीप आल्याची चाहूल लागली असावी. म्हणूनही त्यांनी ही आवरासावर केली असावी. असो.

## निरोप समारंभ :

अशा बिकट परिस्थितीत अंभईकरांनी खामगाव सोडण्याचा पक्का निर्णय घेतला. ते खामगाव सोडून जात असल्याची बातमी वायुगतीनं गावात समजताच भेटायला येणाऱ्यांची गर्दी व निरोप समारंभ सुरू झाले. तेथील जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. उगलमुगले यांच्या निवासस्थानी एक सत्कार समारंभ आणि गाण्याचा कार्यक्रम झाला. त्याला तेथील वकील, डॉक्टर्स, व्यापारी, प्राध्यापक इ. सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. तसेच टिळक राष्ट्रीय विद्यालयात श्री. पंधे गुरुजींनी मोठा सत्कार केला. याशिवाय भगिनी मंडळ, टिळक स्मारक मंदिर, ब्राह्मणसभा, मेडिकल असोसिएशन, लायन्स क्लब इ. अनेक संस्थांतर्फे निरोप व मानपत्र समारंभ झाले. त्याचप्रमाणे श्री. भडंग वकील, भिडे वकील, श्री. दादासाहेब शुक्ल, भाऊसाहेब साबणे, डॉ. चांदे, प्रा. अणे, डॉ. कवीश्वर, वसंतभाई शहा, आनंद भवन उपहारगृहाचे श्री. पाटील, श्री. बर्डे, डॉ. पारसनीस, डॉ. एकबोटे अशा अंभईकरांच्या अनेक स्नेह्यांनी त्यांचा व्यक्तिश: सन्मान केला.

अंभईकर खामगांवहून निघाले ते बुलढाणा येथे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. माणिकराव पाटील यांचेकडे त्यांचा पंधरा दिवस मुक्काम होता. तेथील बार असोसिएशन व एडेड हायस्कूलच्या हॉलमध्ये सत्कार समारंभ आणि गायनाचे कार्यक्रम झाले. बुलढाण्याहून अंभईकर मंडळी नागपूरला गेली. तेथे विदर्भ साहित्य संघाच्या वतीने धनवटे रंगमंदिरात त्यांच्या गाण्याचा कार्यक्रम व सत्कार समारंभ झाला. अध्यक्ष श्री. मधुकर अष्टीकर, कवि अनिल उर्फ आ. रा. देशपांडे, मनोहर म्हैसाळकर आदींची गौरवपर भाषणं झाली. नागपूरहून अंभईकरांचं मुंबईला पुनरागमन झालं.

## दिवस बदलले :

मुंबईत परत पदार्पण करण्याची अंभईकरांची उडी तशी अंधारातच घेतलेली असली तरी इथे आल्यावर त्यांना नशिबाची साथ मिळू लागली. खामगाव आणि इतर ठिकाणच्या सत्कार समारंभात अंभईकरांना बऱ्यापैकी प्राप्ती झाली होती. तिचा मुंबईत सुरुवातीचा खर्च भागवायला उपयोग झाला. मुंबईत परत आल्यानंतर लवकरच १९८२ साली हिमगौरीचा विवाह नागपूर येथे डॉ. रवींद्र देशपांडे यांच्याबरोबर संपन्न झाला. मोठा मुलगा सतीश लग्न झाल्यावर वेगळा रहायला लागला. आणि अकोल्याला स्थायिक झाला. गिरीशनं मुंबईत आल्याबरोबर सेंट्रल टेलीग्राफ ऑफिसमध्ये नोकरीसाठी अर्ज केला होता. त्याला सात-आठ महिन्यांतच नोकरी लागली. अशा प्रकारे एक मुलगी सासरी गेल्यामुळे, एक मुलगा वेगळा राहू लागल्यामुळे आणि दुसऱ्या मुलाला उदरनिर्वाहाचं कायम साधन मिळाल्यामुळे अंभईकर मुंबईत परत आल्यापासून केवळ एका वर्षात घरात अंभईकर पती-पत्नी आणि गिरीश एवढीच माणसं उरली आणि आर्थिक सावटाचं संकटही आपोआप दूर झालं. गिरीश पं. पंढरीनाथ नागेशकर ह्या सुप्रसिद्ध तबलानवाझाकडे तबला शिकत असून तबला चांगल्या प्रकारे वाजवितो व साथही करतो. त्यामुळे ७० वर्षांच्या अंभईकरांचा संसार चारचौघांसारखा पुन्हा सुरळीतपणे सुरू झाला. त्यांनी कर्तृत्वशक्ति व जिद्द जागृत झाली हेच त्याचं मुख्य कारण.

## उपेक्षा :

कलावंतानं सतत लोकांपुढं असणं हे त्याच्या व्यावसायिक गुणवत्तेवर अवलंबून असतं. जसं रंगभूमीवरील नट, बोलपटातील नटनटी, गायक, गायिका इ. कलावंत त्या त्या भूमिकेद्वारा लोकप्रिय होतात. अंभईकरांची गुणवत्ता प्रामुख्याने संगीत दिग्दर्शन, ध्वनिमुद्रण, शास्त्रीय व सुगम संगीत, साहित्य सहवास, राजकीय सहवास अशा अनेक मार्गांनी प्रकट झाली असून विशेषकरून वन्देमातरम् राष्ट्रगीताच्या प्रसार माध्यमातून राजकीय क्षेत्रात लोकप्रियता मिळाल्याचं प्रामुख्यानं दिसून येतं. तरीपण काही लोकप्रिय गीतांच्या चाली अंभईकरांच्या असूनही त्याचं श्रेय दुसऱ्याच संगीत दिग्दर्शकानं घेतल्याचं किंवा त्याच्या चाहत्यांनी त्याला दिल्याचं दिसून येतं. उदाहरणार्थ वन्देमातरम् या गीताची चाल श्रीमती मोगूबाई कुर्डीकरांना शिकवून अंभईकरांनी कोलंबिया कंपनीतर्फे त्याची ध्वनिमुद्रिका काढली असताना ती चाल एका दुसऱ्याच संगीतकारांची असल्याचे प्रसिद्ध झाले होतं. तसेच सुमन माटे यांना दिलेल्या 'सखये प्रेमपत्र पहिले' या गीताची चालही अंभईकरांचीच असताना त्याचं श्रेय दुसऱ्याच कोणा दिग्दर्शकानं घेणं हा संगीत



क्षेत्रातला भ्रष्टाचारच समजला पाहिजे.

आता आताचीच गोष्ट आहे. अंभईकर सांगतात, माजी केंद्रीय नभोवाणी मंत्री श्री. वसंत साठे आणि अंभईकर सह्याद्री गेस्ट हाऊसवर वन्देमातरम्‌वर बोलत असताना साठ्यांनी सारंग रागात वन्देमातरम् गीत म्हटले. त्यामुळे गोड आवाज, रागाची जाण, ताल, स्वर, लय यांवर पकड इ. गुण प्रकट झाल्यानं अंभईकरांना आश्चर्याचा नि आनंदाचा धक्काच बसला. यावरून हा बोध निघतो की एखाद्या व्यक्तिच्या सहवासानंच तिच्यातील सुप्त गुण प्रकट होतात. प्रा. ना. सी. फडके यांना तबला वाजवता येत होता हे त्यांच्या सहवासात आल्यानंतरच कळलं. तात्पर्य, कलावंतांची उपेक्षा केल्यानं किंवा झाल्यानं तो मागं पडल्याचा भास होतो. परंतु प्रतिपक्षाचा 'वीक पॉइंट' लक्षात आल्यानंतर मात्र त्याची कीव कराविशी वाटते.

काही कलावंत केव्हाही भेटले तरी अंभईकरांना विचारीत की, खामगांवहून कधी आलात? मग ते सांगत की, मला मुंबईत येऊन १०-१२ वर्षं झाली. कलावंत कलावंताला नेहमी भेटत राहिला तरच त्याची आठवण रहाते नाहीतर त्याची उपेक्षाच होतं. ही वृत्ती गेली पाहिजे. संगीतकला एक, कलावंत, उपासक अनेक. त्यामुळे सर्वांनीच एकमेकांना सांभाळले पाहिजे, त्याचा आदर राखला पाहिजे असं अंभईकरांचं स्पष्ट मत आहे.

## सध्याची परिस्थिती :

मन उद्विग्न करणारे असे काही प्रसंग क्वचित घडले असले तरी अंभईकर ते उगाळीत बसत नाहीत. उतारवयातील त्यांचं आयुष्य सध्या चांगले सुखसमाधानानं चाललं आहे. गिरीश नोकरी करून बी.ए. झाला आहे. गेल्या वर्षी त्यांचा विवाह होऊन आता त्याला नचिकेत नावाचा मुलगा आहे. अंभईकरांचं ८४ वर्षांचं वय झालं असलं तरी साहित्य, संगीत, राजकारण आणि समाजकारणाबाबतची त्यांची ओढ जराही कमी झालेली नाही. एखादी गोष्ट वाचनात आली आणि तिची तीव्र प्रतिक्रिया त्यांच्या मनांवर उमटली तर ते लगेच आपले विचार व्यक्त करणारे पत्र लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, तरुण भारत (नागपूर) किंवा इतर एखाद्या महत्त्वाच्या वर्तमानपत्राकडे रवाना करतात. साधारणत: दर महिन्याला त्यांची अशी दोन तरी पत्रं वर्तमानपत्रांत छापून येतात. चर्चा, परिसंवाद, व्याख्यानं, मैफिली अशा सांस्कृतिक कार्यक्रमांना ते आवर्जून उपस्थित राहतात आणि रसास्वाद घेतात.

मुंबईला पुनरागमन झाल्यावर म्हणजे १९८२ ते १९९६ या काळात मुंबई दूरदर्शनवर अंभईकरांचे अनेक कार्यक्रम प्रक्षेपित झाले. प्रतिभा आणि प्रतिमामध्ये श्री. रवींद्र पिंगे

यांनी घेतलेली मुलाखत, 'गांधीजींच्या सहवासातील सोनेरी क्षण', 'पंचम जॉर्ज ते म. गांधी' या विषयावर श्री. सिराज सईद यांनी हिंदीतून घेतलेली मुलाखत, दुपारच्या चॅनेलच्या उद्घाटनाच्या दुसऱ्या दिवशी त्याचं झालेलं गायन व भाषण, 'बर्फावरील संगीतयात्रेवर आधारित कार्यक्रम', 'साहित्यिकांच्या सहवासातील मनोरंजक आठवणी', 'स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या उपस्थितीत झालेले गाण्याचे कार्यक्रम', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संगीत', 'एका स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत', अशा अनेकविध विषयावरील प्रक्षेपित झालेले कार्यक्रम पहाता अंभईकर आपल्या संगीतक्षेत्रापासून दूर गेल्याचं जरासुद्धा वाटलं नाही. तसेच मुंबई आकाशवाणीवर कवी वसंत बापट यांनी 'मासिक पत्रिका' करता घेतलेल्या खास मुलाखतीतील त्यांनी गायलेली गाणी याही वयात त्यांच्या आवाजातील जतन करून ठेवलेल्या गोडव्याची साक्ष देतात. विविध भारतीवरून 'विशेष गीतगंगा' कार्यक्रम सादर करण्यात आला. श्रीमती उत्तरा केळकर, शोभा जोशी, उषा आमोणकर, माणिक भिडे इ. लोकप्रिय नवोदित कलावंतांना गोड नि आकर्षक चाली देऊन त्या ध्वनिमुद्रित केल्या. बाकी एवढं मात्र खरं की, या गाण्यांच्या कमर्शियल कॅसेटस् निघाल्या असत्या तर त्यांचा खप होऊन अमाप लोकप्रियता मिळाली असती.

१९३१ सालापासून आकाशवाणीशी प्रत्यक्ष संबंध झाल्यानंतर पुढे म्युझिक प्रोड्यूसर कंपोजरच्या श्रेष्ठ पदावर रुजू झाल्यावर अंभईकरांनी आकाशवाणीचा दर्जा वाढविण्यासाठी शास्त्रीय व सुगम संगीताच्या कार्यक्रमात खूपच विविधता आणली याचं वर्णन मागं आलंच आहे. असं असताना आणि ते ऐंशीच्या वर्षाच्या जवळपास असताना त्यांना संगीताच्या चाचणी परीक्षेकरता (ऑडिशनकरता) बोलावून केवळ आकाशवाणीच्या संगीताचा 'दर्जा' वाढविण्याच्या अधिकाऱ्यांच्या अट्टाहासाकरता एका श्रेष्ठ कलावंतांचा अपमान करून आकाशवाणीनं काय मिळवलं? अशामुळे तिच्याकडून न्याय्य नि प्रामाणिक धोरणाची अपेक्षा करणं योग्य होईल काय? तसंच सल्लागार मंडळाचे सदस्य असताना अंभईकरांनी केलंल्या सूचना, तसंच स्थानिक ऑडिशन कमिटीचे जज्ज असताना केलंले कार्यसुद्धा दुर्लक्षित व्हायला नको. माजी केंद्रीय आरोग्य मंत्री श्रीमती सरोज खापर्डे यांच्या दिल्लीच्या निवासस्थानी अंभईकरांच्या गाण्याचा छोटासा कार्यक्रम झाला. पुढे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांनाही गाणं ऐकविण्याचं भाग्य त्यांना लाभणार होतं. पण राजीवजींच्या आकस्मिक दुर्दैवी मृत्यूमुळे योग आला नाही. अशा अनेक प्रकारच्या कामी अंभईकरांचे परम स्नेही श्री. जितेंद्र सुर्वे यांचं अमोल सहकार्य लाभलं होतं.

अंभईकरांच्या संघर्षमय जीवनात आणखी एक भर पडली. ध्वनिफितीच्या आजच्या युगात जुन्या ध्वनिमुद्रिकांना ग्रामोफोन मशीनवर वाजवायला स्थान राहिलं नाही. त्यांचा



५०-६० वर्षांपूर्वीच्या काही शास्त्रीय संगीताच्या व मराठी भावगीतांच्या उत्तम स्थितीत जपून ठेवलेल्या ध्वनिमुद्रिका त्यांनी मुंबई आकाशवाणीला वाजविण्यासाठी देणगीदाखल दिल्या. पण त्या कधी वाजविल्या गेल्या नसल्यानं चौकशीकरता कळलं की, 'त्या रेकॉर्डस् दिसत नाहीत. कुठंतरी ठेवल्या असतील.' काही महिन्यांनी 'सापडल्या काय', म्हणून विचारल्यानंतर 'त्या तांत्रिक दोषामुळे वाजविण्यालायक नाहीत.' असं कळलं. एका मोठ्या सरकारी यंत्रणेत संगीतकलेची उपेक्षा होत असलेली पाहून अंभईकर निराश होणार नाहीत तर काय? तसंच केंद्र व राज्य शासनाकडून कलावंतांना मिळणाऱ्या पुरस्कार निवडसमितीच्या सदस्यांत न्याय, गुणवत्ता, कलाकारांच्या तपश्चर्येची जाणीव गांभीर्य, प्रामाणिकपणा आदी गुणांना अभाव असल्यामुळे अनेक चांगल्या गायक-गायिकांची ते प्रसिद्धीच्या झगमगाटात नसल्यानं कुचंबणाच होत आली आहे.

## तरुण पिढीसमोर आदर्श नाही :

या चरित्राच्या निमित्तानं आठ दशकांहून अधिक आयुष्य परिपूर्णतेनं भोगलेल्या अंभईकरांना आजच्या परिस्थितीविषयी आणि तरुण पिढीविषयी काय वाटतं असं विचारलं, तेव्हा ते या बाबतीतीत समाधानी नसल्याचं प्रत्ययाला आलं. हिंसा आणि भ्रष्टाचाराच्या दोन घुशी समाज जीवनाला कुरतडीत असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना कोणी त्राताच उरला नाही अशी त्यांची धारणा आहे. जीवनाच्या कुठल्याच क्षेत्रात कसलीच मर्यादा कोणी मानीत नाही याचं त्यांना वाईट वाटतं. तरुणांसमोर कोणताच थोर आदर्श नसल्यामुळे आणि त्यांच्यावर योग्य ते संस्कार होत नसल्यामुळे त्यांना आपल्या जीवनाचं प्रयोजन कळेनासं झालं आहे आणि ते नैराश्याच्या, वैफल्याच्या गर्तेत सतत चालले आहेत हे पाहून त्यांचं मन विषण्ण होतं. महाराष्ट्र ही संत सत्पुरुषांची भूमी असून त्यांनी आपल्या वाङ्मयातून आणि प्रत्यक्ष आचरणांतून अनेक अनुकरणीय आदर्श आपल्यापुढे ठेवले आहेत. पण अभिमान वाटावा अशा या संस्कृती आणि परंपरेकडे पाठ फिरवून आबालवृद्ध तासन्तास दूरदर्शनसमोर बसून राहतात हे लक्षण चांगलं नसल्याचं ते अभिनिवेशानं सांगतात. संगीताबाबतही हल्ली पीक उदंड असलं तरी दर्जा खालावत चालला आहे असं त्यांना वाटं. रोजच्या रियाजाशिवाय गानदेवता आपलं रहस्य कधीही उकलून सांगत नाही हा त्यांचा दृढ भाव आहे. 'गुणा: पूजा स्थानं गुणाषु न च लिंग न च वय:' ही परिस्थिती राहिली नसून लांगूलचालन, वशिलेबाजी, भ्रष्टाचार यांना ऊत आला असून गुणाचं चीज होत नाही असं ते म्हणतात.

## चरित्राचा ताळेबंद :

अंभईकरांच्या आयुष्याचा ताळेबंद मांडायचा ठरवलं तर त्यात जमेच्या बाजू निर्विवादपणे अधिक आहेत. त्यांची जीवनसरिता मेहेकर, देवळी, नागपूर, मुंबई, खामगांव व पुन्हा मुंबई अशी वाहिली. आयुष्याचं पहिलं अर्धशतक ते परिपूर्ण जीवन जगले. कौटुंबिक जीवनातही ते कृतार्थ आहेत. औपचारिक शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झालं असलं तरी त्यांनी वाचन, स्वतंत्र विचार आणि आपली कला यांच्या जोरावर स्वत:चं व्यक्तिमत्त्व चांगलं जोपासलं आणि निरनिराळ्या क्षेत्रातील समकालीन नामवंतांची मान्यता मिळविली.

त्यांच्यातला उणेपणा एकच. आपण मूलत: कलासक्त आहोत आणि आपण तसेच राहिलो तरच आपण प्रगतीपथावर राहू ही गोष्ट ते ऐनवेळी विसरले. चमत्काराबद्दल कितीही आकर्षण असलं तरी ते चमत्कार ते जादूच्या प्रयोगातही पाहू शकले असते. त्यांना परमार्थाची ओढ अशी कधीच नव्हती. जीवनाच्या सर्व अंगांबद्दल त्यांच्या मनात आसक्ती होती आणि अजूनही आहे. त्यामुळे खामगांवमधील दोन दशकांहून अधिक काळच्या वास्तवात त्यांची परमार्थात थोडीसुद्धा प्रगती झाली नाही. सर्व बाजूंनी बहराला येऊ पाहाणारं संगीत मात्र एकाएकी खुंटलं. संत पाचलेगांवकर महाराजांना हो म्हणताना त्यांच्या हे लक्षात आलं नाही की, परमेश्वरानं देवराव अंभईकरांना विनायक नावाचा मुलगा दिला तेव्हा स्वर्गातून भूतलावर पाठविण्याची पाळी कुणी ऋषिमुनीची नव्हती, ती होती एका गंधर्वाची!

उपसंहार : उपोद्‌घातात अंभईकर या व्यक्तीविषयी आपलंच म्हणणं खरं असा वाद प्रत्येकजण घालीत असला तरी तो आंधळ्यांनी केलल्या हत्तीच्या वर्णनासारखा होता. ज्याच्या हाताला पाय लागला तो म्हणत होता हत्ती म्हणजे एक खांब आहे. ज्याच्या हाताला कान लागला तो म्हणत होता हत्ती म्हणजे एक सूप आहे. ज्याला हाताला सोंड लागली तो म्हणत होता हत्ती म्हणजे जमिनीपासून उंचावर वळवळणारा एक अजगर आहे. त्याच वेळी अंभईकर मात्र शांत बसून आपल्या चेहऱ्यावर विशिष्ट मिश्किल भाव आणून पारमार्थिक परिभाषेचा परिचय झाला असल्यामुळे स्वत:शी म्हणत होतं – सोहऽम्, सोहम् – तोच मी तोच मी!



### परिशिष्ट – १

# वेचलेले क्षण



## छोट्याशा घरात मोठ्यांच्या बैठकी :

नागपूरातील सिताबर्डीवरील आमचं कौलारू घर नागमोडी वळणाच्या गल्लीबोळात होतं. खाली दोन लहान खोल्या, पाच लाकडी जिन्याच्या पायऱ्या चढून गेल्यावर माडी, समोर छोटी आंगणवजा ओसरी. ओसरीचा उपयोग गाई, बकऱ्या वगैरे जनावरांनाच होत असे. घराचे भाडे दरमहा पावणे सात रुपये होतं. याच घरात माझी मौंज झाली. पुढे याच घरात नारायणराव व्यास, गंगूबाई हनगल, हिराबाई बडोदेकर, वझेबुवा, निस्सार हुसेन खाँ, मल्लिकार्जून मन्सूर वगैरे बडी मंडळी येऊन, जेवून व माझं गाणं ऐकून गेले. याच घरात मुंबईच्या कोलंबिया कंपनीचे रतीलाल व्यास व अल्लाबक्ष माझं गाणं ऐकून रेकॉर्डिंग ठरवून गेले. घरात वीज आली नव्हती. टेबल लॅम्प व कंदिलाच्या प्रकाशात मैफली होत. पण त्यात आनंद होता. गल्लीत एकमेव म्युनिसिपालटीचा खुटकंदील उंच खांबावर होता. त्यामुळे दिव्याखाली अंधारच

असायचा. या अंधारात एक दीडशिंगी गरीब गाय नेहमी बसायची. बाहेर जाता–येता तिची ठोकर लागल्यावरच तिचं अस्तित्व जाणवायचं.

तर सांगायचं असं की, निस्सार हुसेन खाँ साहेबांनी तोडीतला तराणा माझ्या आग्रहास्तव गायला. 'बरकत वा लियो ठाडो' ही काफी रागातली चीज मी गाऊन दाखविल्यावर ती कशी बरोबर गावी हे मल्लिकार्जून मन्सूरांनी याच घरात सांगत व गात तासाभराच्या बैठकीत रंग भरला. माझे सहाव्या नंबरचे बंधू शंकरराव तबला व सारंगी ही कठीण वाद्ये त्याकाळी गुरुच्या अभावी घरीच रियाज करून साथ करण्याइतपत वाजवायला शिकले. पाच नंबरचे भाऊ कृष्णराव व्हायोलिन वाजवित. माझ्या पहिल्या ध्वनिमुद्रिकेत दोन गाण्यांना त्यांनी व्हायोलिनची साथ केली.

## आई थोर तुझे उपकार । काटे असती सर्वांगावर ।।

नागपूरला मी मराठी दुसऱ्या वर्गात शिकत असता वार्षिक परीक्षा घेण्यासाठी इन्स्पेक्टर आले. पाठांतराची परीक्षा घेताना त्यांनी 'आई थोर तुझे उपकार' ही कविता म्हणायला सांगितली असता, 'वदत विनोदे हासत सोडी कोण दुधाची धार' ही ओळ म्हणण्याऐवजी 'फुल गुलाबाचे सुबक हे फुल गुलाबाचे' या कवितेतली पुढची ओळ 'काटे असती सर्वांगावर' ही चुकून म्हटली गेली. कारण दोन्ही कवितांच्या चाली सारख्याच असल्यामुळे हा घोटाळा झाला. इन्स्पेक्टर म्हणाले, 'आईच्या अंगावर काटे असतात, हे कसे?' कविता पाठ नसल्याने इन्स्पेक्टर साहेबांच्या लक्षात येताच ते म्हणाले, 'तुला जी पाठ असेल ती कविता, पद काहीही म्हण.' मग मी मानापमान नाटकातलं 'या नवनवलनयनोत्सवा' हे पद मुखपाठ गावून दाखविलं. साहेब खूष झाले आणि ५० पैकी ३६ मार्क मिळाले.

## वन्दे मातरम् :

मध्य प्रदेशात बिलासपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुमहासभेच्या विद्यमाने झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवात माझा गायनाचा कार्यक्रम झाला. माझे गाजलेले 'वन्देमातरम्' राष्ट्रगीत ऐकण्यास हिंदुत्वनिष्ठ मंडळी तर होतीच. पण महाकौशल काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ठाकूर छेदीलाल, पं. द्वारकाप्रसाद मिश्र इ. काँग्रेसचे नेते, मंत्री वगैरे उपस्थित होतं. कार्यक्रमाच्या शेवटी मी संपूर्ण वन्देमातरम् गीत गायलो. उपस्थित मंडळींनी सुरुवातीपासूनच उभे राहून राष्ट्रगीताला मानवंदना दिली. परंतु



काँग्रेसमान्य प्रथमचरण गाऊन होताच काँग्रेसची मंडळी खाली बसली आणि हिंदुत्वनिष्ठ संपूर्ण वन्देमातरम् गीत होईतो उभी राहिली होती.

## चोरांना श्रीखंडपुरीची पार्टी :

श्री गणेशोत्सवाचे दिवस होतं ते. मी नागपूरहून मुंबईला कार्यक्रमासाठी मुद्दाम आलो होतो आणि गिरगावात माधवाश्रमात मुक्काम होता. माझ्याच खोलीत सुप्रसिद्ध गायक पं. मल्लिकार्जून मन्सूर आणि गंधर्व कंपनीतले गायक नट रामभाऊ गुळवणी उतरले होतं. आम्ही तिघेही एकाच खोलीत असल्यामुळे कार्यक्रम ठरविणारा कोणी आला की, आता माझा कार्यक्रम ठरणार अशी आशा प्रत्येकाला वाटायची आणि कित्येकदा निराशाही व्हायची. आमच्या बाजूच्या खोलीत चोरी होऊन ताट, वाटी, तांब्या, पेला इ. वस्तू कोणीतरी लांबविल्या. त्या बाईला आमच्याविषयी संशय असल्यामुळे पोलिसांनी तिच्या समाधानाकरिता आमच्या खोलीची झडती घेतली. अर्थात काही सापडले नाही. पण आम्हा तिघा गायकांना पाहून पोलिस अधिकाऱ्यांची आम्ही चोर नसल्याची खात्री झाली. मात्र त्यांनी आग्रहाने माधवाश्रमाच्या जवळच असलेल्या पोलिस स्टेशनवर बोलाविले. रामभाऊ गुळवणी अस्वस्थ झाले. मन्सूरजी म्हणाले, 'कर नाही तर डर कशाला?' मी म्हटलं, 'आपण तेथे जाऊन प्रत्येकानं एक एक चीज गाऊन अधिकाऱ्याला खूष करू या.' आणि आमची वरात निघाली पोलीस स्टेशनवर पोहोचली. पोलिस अधिकारी दाभोळकर म्हणाले, 'मी तुमची क्षमा मागतो. त्या बाईंच्या समाधानासाठी म्हणून मी झडतीचा फार्स केला.' रामभाऊ म्हणाले, 'अहो, मी तर कधी चिंधीचीसुद्धा चोरी केली नाही.' दाभोळकर म्हणाले, 'तुम्हा कलावंतांची या निमित्ताने ओळख झाली. आता शेवट गोड करू.' असे म्हणून बाजूच्या खोलीत आम्हाला नेलं व तेथे श्रीखंडपुरी, बटाट्याची सुकी भाजीची पार्टी दिली. गवयाच्या आयुष्यात असाही एक प्रसंग.

## घरात मिलिटरी ऑर्डर :

मुंबईतील गिरगाव चौपाटीवरील सुप्रसिद्ध स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. न. अ. पुरंदरे यांच्या मुलीचा विवाह नागपूरचे प्रसिद्ध ॲडव्होकेट व नागपूर विश्वविद्यालयाचे उपकुलगुरू काकासाहेब पुराणिक यांच्या गोपाळ या मुलाशी झाला. गोपाळ हा माझा जीवश्च कंठश्च वर्गमित्र. त्याच्याबरोबर मी पंधरा दिवस पुरंदऱ्यांच्या घरी राहिलो.

पुढे तो नागपूरला परत गेला. तेव्हा जावयाच्या मागं त्याच्या मित्रानं राहणं योग्य न वाटल्यामुळे मी दुसरीकडे जाण्याचा विचार करू लागलो. एवढ्यात मुसलमानांचा दंगा सुरू झाला. सर्वत्र कर्फ्यू लागल्यामुळे घराबाहेर पडणं कठीण झालं. इतक्यात नागपूरहून माझ्या वडीलबंधूंची तार आली की, 'HALT TILL PEACE!' ही तार घेऊन डॉक्टरसाहेब माझ्या खोलीत येऊन विचारतात की, 'तुमच्या घरी मिलिटरीमध्ये कोण आहे?' मी म्हटलं, 'कोणी नाही.' डॉक्टर म्हणाले, 'मग ही मिलिटरी ऑर्डरची तार कशी? कोणी केली?' मी म्हटलं, 'माझे बंधूंनी मिलिटरी कार्टर्सच्या पोस्ट ऑफिसात अनेक वर्षे पोस्टमास्तर म्हणून नोकरी केली व मिलिटरी ऑफिसर्सच्या सहवासामुळे भाषाही थोडीफार त्यांच्या स्वभावात आली.' डॉक्टर साहेबांनी मात्र दंग्याच्या परिस्थितीत मला घरीच आणखी पंधरा दिवस ठेवून घेतले व नंतर नागपूरला पाठविले.

**डॉ. राजेंद्रप्रसाद जेव्हा प्रशंसा करतात!**



■ ■ ■







नातू नचिकेतसह पं. वि. दे. अंभईकर
व सौ. मंदाकिनी



मातोश्री श्रीमती भीमाबाई



श्री. व सौ. अंभईकर



श्वशुर डॉ. नरहर अनंत बर्वे





नमो मातृभूमी । जिथे जन्मलो मी (मेहेकर या जन्मगावी)



उजवीकडून केंद्रीय नभोवाणी मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर,
एन.एस. मूर्ती, केशवराव भोळे, राजा बढे व अंभईकर





'वन्दे मातरम् अभियान' संसदेत पं. नेहरूंसमवेत



प्रा. ग. प्र. प्रधानांसह





'वेचलेले संगीत मोती' प्रथमावृत्तीच्या प्रकाशनाप्रसंगी तत्कालीन
सांस्कृतिकमंत्री प्रमोद नवलकर आणि श्री. सुधीर फडके



श्री. जितेंद्र सुर्वे, श्री विद्याधर गोखले यांसह





ध्वनिमुद्रण प्रसंगी
व केशवराव भोळे यांचेबरोबर



श्री. सुधीर फडके यांचे हस्ते
नव्वदीनिमित्ताने सत्कार



कुसुम रानडे, गिरीष, स्नेहल भाटकर, श्री. मेहेर, श्री. सुधीर फडके,
सौ. गार्गी अंभईकर, श्री. ठाकूरदेसाई





पं. व्ही. जी. जोग यांसमवेत



मा. कृष्णराव,
कोलंबिया ग्रामोफोन कंपनीचे
मॅनेजर कुपमन व श्री. अंभईकर



सौ. उषा कोलते व
डॉ. वि.भि. कोलते यांचेबरोबर





प्रा. न. र. फाटक, अझमत हुसेन खाँ, मुंबई आकाशवाणी
केंद्राधिकारी श्री. भट व सौ. भट यांच्याबरोबर श्री. अंभईकर



जनता जनार्दन अनंद हरी गद्रे, लीलाताई पुरंदरे व
पेटीवर श्री. अंभईकर (१९४९)





महाराष्ट्राचे राज्यपाल हरेकृष्ण मेहतांशी परिचय करून देताना
श्री. अंभईकर व आकाशवाणीचे अधिकारी



शिवमंगल संगीतिकेच्या ध्वनिमुद्रणप्रसंगी श्री. व्ही. जी. जोग,
कुमुद मोघे, डॉ. एस.एन्. रातजनकर, श्री. अंभईकर, श्री. वामनराव सडोलीकर,
लक्ष्मीशंकर, अफीज अहमदखान व फणसीकर





उद्योगपती श्री. हनुमान शेठ अग्रवाल
तात्यांचा सत्कार करताना.



साद देती हिमशिखरे...



खामगावच्या प्रतिष्ठीत रसिकांनी सत्कार केला तेव्हा अंभईकर!





सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्सचे श्री. राम पागे,
डॉ. सुरेश चांदवणकर यांचेबरोबर.




'वन्दे मातरम्'च्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवप्रसंगी श्री. सबनीस
कॉलीन पाल, श्री. जयंतराव टिळक, श्री. विक्रमदेव (बिपिनचंद्र पाल
लो. टिळक व लाल लजपतराय यांचे नातू), श्री. मोरोपंत पिंगळे,
श्री. अंभईकर व श्री. उत्तमराव कानिटकर





मुलगा चि. गिरीश, गार्गी, मंदाकिनी आणि नातू नचिकेत



नात श्रुती



थोरले जामात श्री. सुधीर आपटे, मुलगी शोभा, चि. राहूल व रोहित ही नातवंडे



धाकटे जामात डॉ. रवींद्र देशपांडे, कन्या डॉ. हिमगौरी व नात आदिती





'वंदेमातरम्'ला लाभलेली कोरसपार्टी (१९४०)



संगीत सुधाकर श्री
विनायक अंभईकरने
नागवाडी में पांच
घंटे तक अपने मधुर
स्वरसे गायन सुनाये.
इसका बहुत आनंद
हुआ. मेरी उमेद है
कि इनकी कलामें
दिन प्रतिदिन उन्नति
होती जायगी और
वे प्रख्यात होंगे.
वर्धा मोकगांधी
७-८-३५

महात्मा गांधीजींचे प्रशंसापत्र

परिशिष्ट - १

# वि. दे. अंभईकरांचे निवडक लेख

१

## आकाशवाणी व दूरदर्शनवर कलावंतांचे स्थान :

('महाराष्ट्र टाइम्स', १ मार्च १९९२ )

आज संगीतकलेचा विकास आकाशवाणी, दूरदर्शन, बोलपट ध्वनिफिती, संगीत परिषदा इ. प्रसारमाध्यमांतून झपाट्याने होत असून त्याची अभिरूची खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली आहे. एकेकाळी शास्त्रोक्त संगीताच्या ध्वनिमुद्रिका हॉटेलात, मोटारस्टँडवर, पानाच्या ठेल्यावर भोंग्याच्या फोनोग्राफच्या साह्याने वाजविल्या जात. त्या काळचे प्यारासाहेब, जोहराजान, अंबालावाली, मलकाजान आग्रा, जानकीबाई, केशवराव भोसले, बालगंधर्व, इ. गायक-गायिकांच्या ध्वनिमुद्रिका ऐकण्याचे भाग्य लाभणे दुर्मिळ होतं. आज आकाशवाणीवर वझेबुवा, केसरबाई केरकर, पं. ओंकारनाथ, अब्दुल करीम खाँ, फैय्याझ खाँ इ. गायकांच्या ध्वनिमुद्रिका वाजविल्या जातात. अशा कलावंतांच्या मैफिली पूर्वी रात्रभर चालत. ती एक प्रकारची संगीताची मेजवानीच होती. आज मात्र संगीताची 'राईस प्लेट' झाली आहे.

### आकाशवाणीचे कर्तव्य :

शास्त्रीय, उपशास्त्रीय सुगम संगीताचा हा अमोल ठेवा आज जतन करून ठेवणे आवश्यक आहे. भारतातील प्रत्येक आकाशवाणी केंद्राने त्या त्या भागात असलेल्या विद्वान नि बुजुर्ग गायक वादकांच्या चिजांच्या व रागदारीच्या कॅसेटस् काढाव्यात. त्या नवीन पिढीला मार्गदर्शक नि साधनेच्या दृष्टीने निश्चितच उपयुक्त ठरून गुरुप्रमाणे त्यांचा उपयोग होऊ शकेल. तसेच जुन्या, दुर्मिळ रेकॉर्डस् आढळल्यास किंवा कोणी

देणगीदाखल भेट म्हणून आकाशवाणीला दिल्या तर त्या काळजीपूर्वक जतन करून मधून मधून वाजविल्या गेल्या पाहिजेत. संगीत-संशोधनाकरता व अभ्यासाकरता तो विषय ठरू शकेल. यासाठी संगीताची चांगली जाण असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक करणे कठीण नाही. किंवा त्या खात्यातील संबंधितांनी जबाबदारी ओळखून हे काम केलं पाहिजे. तसेच शनिवार-मंगळवारच्या राष्ट्रीय कार्यक्रमात (दिल्ली) त्या रेकॉर्डस्‌चा समावेश केला पाहिजे. यात दिल्लीच्या केंद्रीय ऑडिशन बोर्डाचा फार मोठा जबाबदारीचा वाटा आहे. कित्येकदा अनेक कलावंतांच्या नुकसानीला हे बोर्ड कारणीभूत होतं. ऑडिशनचा निकाल वर्षानुवर्षे लागत नाही. त्यामुळे कित्येक लोकप्रिय कलाकारांना योग्य न्यायाच्या अभावी आकाशवाणी, दूरदर्शनच्या कार्यक्रमांना मुकावे लागते. निदान दूरदर्शनने तरी अशा गुणी कलावंतांना न्याय देऊन 'स्पेशल केस' म्हणून त्यांना उत्तेजन देऊन त्यांचं कार्यक्रम केलं पाहिजेत. साठ वर्षांपूर्वी कलाकारांची संख्या कमी होती. त्यामुळे त्यांचं कार्यक्रम सहज होत असत. तसेच रेडिओ रेकॉर्डिंगची पुरेशी सोय नसल्याने स्वत:चे गायन स्वत:ला ऐकता येत नसे. पुढे संगीताचा प्रसार व गायकवादकांची संख्या वाढल्यामुळे ऑडिशन पद्धतीचा उगम झाला. त्याचे दोन भाग, एक लोकल ऑडिशन कमिटी आणि दुसरी केंद्रीय म्युझिक ऑडिशन बोर्ड, की जे अनेक कारणास्तव वादग्रस्त ठरले!

कित्येक पंचाहत्तरी उलटून गेलेले कलावंत ऑडिशन देतात आणि आकाशवाणीचे ऑडिशन बोर्ड आपले 'स्टँडर्ड' टिकविण्यासाठी त्यांना खालची ग्रेड देऊन अपात्र ठरवते. वयस्क, मान हलणाऱ्या व कापरा आवाज असलेल्यांनी म्युझिक ऑडिशनपासून दूर रहाणे शहाणपणाचेच ठरेल. संगीताला वयाचे बंधन नाही. अब्दुल करीम खाँ नेहमी म्हणत की, जन्मभर मी विद्यार्थी आहे या भावनेने रियाज केला तरच कला टिकून कलाकाराची प्रगती होईल. फार थोडे याचे पालन करणारे आढळतील. बाकीचे मात्र होतकरू महत्त्वाकांक्षी, मेहनती असलेले कलावंत आकाशवाणीच्या नियमात भरडले जातात. यात कित्येकदा नियमांचा अतिरेक होत असून कलाकार नियमांकरता नसून नियम कलाकारांसाठी आहेत हे पदाधिकाऱ्यांनी विसरता कामा नये. उलट अशा कलावंतांचा दर्जा वयोमानापरत्वे थोडा खालावलेला असला तरी त्यांना आयुष्यभर केलंल्या तपश्चर्येबद्दल एकतर वरची ग्रेड देऊन गौरवायला पाहिजे. अथवा त्यांना म्युझिक ऑडिशनमधून पूर्णपणे वगळून (Excmption) त्यांची म्हणजे पर्यायाने कलेची बूज राखायला पाहिजे. अशा कलाकारांच्या पात्रापात्रतेच्या



बाबतीत मुंबईसारख्या मोठ्या नि महत्त्वाच्या आकाशवाणी केंद्र निर्देशकांनी केवळ दिल्लीकडे बोट दाखवून स्वस्थ न बसता तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना व तसेच म्युझिक ऑडिशन बोर्डाच्या परीक्षकांना खडसावून जाब विचारून कलाकारावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. हे धाडस पूर्वीचे होऊन गेलेले स्टेशन डायरेक्टर्स जसे झाफरउल्लाखान बुखारी, व्हिक्टर परंज्योती, लक्ष्मणन्, बी. पी. भट, एस. एन. मूर्ती, मलीक, श्री. कृष्णन वगैरेंच्यामध्ये होतं. याबरोबरच या अधिकाऱ्यांना व परीक्षकांना साधारणपणे सर्व प्रमुख घराण्यांच्या गायकीची, बंदिशीची व त्यांच्या मानकऱ्यांच्या नावाची तोंडओळख असणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे कलावंतांचे समाजातील स्थान, प्रतिष्ठा नि लोकप्रियता याचाही विचार करायला हवा. आपल्या आवडत्या घराण्याच्या पारंपारिक कलावंताला तेवढा न्याय दिल्याने बाकीच्यांवर अन्याय होतो याचे भान त्यांनी ठेवायला हवे. याबाबतीत सल्लागार मंडळांनी आपल्या सल्ल्याचा उपयोग होण्याकरता नेहमी जागरूक रहायला पाहिजे.

आत्म्याशिवाय शरीराला अस्तित्व नाही. तसे संगीतकलेशिवाय कलावंताला अस्तित्व नाही. प्रकाशात आलेल्यांना पुन्हा पुन्हा पदव्या पुरस्कार देऊन मान्यता देण्याचे कार्य संगीत नाटक ॲकॅडमी, केंद्र व राज्य सरकारे, गांधर्व महाविद्यालय, तानसेन महोत्सवासारख्या संस्था करतात. त्याबरोबरच अंधारातील गुणी पण उपेक्षित कलावंतांना शोधून काढून त्यांना प्रकाशात आणून त्यांच्या गुणांचे चीज करून जनता जनार्दनाला त्यांच्या कलेचा आस्वाद घेण्याचे भाग्य लाभू दिले पाहिजे. तरुण वयातील कीर्तीवंत, गुणंवत अशा कलाकारांना त्यांच्या तरुणवयातच मान-सन्मान-पुरस्कार देणे उचित ठरेल. नपेक्षा 'मरणोत्तर परमवीरचक्रा'च्या मानकऱ्यांसारखे त्यांना गौरविणे होईल. ज्ञानेश्वरांनी 'सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहून ते अमर झाले. पण त्या काळी समाजाने ज्ञानेश्वराला 'पद्मश्री' द्यायचे ठरविले असते तर एवढ्या बालवयातच त्या मुलाला त्यावेळच्या समाजधुरीणांनी अपात्रच ठरविले असते.' तात्पर्य, आकाशवाणी, दूरदर्शनसारख्या प्रभावी प्रसार माध्यमात कलावंतांची गळचेपी होऊ नये यासाठी संगीततज्ज्ञ, गायक, संगीतदिग्दर्शक वगैरेंच्या अनुभवावर आधारलेल्या मुलाखती, त्यांनी केलंल्या अमोल कार्याची माहिती, त्यातील नाविन्य व उद्बोधकता जाणून त्यावर आधारित असे कार्यक्रम पक्षपात न करता तेथील निर्मात्यांनी सादर केलं पाहिजेत. माझ्या या विचाराशी आजचे ख्यातनाम कलाकार, कवी, लेखक, पत्रकार, साहित्यिक सहमत होतील यात शंका नाही.

* * *

# २.

## बालगंधर्वांच्या आठवणी

### (लोकसत्ता, २६ जुलै १९८८)

'येणार येणार व आपले लोकप्रिय खेळ सुरू करणार' म्हणून पूर्वी घरावर, भिंतींवर जाहिराती लागत आणि मग सर्वांना नाटक पहाण्याचे वेध लागायचे. १९२८ साली प्रथमच गंधर्व नाटक मंडळी अमरावतीला येणर म्हणून कळाल्यापासून केव्हा एकदा बालगंधर्वांना पाहीन असं झालं. आजच्यासारखी नाटकं सकाळ, दुपार, संध्याकाळ आणि कधी कधी मध्यरात्रीसुद्धा पूर्वी होत नसत. शनिवार, रविवार व बुधवार अशी तीनच दिवस होत असत. त्यामुळे एखादं चांगलं नाटक पाहिलं की, त्याचे पडसाद चारसहा महिने सहज कानांत घुमत असत. रात्री १० वाजता सुरू झालेलं नाटक कधी कधी पहाटे ४।।, ५ पर्यंत चालायचं.

नारायणरावांच्या आईनं जात्यावर ओव्या गाऊन त्यांच्यावर बालपणीच गाण्याचे संस्कार घडविले. त्याकाळी बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, मलकाजान आग्रा, जोहराजान अंबालावाली, केशवराव भोसले इ. गायक-गायिकांच्या नॉन इलेक्ट्रिकल रेकॉर्डस्नी संगीत शौकीनांस अक्षरश: वेड लावलं होतं. ज्याच्या रेकॉर्डस् माझी आई मला झोपवताना ऐकवत असे ते बालगंधर्व पहायला मिळणार म्हणून कोण आनंद? १९२० सालच्या सुमारास नागपुरातील दोन कुप्रसिद्ध गुंडांनी दिलेल्या त्रासामुळे या नागपुरात पुन्हा पाय ठेवणार नाही अशी प्रतिज्ञा करून गेलेले नारायणराव गंधर्व नाटक मंडळी घेऊन आले ते अमरावतीला १९२८ मध्ये. त्यावेळी मी नागपूरला शाळेत शिकत होतो. अमरावतीत कँपवर माझे थोरले बंधू पोस्टमास्तर होतं. त्यामुळे आगाऊ तिकिटे काढणे सोयीचे जाई. शनिवार सकाळची शाळा संपली की, दुपारच्या मेलने निघून संध्याकाळी अमरावतीला पोहोचायचे आणि शनिवार रात्री व रविवारी दिवसाची नाटके पाहून सोमवारी सकाळी निघून ११ च्या सुमारास परत नागपूरला येऊन शाळेत हजर, असा कार्यक्रम होता.

रायपूर, बिलासपूर, भंडारा, नागपूर, यवतमाळ, चांदा इ. दूरदूरहून लोक गंधर्वांची नाटकं पाहण्यास येत. काही लोक घरातील भांडी विकून अथवा गहाण टाकून ते पैसे प्रवास व नाटकात खर्च करीत असत. इतके लोक नाटकवडे झाले होतं. माझ्या आठवणीप्रमाणे १९३२ साली जेव्हा कंपनी अमरावतीला आली होती तेव्हा पडदे



विकून कर्ज फेडण्याची वेळ आली होती. पण ज्या विदर्भात त्याकाळी सोन्याचा धूर निघत होता, त्या दौऱ्यामध्ये नारायणरावांना अमाप उत्पन्न झाले आणि संकट टळलं. भारीभारीचे जरी-रेशमाचे ड्रेसेस, तऱ्हेतऱ्हेची अत्तरं, खाणंपिणं भरपूर, यामुळे कंपनीतील नटवर्ग नेहमी प्रसन्न होता म्हणून नाटकंही रंगत.

### घरापासून थिएटरपर्यंतचा प्रवास :

अमरावती कँपवरील आमच्या घरापासून गणेश थिएटर मैल, दीड मैल होतं. रस्त्यावर दिवे नव्हते.रात्रीची रहदारी जवळ जवळ बंदच असायची. त्यामुळे टांगा मिळणं अशक्य. आम्ही तिघंचौघं मिळून हातात कंदिल, काठ्या घेऊन रस्त्यात मोठमोठ्यानं गप्पा मारीत जायचो. रस्त्यात म्युनिसिपालटीचे व रॉकेलचे खुट कंदिल दिसायचे. पण दिव्याखाली अंधार होता. चालता चालता आपल्याच पायातील जोड्यानं उडालेल्या एखाद्या खड्यामुळे आवाज झाल्यास त्या भयाण रात्रीत 'वाजे पाऊल आपुले, म्हणे भूतचि आले' अशी माझी अवस्था होई. तशात सापानंसुद्धा आडवं यायला कमी केलं नाही. हा प्रवास एकदाचा संपवून थिएटरजवळ पोहोचलो की कोण गर्दी? 'स्वयंवर' किंमत १।। रुपया, 'मसाला सुपारी' २ पैसे. कोल्हापुरी संगीत चिवडा, वगैरेंच्या आवाजांनी एक प्रकारचं नाट्यमय वातावरण तयार होई आणि घंटा वाजली की उत्कंठा शिगेला पोहोचायची. आत जाऊन आपल्या जागेवर बसून पडदा उघडण्याची वाट पहात नाहीत. तोच धाडकन् बार उडून मखमली पडदा वर जाऊन धूपाच्या सुगंधी धुरानं आतील वातावरण शुद्ध झाल्याचा भास होई.

### थिएटरमधील ७ वन्समोअर :

त्याकाळी एअर कंडिशन्ड थिएटर नव्हतं की लाऊडस्पिकर्सही नव्हते. पण गाणं नि संवाद आठ आण्याच्या पीटापर्यंत स्पष्ट ऐकू जात. तिरखवा खासाहेबांची नरवर कृष्णासमानमधील 'मा' वरच्या समेवर अशी काही विलक्षण थाप पडे की सारं थिएटर दणाणून जाई. स्वयंवरातील या गाण्याला ७ वन्समोअर नारायणरावांनी घेतलेले मी पाहिले. तसंच 'सौभद्र'मधील 'वद जाऊ कुणाला शरण' हे गाणंही अत्यंत भावमधूर नि तन्मयतेने ते गात असत. आज या गाण्याची आठवण झाली की १९२८ सालची रुक्मिणी व सुभद्रा डोळ्यांसमोर उभ्या राहतात. मात्र एकदा नागपूरच्या श्रीमंत बाबूराव देशमुखांच्या वाड्यात कृष्णामास्तरांचे गाणं होतं. अरुंद लांबड माडी

श्रोत्यांनी भरली होती. साथीला मला वाटतं तिरखवाँ तबल्याला, कादरबक्ष सारंगीला आणि हरीभाऊ देशपांडे मात्र ऑर्गनवर नक्की होतं. तब्बल सव्वासात 'वद जाऊ कुणाला शरण' हे पद गाऊन मास्तरांनी रेकॉर्डब्रेक केलं. मी तंबोऱ्यावर असल्यामुळे एकदा निघालेली हरकत पुन्हा आली नाही. इतकं स्पष्ट व चांगलं ऐकलं. नाहीतर आज या गाण्याचे काय हाल?

## आणि असाही एक वन्समोअर :

मी एच.एम.व्ही.मध्ये असताना बालगंधर्वांचं रेकॉर्डिंग करण्याचा योग आला. गाणं संपता संपता सहजगत्या नकळत कोमल रिषभ लागला. ताबडतोब रेकॉर्डिंग थांबवून मी त्यांना म्हटलं, "नाना,. सगळं गाणं छान झालं. पण शेवटी कोमल रिषभ लागला." यावर ते म्हणाले, "इथं कोणा लेकाला सारेगम कळतंय. द्या वन्समोअर नि घ्या रिटेक." असाच प्रसंग मी मुंबईच्या ऑल इंडिया रेडिओत असताना आला. मात्र आता ते खूपच थकले होतं. दोन्ही पाय पंगु, पूर्वीचा आवाज साफ गेलेला, गाताना मधूनच येणारा खोकला व लागणारा दम अशा अवस्थेत रेकॉर्डिंग कसं होईल याची कल्पना असूनही आणि ऐन तारुण्यातलं गाणं व सत्तरी उलटल्यानंतरचं गाणं यातील फरक माहीत असूनही एका महान लोकप्रिय संगीत नटाचं अखेरचं गाणं केवळ संगीत लायब्ररीत ठेवा असावा, भावी पिढीला मार्गदर्शक नि आदर्श वाटावा या उद्देशानं ते रेकॉर्डिंग केलं.

आणि एक दिवस मी व माझे सहकारी श्री. व्ही. जी. जोग रेकॉर्डिंग मशीन इंजिनियर वगैरे लवाजम्यासह माहिमला नाराणरावांच्या घरी पोहोचलो. घर अगदी रस्त्यावर असल्यानं कावळे, कबुतरे यांचे आवाज, मोटारीचे भोंगे, कल्हईवाले, फेरीवाले यांचे ओरडणेसुद्धा टिपले गेले. जणू नारायणरावांच्या गाण्याला ते एक बॅकग्राउंड म्युझिकच. पण या गोष्टीकडे त्यांचं मुळी लक्षच नव्हतं. गान समाधीमध्ये ते इतके धुंद नि मस्त झाले होतं की तोंडातली दाताची कवळी पडली तरी गाणं चालूच होतं. अखेर मी त्यांच्या खांद्याला हात लावून म्हटलं, "नाना, कवळी पडली." तेव्हा ते म्हणले, "ठीक आहे देवा, द्या वन्समोअर." १९३२ साली अमरावतीला कंपनीचा मुक्काम असताना नमुन्यातील मोने यांच्या वाड्यात कंपनीतील कलावंतांचं एका गुरुवारी भजन होतं. मा. कृष्णराव, विनायकबुवा पटवर्धन, गुंडोपंत वालावलकर इ. मंडळी त्यात होती. 'मजला धडावी देवा' हे पद नारायणराव गाताना



एवढे तल्लीन झाले होतं की धोतराच्या निऱ्या सुटल्या तरी त्यांची त्यांना शुद्ध नव्हती. त्यांचा अभिनय जसा त्या भूमिकेत एकरूप होत होता तसं गाणंही स्वत:ला विसरून शब्द, सूर, लय यांच्याशी ते एकरूप होत होतं. संगीत समाधीच ती एक प्रकारची.

## क्रोधातसुद्धा गोडवा! :

नारायणरावांचं गाणं बोलणं जसं गोड तसं रागावणंही गोड वाटायचं. १९२२ साली त्यांच्या कंपनीतील एका नटाची पत्नी वारंवार आजारी पडायची. एकदा व्यवस्थापकानं रजा नाकारली. तेव्हा त्या नटानं सरळ विंगमधून खेळ चालू असता रजा मागितली. नारायणराव म्हणाले, 'ही वेळ रजा मागायची आहे काय देवा? जा तुम्ही जा. आणि पुन्हा न आलात तरी चालेल. आता गेला तरी चालेल? माझी हरकत नाही बरं?'

विदर्भातील खामगांव येथे संत पाचलेगांवकरमहाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमात नारायणरावांचा एक छोटासा कार्यक्रम घडवून आणला. ते म्हणाले, 'देवाच्या चरणी माझी सेवा रूजू झाली तर मी उभा राहू शकेन आणि तुकारामांची भूमिका करण्याचं माझं स्वप्न साकार होईल.' 'अवघाची संसार', 'आवडीने भावे' हे अभंग अखेरच्या अवस्थेतही रंगले. मी पेटीची साथ केली. इतक्यात गोहरबाई म्हणाल्या, 'मी एखादं म्हटलं तर चालेल काय?' त्यावर मी त्यांना सांगितलं. 'बाई!' देवाच्या दरबारात सर्व एक आहेत. काहीसुद्धा मनात आणू नका. आणि शेवटी 'परिणाम गोड व्हावा' या ज्ञानेश्वरांच्या समाधी गीतानं गोहरबाईंनी कार्यक्रमाला दुग्धशर्करा योग आणला. पाचलेगांवकर महाराजांनी नारायणरावांना आणि गोहरबाईंना श्रीफळ व प्रसाद दिला आणि हा अडीच तास चाललेला कार्यक्रम समाप्त झाला. जसे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी तसे बालगंधर्व. या मालिकेत बालगंधर्वांना स्थान देण्याला आणखी एक कारण असं आहे की, वन्दे मातरम् राष्ट्रगीताच्या चालीचा प्रश्न धसास लावताना अनेक थोर व्यक्तींची मतं जशी आजमावली होती तसं बालगंधर्वांनीही माझी चाल ऐकून ती राष्ट्रगीताला पोषक असल्याचं मत व्यक्त केलं होतं. परंतु पं. विष्णु दिगंबर पलुस्करांची काफी रागातील चाल त्यांची स्मृति म्हणून कायम ठेवणं त्यांना अधिक पसंत होतं. यास्तव टिळक, गांधींसारख्या थोर व्यक्तिंमध्ये बालगंधर्वांना स्थान देणं योग्य आहे, असं मला वाटतं.

* * *

३.

# पशुपक्षांच्या सहवासातील आवाजाची दुनिया

('लोकसत्ता', १९/७/१९९२)

'लोकसत्ता'च्या १४ जून ९२ च्या अंकातील 'सात सुरांची बर्फिली मैफल' हा अग्रलेख वाचून पेंग्विनसारखे पक्षी संगीतावर लुब्ध होतात हा शोध वाचून आनंद वाटला. या शोधामुळे श्रीकृष्णाच्या मुरलीने गाई-वासरे जमा होत याला पुष्टीच मिळते. श्रीकुमार चतर्जींनी ज्या गाण्यांच्या कॅसेटस् बरोबर नेल्या त्या भारतीय संगीताच्याच असणार. म्हणजे पेंग्विन्सना भारतीय संगीत प्रिय असे समजायला हरकत नाही. आज जगभर सर्व प्रकारच्या संगीताचा प्रभाव पडत असून पाश्चात्त्य देशात शेतीची कामे करताना तसेच बागबगींच्यात रेडिओ संगीत किंवा रेकॉर्डस् वाजविल्या जातात. इतकेच नव्हे तर जर्मनीसारख्या प्रगत देशात हॉस्पिटलमध्ये पोटाचे वा हृदयाचे ऑपरेशन करतानासुद्धा अगदी सॉफ्ट क्लासिकल म्युझिक चालू ठेवल्याचे पूर्वीच प्रसिद्ध झाले आहे. बनारसच्या एका प्रोफेसरने लिहिलेल्या हिंदी पुस्तकात सतार व सारंगी वा तंतूवाद्यावर दरबारी कानडा रात्री झोपण्याआधी १५ मिनिट हृदयविकार असणाऱ्या रुग्णांनी ऐकला तर त्याचा चांगला परिणाम दिसून येत असल्याचा आवर्जून उल्लेख केला आहे. याचा आधार घेऊन मी प्रमुख हॉस्पिटलसच्या हृदयरोगतज्ज्ञांना विचारले असता ''विज्ञानाच्या आधारे सिद्ध झाल्यावरच त्याचे प्रयोग रुग्णांवर करता येतील'', असे उत्तर मिळाले. म्हणजे पाश्चात्त्य देशात शोध लागल्यावर मग तो इकडे येणार आणि आम्ही त्याला मान्यता देणार असा सूर असावा.

फार थोड्या प्राण्यांना व पक्ष्यांना संगीत आवड असल्याचे दिसून येते. पण त्यावर कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्न उरतोच. व्यवहारात प्रत्येक गोष्टीला विज्ञानाची कसोटी लावण्याची आवश्यकता असतेच असे नाही. सुमारे ६० वर्षांपूर्वी मराठवाड्यातील हिंगोली गावात कै. डोईफोडे यांनी चित्ता, वानर, हरीण, मोर इ. प्राणी केवळ हौसेखातर बाळगले गेले. माझ्या तिथल्या मुक्कामात मी तंबोरा किंवा पेटीवर रियाज करताना चित्ता अस्वस्थ होऊन पिंजऱ्यात मान खाली करीत इकडून तिकडे फेऱ्या मारी आणि रियाज केला की तो सुस्त आडवा पडायचा. यावरून तो संगीताचा औरंगजेब असावा असा निष्कर्ष काढला. मोर तर ढगाळ हवामान व पाऊस असला म्हणजे नाचून, ओरडून आपला आनंद व्यक्त करतो. एकदा कोकीळ



पकडून एका खोलीत खाण्याची व्यवस्था करून ठेवली आणि मी टेपरेकॉर्डर घेऊन तिचा 'कुहू कुहू' आवाज टेप करण्याचा प्रयत्न केला. पण झालेल्या कोंडमाऱ्यामुळे आवाजच बंद पडला. मात्र मोकळ्या हवेत उंच झाडावर स्वैरसंचार करताना किती गोड गाते व शांत वातावरणात टेपवर तिचा आवाज सहज टिपला जातो. दुसरे एक उदाहरण म्हणजे विदर्भातील खामगांव येथील संत पाचलेगांवकर महाराजांच्या आश्रमातील शंकराच्या देवळात संध्याकाळी आरतीच्या वेळी रोज एक काळे कुत्रे येत असे. शंख, घंटा नादात सामूहिक आरती सुरू झाली की संपेपर्यंत एका ठिकाणी उभे राहून मूर्तीकडे तोंड करून भुंकत असे. तेही एक सुरात. मरेपर्यंत वर्षभर त्याचा हा नियम पाहून गावात कुतूहलाचा विषय झाला होता. आणि त्या कुत्र्याला पाहायला लोक मुद्दाम येत. आज असे घडले असते तर त्या बिचाऱ्या कुत्र्याला पिसाळलेला ठरवले असते किंवा भक्तांना तरी पिसाळलेल्यांत जमा केलं असते.

पूर्वी कोंबडा पहाटे आरवला की उजाडले असं समजतं. परंतु कोंबडा व कावळा हे पक्षी असे आहेत की, त्यांना ओरडायला काळ, वेळ काही लागत नाही. कावळे, कबुतरे, घारी, बगळे वगैरे पक्ष्यांमध्ये संघटना जबरदस्त असते. हल्ला करतील तर जोरात ओरडून गटागटाने किंवा थव्याथव्याने, गुपचूप बसतील तरी सर्वजण मिळून एकाच वेळी. याचे दृश्य हिचकॉकच्या 'दि बर्डस्' या बोलपटात पाहायला मिळते. 'टारझन', 'बोट ऑफ द होल्गा', 'ईस्ट ऑफ बोनिंओ' इ. जुन्या बोलपटातील पशु, पक्षी, कीटक यांच्या नैसर्गिक आवाजाचे मुद्रण मोठ्या कुशलतेने केल्याचे दिसून येते.

आवाजाच्या या दुनियेत आज अनुभवाच्या आधारे संशोधन, चिकित्सा, सत्य, तर्क, आदी साधनांचा उपयोग करून निर्णय घेणेच योग्य ठरते. निसर्ग व मानव यांची तर फारकत झाली आहेच. पण विज्ञानाची धुंदी चढू न देता, निसर्गातील सौंदर्य, बर्फाळ प्रदेशातील सौंदर्य, रानावनातील झाडे, झुडपे, वनश्रींना, पशुपक्षी यांचे जीवन, त्यांची निगा यांचे संशोधन करून निष्कर्ष काढणे अवश्य आहे. अवघड काम झुऑलॉजिकल सर्व्हेने अंटार्टिकाच्या बर्फाळ प्रदेशात जाऊन केलं आणि 'पेंग्विन्स'ला संगीताची आवड असल्याचा मनोरंजक शोध लावला. हे अत्यंत कौतुकास्पद आहे. कोणी सांगावे उद्या पं. भीमसेन जोशींसारखे कलावंत अशा बर्फाळ प्रदेशात जाऊन 'पेंग्विन्स'च्या रसिकतेची दाद घेऊन येणार नाहीत? तात्पर्य, आवाजाच्या या दुनियेत मानवापासून ते पशुपक्ष्यांपर्यंत पृथ्वीवरच्या रंगभूमीवर सारेच कलावंत आणि 'पेंग्विन्स'सारखे चोखंदळ रसिक आढळून येतात हे विशेष.

परिशिष्ट - ३

# नामवंतांचे शुभ संदेश

## 'स्वातंत्र्य लढ्यातील ध्येयासक्त कलावंत'

### ग. प्र. प्रधान, पुणे.

श्री. वि. दे. अंभईकर यांची मला आठवण मुख्यत: आहे ती त्यांच्या 'वन्देमातरम्' या राष्ट्रगीताला त्यांनी दिलेल्या चालीमुळे. मिश्र खंबावती रागातील त्यांनी गायलेल्या 'वन्देमातरम्' मुळे हजारो श्रोते मंत्रमुग्ध होत. आम्हा जुन्या स्वातंत्र्य सैनिकांना 'वन्देमातरम्'ने स्फूर्ती दिली. 'वेदमंत्राहूनी आम्हा वंद्य वन्दे मातरम्' ही आमची त्यावेळी मन:स्थिती होती. श्री. अंभईकर हे 'चले जाव' चळवळीतील एक चैतन्यदायी कार्यकर्ते होतं. स्वातंत्र्य चळवळीत प्रभात फेऱ्यांमधून अंभईकर गीते म्हणत मुंबईस जात असत. त्यांच्या समरगीतांनी अबालवृद्ध प्रभावित होत. 'चले जाव' चळवळीत 'गुप्त पत्रके' (बुलेटिन्स) विभागात ते काम करीत. महात्मा गांधी, डॉ. राजेन्द्रप्रसाद आणि डॉ. आंबेडकर या महान नेत्यांनी 'वन्दे मातरम्'बद्दल अंभईकरांना गौरविले होतं.

श्री. अंभईकर हे हिंदुस्तानी संगीत क्षेत्रातील एक अधिकारी. पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. भातखंडे यांच्यासारख्या थोर संगीतकारांनी अंभईकर यांचा गौरव केला. स्वातंत्र्य संग्रामात सायमन कमिशन विरोधी आंदोलनापासून 'चले जाव' क्रांतीयुद्धापर्यंत सतत सहभाग घेणारे आणि त्याच वेळी संगीताची आयुष्यभर उपासना करणारे श्री. अंभईकर यांच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आणि परम स्नेहभावना आहे. साधे, निष्कपट आणि ध्येयवादी वृत्तीचे अंभईकर व्यावहारिक यशासाठी कधी धडपडले नाहीत. देशभक्ती आणि कलाप्रेम यामुळे त्यांचं जीवन सफल झाले. त्यांचं आत्मकथन तरुणपिढीस आवडेल, मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास आहे.

माझ्या या ज्येष्ठ संग्रामसाथीच्या सहवासातील निर्मळ आनंदाचे क्षण मी विसरू शकणार नाही. श्री. अंभईकर यांना प्रदीर्घ आयुष्य व आरोग्य लाभो आणि उर्वरित आयुष्यातील त्यांचं संकल्प पूर्ण होवोत हीच शुभेच्छा!

* * *



## समर्पित वृत्तीचे अंभईकर

### प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, मुंबई

माझ्या आठवणीप्रमाणे श्री. वि. दे. अंभईकरांशी माझा प्रथम परिचय झाला तो सुमारे ५४ वर्षांपूर्वी. मी त्यावेळी शिकवित होतो त्या इस्माईल युसूफ कॉलेजातील मराठी वाङ्मय मंडळाच्या संमेलनात त्यांनी गायनाचा छोटासा कार्यक्रम केला. परिचय पुढे वाढत गेला. त्यांचं अंगभूत सौजन्य व शालीनता यांची अधिकाधिक साक्ष पटत गेली. कलावंत म्हणजे आत्मप्रतिष्ठ अगदी गर्विष्ठ – इतर कलावंतांविषयी तुच्छताबुद्धि असलेला, एककल्ली, विक्षिप्त या संगीत व्यवसायातील माणसाविषयीच्या लोकप्रिय प्रतिमेला श्री. अंभईकर अपवादासारखे निघाले. ते कलावंत म्हणून निष्ठेने परिश्रम करणारे होतंच. पण माणूस म्हणूनही आपल्या निष्ठांना जपणारे होतं. यातील काही निष्ठा राजकीय स्वरूपाच्या होत्या. पण त्यांची बाधा बोलण्या-वागण्यातील आपुलकीला त्यांनी कधी होऊ दिली नाही. माझ्यावर त्यांनी इतका दीर्घकाळ लोभ ठेवला आणि तोही अलीकडे भेटी क्वचित होत असता– तो तसा अकारण. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संगीतकलेची जन्मभर समर्पित वृत्तीने सेवा केलेल्या अंभईकरांनी त्या कलेच्या आणि व्यवसायाच्या परिसरातील पुष्कळ पाहिले. भोगले असणार. त्यांचं हे अनुभव केवळ त्या क्षेत्राशी दुरून जवळून संबंध असणाऱ्यांनाच नव्हे तर अन्य वाचकांनाही रंजक वाटतील आणि अशा वृत्तीच्या व्यक्तीचे अनुभव म्हणून त्या रंजकतेला बोधाचीही किनार असणार, असा मला विश्वास आहे.

श्री. अंभईकरांच्या या पुस्तकाचे वाचकांकडून मन:पूर्वक स्वागत होईल आणि ते चिरकाल होत राहील, अशी मला आशा आहे.

* * *

## कलोपासक देशसेवक

### प्रकाश मोहाडीकर, मुंबई

श्री. विनायकराव अंभईकर यांचा आणि माझा प्रदीर्घ काळापासून चिरपरिचय आहे. त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या सत्कार्याबद्दल माझ्या मनात अतीव आदर आहे.

निष्कलंक चारित्र्य, ज्वलंत राष्ट्रप्रेम व अविरत कार्य करण्याची धडपड यामुळे भारतभर त्यांचा फार मोठा सुहृद वर्ग आहे.

बालवयातच सुरेल आवाजाची दैवी देणगी त्यांना लाभली व 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रगीत ज्या विशिष्ट रागदारीत त्यांनी गाऊन दाखविले. त्यामुळे महात्मा गांधींपासून अनेक राष्ट्रभक्तांनी मुक्तकंठाने त्यांची प्रशंसा केली.

१९३० ते १९४२ च्या चळवळीत व त्यानंतरच्या प्रत्येक राष्ट्रकार्यात भूमिगत राहून बुलेटिन्स वाटणे, विलायती कपड्यांची होळी, प्रभात फेऱ्या आदी कार्यात त्यांनी निष्ठेने भाग घेतला आहे.

त्यांची ही धडपड वयाची ८३ वी ओलांडली असताही चालू आहे ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यांनी आपले अनुभव स्मृतीरूपाने नव्या पिढीसमोर मांडले त्या संगीत स्वररूपी मोत्यांचं वाचक स्वागत करतील अशी मी आशा करतो व त्यांना सुयश चिंतितो.

* * *

## गायक अंभईकरांना शुभेच्छा

### अच्युत महाराज, अमरावती

श्रद्धेय वयोवृद्ध गायक, संगीतकार व स्वातंत्र्यसैनिक श्रीमान विनायकराव अंभईकर सहपरिवार ॐ नमस्ते । त्या ता. १९.६.९४ च्या दादर-मुंबईच्या पत्राने मुक्तेश्वर आश्रम-खामगांव व संत श्री पाचलेगांवकर महाराजांचा मला घडलेला चिरस्मरणीय संत समागम आठवला । खूप आनंद वाटला । त्या स्वर्ग सुखातील आनंदात विशेष भर घालणाऱ्या गायक अंभईकरांचे गोड स्वर, अर्थ गांभीर्य व सद्भावनांचे उधळण अजून आठवते । आता मुक्तेश्वर आश्रमात पाऊल ठेवले की, क्रांतिवीर श्री संत पाचलेगांवकर बाबांची आठवण येते व त्यांच्या जीवन महोत्सवात संगीताचा ब्रह्मरंग भरणारे त्यांचं आवडते गायक विनायकराव अंभईकर यांचीसुद्धा आठवण येते । विनायकराव ! अजून सुदृढ दीर्घायुषी व्हा आणि आपल्या गोड गळ्याने देवाला आळवीत सुखाने रहा, ही माझी आपणांकरिता शुभेच्छा आहे.

* * *



## पुरस्कार

### मा. गो. वैद्य, नागपूर

माझे ज्येष्ठ मित्र श्री. विनायकराव अंभईकर हे आपले आत्मचरित्र लिहीत आहेत ही फार चांगली गोष्ट आहे. राजकारणी व्यक्ती, प्रसिद्धीच्या लाटांवर आरूढ झालेले नट आणि नट्या किंवा मोठे साहित्यिक यांनीच आपली आत्मचरित्रे लिहावीत असे नाही. सामान्य माणसांच्या जीवनालाही काही असामान्य पदर असतातच आणि ते सर्वांपुढे येणे आवश्यक आहे, ते प्रेरक आणि उद्बोधकही असतात.

विनायकराव अंभईकरांच्या जीवनात असा एक असामान्य धागा आहे. रेशमाच्या काही धाग्यांनी वस्त्र, 'गर्भ रेशमी' बनून जाते. विनायकरावांच्या जीवनातील या धाग्याने त्यांच्या जीवनाचे वस्त्रही मौल्यवान झाले आहे. तो धागा आहे 'वन्देमातरम्' या गीताचा. गीताची रचना करणारा कवी हा प्रतिभासंपन्न असतोच. परंतु या प्रतिभासंपन्नतेला सर्वसामान्यांमध्ये प्रतिष्ठित आणि लोकप्रिय करण्याचे कार्य त्या गीताच्या गायकांकडून होत असते. ग. दि. माडगूळकरांनी रामायणातील घटनांवर आणि व्यक्तींवर गीते लिहिली. ती काव्यदृष्ट्या नक्कीच सरस आहेत. परंतु सुधीर फडक्यांचा आवाज त्या गीतांना लाभला नसता तर सारे गीतरामायण एका पुस्तकात बंदिस्त होऊन राहिले असते.

'वन्दे मातरम्' गीत खरोखरच उत्कृष्ट आहे. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या प्रतिभेपुढे खरेच कुणीही नतमस्तक व्हावे. पण स्वातंत्र्याच्या चळवळीत अग्रेसर असलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ते गायिले गेले नसते आणि त्या गायनामुळे ते गीत स्वातंत्र्यभावनेचा एक उत्कृष्ट आविष्कार म्हणून जनमानसावर अंकित झाले नसते, तर ते गीत बंकिमचंद्रांच्या कादंबरीतच बंदिस्त राहिले असते. 'वन्देमातरम्'च्या जयघोषाने, त्याकाळी स्वातंत्र्येच्छु तरुणांच्या मनात देशभक्तीची जी उत्कट भावना निर्माण केली, इंग्रज शासकांसमोर 'वन्देमातरम्'चा जयघोष करून त्यांना आपल्या स्वाभिमानाचा जो परिचय तरुण विद्यार्थ्यांनी त्याकाळी करून दिला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'वन्देमातरम्'चा जयजयकार करीत ज्यांनी आनंदाने फासाचा दोर आपल्या मानेभोवती अडकवून घेतला ती उत्कटता, तो स्वाभिमान आणि आत्मबलिदानातील तो आनंद या सर्वांचे मूळ असे ते भावसांद्र गीत आहे तसेच त्या गीताचे धीरगंभीर गायकही आहेत.

पं. विष्णू दिगंबर पलुस्करांनी सार्वजनिक समारंभामध्ये ते गीत गाण्याची प्रथा पाडली. काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी ते गीत गायिले. काँग्रेसच्या अधिवेशनात एका मौलवी अध्यक्षाने त्या गीताला विरोध केला तरी पं. पलुस्कर दबले नाहीत. अध्यक्ष खुर्ची सोडून गेले. पलुस्कर संपूर्ण गीत गाऊनच थांबले. विनायकराव अंभईकर पं. पलुस्करांच्याच गोत्राचे आहेत. मधूर आवाज, शास्त्रीय संगीताची त्याला बैठक, अंत:करणात देशभक्तीचे उत्फुल्ल भाव, या सर्वांचे एक सुंदर रसायन होऊन 'वन्देमातरम्' गीत अंभईकरांच्या गळ्यातून बाहेर पडे. आणि ते सर्व श्रोतृसमुदायाला पुलकित करून जाई. पलुस्करांच्या 'काफी' रागातील 'वन्देमातरम्' अधिक प्रभावी की अंभईकरांच्या 'मिश्र खंबावती'रागातील अधिक प्रभावी हा चर्चेचा मुद्दा झाला. परंतु अंभईकरांच्या 'वन्देमातरम्' गाण्याने थोर थोर पुढारीही अभिमंत्रित झाले होतं, ही सर्वमान्य गोष्ट आहे. तो सारा तपशील विनायकरावांच्या आत्मचरित्रात आपणास वाचायला मिळेल.

महात्मा गांधींनी ते प्रथम १९२६ साली ऐकले. नंतर १९३५ साली शेठ जमनालाल बजाज यांनी पुन्हा महात्माजींसाठी वर्धेला तोच कार्यक्रम घडवून आणला. सरदार पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, सरहद्द गांधी, काकासाहेब गाडगीळ, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावकर या सर्वांनी अंभईकरांच्या गायनाची प्रशंसा केली आहे. हरीपुरा आणि त्रिपुरी येथील काँग्रेसच्या महाधिवेशनात विनायकरावांनी या गीताचे गायन करून लक्षावधी श्रोत्यांची वाहवा मिळविली होती. परंतु आपल्या स्वत:च्या प्रशंसेसाठी विनायकराव 'वन्देमारतम्' चा हा गानयज्ञ करीत नव्हते. स्वतंत्र भारताचे ते राष्ट्रगीत व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. त्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केलं. सामूहिकरित्या ते गायिले जाऊ शकते हे पटविण्यासाठी त्यांनी एक कोरस पार्टीही तयार केली. ते गीत ऑर्केस्ट्रावर बसवून दाखविले. सामूहिक गायनाचे अनेक प्रयोग प्रस्तुत केलं. काकासाहेब गाडगीळांनी मुद्दाम बोलावून घटना समितीच्या सदस्यांबरोबर अंभईकरांकडून वन्देमातरम् गाऊन घेतले. डॉ. आंबेडकरांनीही त्यांना शाबासकी दिली. परंतु अंभईकरांचे हे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. महात्माजींपासून तो लहानथोर सर्व कॉंग्रेसजनांनी अंभईकरांची स्तुती केली. पण त्यांच्या जीवाचे जे मर्म होतं 'वन्देमातरम्' गीत मात्र राष्ट्रगीत म्हणून मान्य झाले नाही. ते निराशेने म्हणाले, 'माझ्या सर्व प्रयत्नांची अशी सांगता झाली.'

'वन्देमातरम्' संबंधीचा काँग्रेसजनांचा दु:स्वास आकस्मिक नाही. घसरण पूर्वीच सुरू झाली होती. श्री. अंभईकरांनी बिलासपूरच्या गणेशोत्सवाची हकीकत सांगितली



आहे. त्या कार्यक्रमाला ठाकूर छेदीलाल, पं. रविशंकर शुक्ल आदी काँग्रेसची नामवंत मंडळी उपस्थित होतीच. 'वन्दे मातरम्'चे गायन सुरू झाले, तेव्हा इतर श्रोत्यांप्रमाणे ही मंडळीही उभी राहिली. परंतु पहिले चरण संपताच ती बसली. त्यांचं पाय दुखले होतं, म्हणून हे लोक बसले नाहीत. 'त्वंहि दुर्गा दशप्रहरण धारिणी'च्या धाकाने ते बसले. खुशामतीचे ते पर्व होतं. खुशामतीने राष्ट्रभक्ती जागृत होतं या खुळेपणाचे वातावरण होतं. आणि त्या वातावरणाच्या प्रभावाखाली ही थोर थोर मंडळी होती. ती सन्मानाने आणि स्वाभिमानाने उभी राहिली नाही. धाकाने बसून गेली. इतर सर्वजण मात्र शेवटपर्यंत उभे होते.

सुदैवाने 'वन्देमातरम्'चा वनवास येथे संपला नाही. इंग्रजांच्या राजवटीत 'वन्देमातरम्' म्हणणे हा राजकीय अपराध होता. काँग्रेसच्या आणि तथाकथित सेक्युलॅरिस्टांच्या 'स्वतंत्र' राजवटीत ते सांप्रदायिक दूषण झाले आहे. बंकिमचंद्रांचा आत्मा आपल्या देशबांधवांच्या करंटेपणाला काय म्हणत असेल याची कल्पनाच केलंली बरी. अर्थात 'वन्देमातरम्' हे अंभईकरांच्या जीवनातील एक प्रकरण आहे. हे महत्त्वाचे आहे. त्यांच्या मर्मबंधातले आहे हे खरेच आहे. पण त्यांच्या एकूणच संगीत साधनेचा वृत्तांत या पुस्तकात आहे. त्यांचं हे आत्मनिवेदन सर्वांना आवडेल असा मला भरवसा वाटतो.

* * *

## माझ्या परमस्नेह्याचे कौतुक

### डॉ. वि. भि. कोलते नागपूर

सुप्रसिद्ध संगीत गायक श्री. विनायकराव अंभईकर यांच्याशी माझे फार जुने स्नेहसंबंध आहेत. आम्ही परमस्नेही आहोत. त्यांच्याशी माझा संबंध आला तो संत पाचलेगांवकर महाराज यांच्या सान्निध्यात. महाराज त्यावेळी नागपूरला आले होते. मी मॉरीस कॉलेजमध्ये शिकत होतो. आम्ही दोघेही महाराजांच्या दर्शनाला येत असू. विनायकराव चांगले गायक असल्याचे माहीत झाल्यावर महाराज त्यांना अनेकदा गायला सांगत असत. विनायकरावही आपल्या मधुर गायनाने बैठक रंगवून सोडीत. आमचे दुसरे एक विद्यार्थी मित्र श्री. कृष्णराव देशपांडे हेही त्यावेळी माझ्याबरोबरच मॉरीस कॉलेजात शिकत. ते महाराजांचे दूरचे नातेवाईक आणि परम शिष्य. त्यांच्यावर महाराजांचे प्रेमही फार. मला आठवते त्यांच्या नावातील 'कृष्ण' ज्यात आला आहे, असे

खाडिलकरांच्या 'स्वयंवर' नाटकातील 'नरवर कृष्णासमान' हे पद विनायकराव सुंदर गात असत. कृष्णराव देशपांडे यांच्यावरील प्रेमामुळे व विशेषत: त्यांच्या नावातील 'कृष्ण' त्या पदात प्रामुख्याने आल्यामुळे महाराज विनायकरावांना ते पद गायला वारंवार सांगत आणि विनायकरावही ते आपल्या मधुर आवाजात प्रत्यक्ष बालगंधर्वांचा साक्षात्कार होईल अशा तन्मयतेने गात की सर्वांची तबियेत खूष होऊन जाई. विनायकरावांच्या गायनाची गोडी मला तेव्हापासून लागली. मी त्यांच्याकडे आकृष्ट झालो. इतका की आम्ही परस्परांचे दृढ स्नेही बनलो!

या आमच्या परस्पर स्नेहबंधामुळे त्यावेळी मॉरीस कॉलेजमधील 'शारदा मंडळात' विनायकरावांची एक संगीत मैफल मी आयोजित केली होती. रसिक श्रोत्यांची तुडुंब गर्दी होती. मैफल अतिशय रंगली. निरनिराळ्या रागातील पदे आपल्या मधुर आवाजात गाऊन विनायकरावांनी सर्वांना मुग्ध करून टाकले होतं. माझ्या आग्रहावरून 'नरवर कृष्णासमान' हे पदही त्यांनी रंगवून साभिनय म्हटले. त्यांनी गायलेल्या त्या पदाचे मधुर स्वर अजूनही माझ्या कानात घुमत आहेत!

आपापल्या व्यवसायांच्या निमित्ताने आम्ही पांगलो तरी अंत:करणातील स्नेहबंधांना बाधा आली नाही. १९३६ मध्ये उषाताई (पूर्वाश्रमीच्या कु. शांता तरवडकर) आणि मी विवाहबद्ध झालो. माझ्या आठवणीप्रमाणे त्याच वर्षी मामा वरेरकर यांच्या शिफारसीवरून उषाताईंच्या आवाजात माझ्या दोन कविता 'हिज मास्टर्स व्हॉईस' कंपनीने ध्वनिमुद्रित करण्याचे ठरविले. त्या कवितांना योग्य चाली विनायकरावांनी दिल्या. इतकेच नाही तर त्या चालीवर त्या दोन्ही कविता त्यांनी उषाताईंकडून बसवून घेतल्या. त्यांच्याकडून तालमी घेण्यासाठी मी उषाताईंना घेऊन त्यांच्याकडे जात असे. उषाताईंच्याकडून चाली बसवून घेताना विनायकराव किती परिश्रम घेत असत हे मी स्वत: पाहिले आहे. आमच्यावरील स्नेहाचेच ते प्रतिबिंब होतं. त्यावेळची एक गंमत. त्यावेळी विनायकराव मुंबई येथील गिरगावातील 'माधवाश्रमा'त उतरले होतं. तालमी घेण्यासाठी आम्ही तेथे त्यांच्याकडे जात असू. एके दिवशी त्यांनी आम्हाला भोजनास बोलावले. मी व उषाताई नुकतेच विवाहबद्ध झालो होतो. भोजन करीत असताना आम्ही दोघेही हसतमुखाने एकमेकांच्या तोंडात घास घालीत होतो. त्यावेळी विनायकराव कसे मिष्किलपणे आमच्याकडे पाहात होतं. ते दृश्य मी कधीही विसरणार नाही. या संगीत गायकाच्या रसिकतेचाच मिष्किलपणा नव्हता काय तो?

उषाताईंनी गायलेल्या माझ्या दोन कवितांना विनायकरावांनी सुंदर चाली दिल्या हे तर खरेच. पण पुढे आपल्या गाण्यांच्या मैफलीत ते स्वत: त्या कविता गाऊ लागले. हे



जेव्हा मी ऐकत असे त्यावेळी मला किती आनंद होत असेल हे काय सांगायला पाहिजे? आणि पुढे काही दिवसांनी तर 'गालबोट' (माझ्या छकुलीचे डोळे) आणि 'अंगाई' (काय झालं सोनुलीला) या माझ्या दोन कविता गाऊन त्यांनी त्या ध्वनिमुद्रितही करून घेतल्या. त्या ध्वनिमुद्रिका मी किती प्रेमाने सांभाळून ठेवल्या होत्या. पण.... एके दिवशी माझ्या धंतोलीवरील घरात चोरी झाली. त्यावेळी त्या चोरट्याने घरातील इतर सामानाबरोबर ग्रामोफोन व ध्वनिमुद्रिकांची पेटीही पळवली. मोठा रसिक चोर असला पाहिजे तो! मी विद्यार्थी असताना मॉरीस कॉलेजमधील 'शारदा मंडळात' जशी विनायकरावांच्या गाण्याची बैठक केली होती तशीच अमरावती येथे मी प्राध्यापक झाल्यावर तेथील किंग एडवर्ड कॉलेजमधील संगीत मंडळातही आयोजित केली होती. या बैठकीची अनेक कारणांनी मला चांगली आठवण आहे. त्या बैठकीत माझ्या आग्रहावरून 'वन्देमातरम्' हे राष्ट्रगीत त्यांनी अनेक रागात गाऊन दाखवले. वस्तुत: या राष्ट्रगीताला त्यांनी स्वत: नवीन चाल दिली होती. पण त्या चालीत ते गाण्यापूर्वी त्यांनी ते अनेक रागात गाऊन दाखविले. प्रथम सुरुवात केली ती 'केदार' रागात. मला ती फारशी पसंत पडली नाही. मग त्यांनी तेच गीत 'सारंग', 'भूप', 'काफी' इ. रागात गाऊन दाखविले. आणि शेवटी माझे मनोगत व उत्सुकता जाणून त्यांनी स्वत: रचलेल्या स्वतंत्र 'मिश्र खंबावती' रागात ते गाऊन दाखविले. तेव्हा मन तृप्त झाले. सर्व श्रोत्यांच्या चेहऱ्यावर देखील त्या चालीच्या पसंतीचा आनंद झळकत होता.

त्या दिवशी विनायकरावांनी निरनिराळ्या रागांत राष्ट्रगीत जरी गाऊन दाखविले असले तरी बैठकीचा शेवट नेहमी 'भैरवी' ने करायचा असतो हा अलिखित संकेत लक्षात घेऊनच की काय विनायकरावांनी शेवटी 'नृपकन्या तव जाया' हे खाडिलकरांच्या 'स्वयंवर' मधील पद भैरवीत सुरू केलं. त्या दिवशी त्यांनी गायिलेली भैरवी इतकी रंगली की तिने बहार उडवून दिला. मला तरी १९२० मध्ये मुंबई येथील एल्फिस्टन नाट्यगृहात 'स्वयंवर' नाटक पाहताना रुक्मिणीच्या रूपाने 'नृपकन्या तव जाया' ही भैरवी तन्मयतेने गात असलेल्या बालगंधर्वांची त्यावेळी एकसारखी आठवण होत होती. 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रगीत व 'नृपकन्या तव जाया' ही भैरवी या दोन्ही गीतांच्या गायनाने किंग एडवर्ड कॉलेजातील त्या बैठकीत विनायकरावांनी असा काही रंग भरला की तिचे विस्मरण होणे शक्य नाही!

विनायकरावांच्या अनेक बैठकी ऐकण्याचे भाग्य मला लाभले आहे. ते चांगले संगीततज्ज्ञ आहेत. पट्टीचे गायक आहेत. सर्वच राग जरी ते गात असले तरी हिंडोल, बागेश्री, दरबारी कानडा व हंसध्वनी हे राग त्यांना विशेष प्रिय असल्याचे माझ्या लक्षात

आलंआहे. आपल्या मधुर गायकीने 'संगीत सुधाकर' ही पदवी त्यांनी प्राप्त करून घेतली आहे. जे. कृष्णमूर्ती यांनी तर 'राष्ट्रीय गायक' म्हणून त्यांना संबोधले आहे. इतर अनेक सन्मानांचे ते मानकरी झाले आहेत. यावर्षी आपल्या आठवणींचा 'स्मृतिग्रंथ' ते प्रकाशित करीत आहेत. त्यासाठी या काही आठवणी. यापेक्षा या माझ्या परम स्नेह्याचे कौतुक मी आणखी कोणत्या निराळ्या प्रकारे करणार?

* * *

## आठवणींचा बहुमोल ठेवा

### डॉ. सौ. शकुंतला खोत, नागपूर

वयोवृद्ध अनुभवतपस्वी श्री. विनायक अंभईकर यांनी हा ग्रंथ लिहून भावी पिढीच्या हातात त्यांना बहुतांशी अज्ञात असलेला गुप्त खजिनाच दिला आहे.

आठवणींच्या साठवणींची ही गुप्त खनिज्याची विहीर खूप खोलखोल आहे. आणि ती कितीही खोलवर उपसली तरी संपणार नाही. आटणार नाही, अशी पसरली आहे. शंभर-दीडशे वर्षांचा हा आठवणींचा, मानसन्मानांचा, सुखदु:खांचा, अनुभवांचा, मजबूत तरीही खोल गेलेला हा तळ आहे. आजच्या वाचकांसमोर हे अनेकाविध अनुभव मांडून श्री. अंभईकर यांनी उपकारच केलं आहेत.

याचे कारण या अनुभवातून त्यांनी उल्लेख केलंल्या महान व्यक्ती यांनी आज भारतात, भारताबाहेर व मुख्य म्हणजे महाराष्ट्राच्या जनमानसात मानाचे कुतुहलाचे व आदराचे स्थान मिळवलेले आहे. अशा विविध स्तरातील राजकारणी, साहित्यिक, कलाकार, संतमहात्म्ये व मान्यवर, लोकमान्य, पूजनीय, वंदनीय व्यक्तींचा श्री. अंभईकरांना सहवास घडला. हे त्यांचं व त्या सहवासांचे प्रत्ययकारी दर्शन त्यांनी लेखनातून वाचकांना घडवल्याने वाचकांचेही सद्भाग्यच आहे. श्री. अंभईकर हे महाराष्ट्राचा चालता बोलता सांस्कृतिक, राजकीय इतिहासच आहे.

श्री. विनायकराव अंभईकर यांची व माझी ओळख मुंबई दूरदर्शनवर मी त्यांची मुलाखत घेतली त्यावेळी प्रथम झाली. मुलाखतीच्या निमित्ताने आपण किती महान व अनुभवी व्यक्तीशी बोलतो आहोत याचे मला दर्शन घडले. या सर्व आठवणी, त्यांना आलेले महान व्यक्तींचे अनुभव त्यांनी पुस्तक रूपाने सविस्तर लिहावे व पुढच्या नव्या पिढीला ते ज्ञान व्हावे, त्यातून काही उद्बोधन व मनोरंजनही घडावे असे फार वाटत राहिले. शेवटी तो योगही आला. व आज पुस्तकाच्या रूपात हे अनुभव आपल्या



विविध रंगाने वाचकांपर्यंत पोचविण्याचे भाग्य व श्रेय लेखक श्री. अंभईकर यांना आहे, ही फार चांगली गोष्ट झाली. महाराष्ट्राचा किंबहुना राष्ट्राचाच सर्वांगीण इतिहास अशा ललितरम्य आठवणींच्या रूपाने त्यांनी ज्ञात केला. तो खचितच भावी पिढीलाही आनंद देणारा, मार्गदर्शन करणारा, उद्बोधक ठरणारा आहे, हे निश्चितच. श्री. अंभईकर यांनी हे फार मोठे महत्त्वाचे कार्य केलं हे निर्विवाद. व्यक्तिश: व वाचक म्हणूनही व लेखिका, कलावंत, साहित्यिक म्हणूनही मी त्यांची याबद्दल आभारी आहेच व त्यांचं हातून अशीच दीर्घकाळ सेवा समाजाप्रत घडावी अशी सदिच्छा या निमित्ताने व्यक्त करते.

* * *

## राष्ट्रीय गायक संगीत सुधाकर अंभईकर

### रामकृष्ण बाक्रे, मुंबई

कीर्तनकार राष्ट्रीय कीर्तनकार अनेक झाले. पण गायकांत राष्ट्रीय गायक झाल्याचा उल्लेख - साभिप्राय उल्लेख आजवर झाल्याचे दिसत नाही. ज्यांचं गाणं गांधीजी, डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर, तात्यासाहेब केळकर, काकासाहेब गाडगीळ यांसारख्या भारतीय स्तरावरील नेत्यांनी आवर्जून ऐकले ते पं. विनायकराव अंभईकरही राष्ट्रीय गायक होत. नेत्यांनी गाणं ऐकलं म्हणून गायक कलाकार राष्ट्रीय गायक म्हणविला जाईलच असं नाही. पण पं. अंभईकर यांनी 'वन्देमातरम्' राष्ट्रगीताला चाल लावण्यासाठी व ती चाल राष्ट्रमान्य व्हावी म्हणून अखिल भारतीय स्तरावर जे अथक परिश्रम घेतले त्यामुळे त्यांना राष्ट्रीय गायक म्हणावेच लागेल. आज त्यांचं वय ८३ वर्षांचं आहे.

सुमारे १२ वर्षांपूर्वी ते ७१ वर्षांचे असताना माझी त्यांची अकस्मात गाठ पडली. त्यावेळचा संवाद आज आठवतो. त्यावेळी ते नुकतेच खामगांवच्या मुक्तेश्वर आश्रमातून मुंबईत परतले होतं. वानप्रस्थाश्रमात असता त्यांच्या हातून राष्ट्रसंत पाचलेगांवकर महाराजांच्या आश्रमात जी सेवा घडली ती सार्थकी लागली होती. डोळ्यावर शस्त्रक्रीया करावी लागल्याने ते काळा चष्मा वापरीत होतं. याचा अर्थ डोळ्यांना काळोखी आली होती असा नव्हे. काळोख आणि एकांत हे अध्यात्माचा मार्ग दाखविण्यास उपकारक ठरत होतं.

असे हे विनायकराव अंभईकर दिलखुलास बोलणारे, अप्रिय सत्य ताडकन सांगून मोकळे होणारे. त्यांचं संगीत सृष्टीतील पराक्रमच गाजले असं नाही. पराभवही

गाजले. त्यांचा आवाज कै. लोंढे यांच्या जातकुळीचा. अत्यंत मधुर. मध्यसप्तकातच तो श्रोत्यांना बांधून ठेवतो. गौडमल्हार, सरपरदा, बिलावल, बागेश्री, हिंडोल, भीमपलास या रागातील त्यांची ही ध्वनिमुद्रिका ऐकावी. एकूण एक द्रुत बंदिशीच आहेत. गांधीजींना स्वराची दर्द होती, संगीताचा कान होता आणि त्यांच्यापुढे गाणं हा एक अनुभव असतो असं संगीतज्ज्ञ वामनराव देशपांडे यांनी नमूद करून ठेवलं आहे. संगीताने मन:शांती मिळते आणि क्रोधाला आवर घालता येतो असे गांधीजींचे मत असल्यामुळे वर्ध्याला मगनवाडीत झालेल्या विनायकरावांच्या कार्यक्रमात त्यांनी बागेश्री, काफी राग गाण्याची इच्छा प्रकट केली होती आणि बागेश्रीचा प्रभाव गांधीजींवर पडल्याचे दिसून आले.

पं. विष्णु दिगंबर पलुस्करांनी काफी रागात बसवलेले 'वन्देमातरम्' राष्ट्रगीत गांधीजींना पसंत होतं व त्यात बदल करणे त्यांना मान्य नव्हते. झिंझोटी राग बाळबोध वळणाच्या स्त्रियांनी गायचा राग. मास्तर कृष्णरावांनी वन्देमातरम् याच रागात बसविले. सोप्या चालीमुळे त्याचा बोलबाला बराच झाला. मिश्र खंबावतीतील अंभईकरांची चाल तार षड्जावरून सुरू होत असल्याने वातावरण एकदमच गंभीर आणि उत्साहवर्धक होतं. समूदायाला तालावाचूनही लयीत म्हणता येते. सोपेपणा आणि भारदस्तपणा या दोन्ही गोष्टी या चालीत चांगल्या साधल्या आहेत. १९३८-३९ सालात विनायकरावांची ही चाल देशभर गाजली. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांच्या गाण्याबद्दल प्रशंसा केली. पुण्याला काफी रागाच्या अभिमान्यांनी मास्तरांना आपल्या चालीचं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचं आव्हान दिलं होतं. मास्तर तिकडे फिरकलेही नाहीत. अंभईकर हे आपल्या आव्हानाच्या आणि सत्काराच्या जंजाळात अडकलेच नाहीत. वटवृक्षाच्या मुळाशी घाव घातला की पारंब्या आपोआप खाली येतात अशी पहिल्या बाजीरावाला शोभणारी या क्षेत्रातील पराक्रमी वृत्ती त्यांची होती. हरीपुरा व त्रिपुरी काँग्रेस त्यांनी आपल्या चालीने गाजविली. नागपूर १९३९ च्या मार्चमध्ये भरलेल्या भरत नाट्यसंमेलनात नेमलेल्या खास समितीकडून मिश्र खंबावती रागातील चालीचं सर्टिफिकेटही त्यांना मिळाले. पुणे ही तर मास्तरांच्या प्रतिष्ठेची जागा, त्यांचा बालेकिल्लाच तो. अंभईकरांनी पुण्याच्या काँग्रेसभवनात आपली चाल सरस असल्याचे मान्य करवून घेतले. श्री. त्र्यंबकराव देवगिरीकरांनी व श्री. अच्युतराव पटवर्धनांनी चालीची प्रशंसा केल्याचे सर्व वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झाले. मुंबईस बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक ब्रेलवी यांनी तर चाल पसंत असल्याचं स्वदस्तुरचे पत्रच अंभईकरांना दिले. मुंबईतील



काँग्रेसची कोणतीही सभा खंबावती रागातील वन्देमातरम्विना त्या काळात होत नव्हती. या सर्व पुढाऱ्यांत साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर यांनी ही चाल ऐकून उत्स्फूर्तपणे दाद देऊन अंभईकरांचे अभिनंदन केलं.

विनायकरावांनी याच्या पुढची मजल मारली ती आपल्या चालीची गानतपस्विनी श्रीमती मोगूबाई कुर्डीकर यांच्या आवाजात ध्वनिमुद्रिका काढण्याची. एकदा युद्ध जिंकायचं असलं म्हणजे जमिनीतून, हवेतून आणि सागरातून अशा सर्व बाजूंनी प्रतिपक्षाला जेरीस आणावं लागतं. श्रीमती मोगूबाईंच्या लोचदार आवाजात या चालीची 'वन्देमातरम्'ची ध्वनिमुद्रिका काढणं हा त्यापैकीच एक प्रकार होता. ध्वनिमुद्रिकेचं तंत्र विनायकरावांना अपरिचित नव्हते, मोगूबाईंनाही नव्हते. पण ती माऊली एवढी विद्वान, विख्यात गायिका. पण एखाद्या शिष्येप्रमाणे विनायकरावांच्या पुढ्यात या पदांची तालीम घेण्यासाठी बसली. विनायकराव ती हकीकत अगदी भारावून सांगतात.

असे मोठमोठे वृक्ष या चालीसाठी अंभईकरांना हलविले. अजून खुद्द मास्तरांशी बोलण्याचा प्रसंग आला नव्हता; पण तो लवकरच आला. आचार्य अत्र्यांच्या 'वसंत सेना' बोलपटाला मा. कृष्णरावांचे संगीत दिग्दर्शन लाभले असताना अंभईकरांना मास्तरांनी त्यांचं सहाय्यक म्हणून काम द्यावे अशी इच्छा प्रकट करताच त्यांना फार आनंद झाला. पण त्यांनी अशी अट घातली की, 'अंभईकरांनी आपल्या मिश्र खंबावती रागातल्या वन्देमातरम्चा आग्रह सोडून त्यांच्या झिंझोटीतील चालीचा प्रसार करण्याला ते कबूल असतील तर अगदी कुठही त्यांनी आपली चाल गाता उपयोगी नाही.' मास्तरांच्या ह्या उद्गारातच त्यांच्या चालीचा पराभव ठासून भरला आहे. त्यावर वेगळं भाष्य कशाला हवं?

पण हा एक खासगी पराभव होता. अंभईकरांच्या चालीचा पराभव ऐन राजधानीत झाला. त्यापूर्वी पं. नेहरूंनी नागपूरच्या एका प्रचंड सभेत हार्मोनियमवर हात आपटून ती बंद करायला लावून अंभईकरांना वन्देमातरम् गायला सांगितले. त्यावरून त्यांचा हार्मोनियम व ऑर्केस्ट्राला विरोध असल्याचे दिसून आले. पुढे १९४९ मध्ये दिल्ली येथे घटना समितीच्या सन्मान्य सभासदांना अंभईकरांनी १।।, २, २।।, ३ मिनिटांच्या वन्देमातरम्च्या स्वत: व कोरसमध्ये गायिलेल्या मुंबईहून नेलंल्या ध्वनिमुद्रिका ऐकविल्या. काकासाहेब गाडगीळ, डॉ. पट्टाभिसितारामय्या, डॉ. आंबेडकर, प्रतोद सत्यनारायणसिंह आदींना पसंत पडल्याचे दिसून आले. आचार्य कृपलानी अंभईकरांना

म्हणाले देखील की, 'तुमचा खटाटोप व्यर्थ आहे. 'जन-गण-मन' हेच पं. नेहरूंना हवं आहे.' आणि त्यांनी सातत्याने १०-१२ वर्षे केलेल्या धडपडीची इतिश्री झाली. आता लंडनच्या इंडिया हाऊसमधील ग्रंथालयात या गीताच्या स्वरलेखनाची प्रत आहे तीच त्यांची ग्रंथनिविष्ट नोंद.

अंभईकरांच्या या पराभवालाही एक मोल आहे. सर्व देशाची एकात्मता राष्ट्रगीत आणि त्याची चाल यामुळे सिद्ध होतं. एक संगीतज्ज्ञ मराठी गायक ऐन उमेदीच्या काळात जलसे व पैसा एवढंच समीकरण घेऊन न बसता असेतु हिमाचल 'वन्देमातरम्' गात फिरतो. तो फक्त काँग्रेसच्या वर्तुळातच रमत नाही. तात्यासाहेब सावरकरांची सभा असली तर तिथं जातो आणि साने गुरुजींची असली तर तिथंही जातो. या धडपडीला काही अर्थ आहे. या धडपडीची नोंद इतिहासात कुठंतरी राहायला हवी.

अंभईकरांच्या डझनभर तरी ध्वनिमुद्रिका उपलब्ध आहेत. 'रामचंद्र मनमोहन' आणि 'लावियले नंदादीपा' ही भक्तिगीते श्रीमती माणिक वर्मा यांच्या 'अमृताहुनी गोड' अशा आवाजामुळे विलक्षण लोकप्रियता संपादून आहेत. अजूनही ती ऐकली की माणिकबाईंबरोबरच श्री. अंभईकरांची मूर्ती माझ्या डोळ्यांपुढे येते. त्यांनी मुक्तेश्वर आश्रमात 'करतो चिंता विश्वाची' म्हणत अनेक वर्षे निवांतपणे व्यतीत केली ती सप्तस्वरांचीच चिंता असणार यात शंका नाही. पण या चिंतेतून लागलेला हा नंदादीप ऐकणाराला नेहीच प्रभावित करीत राहील.

* * *

# एक ऋणानुबंध

## डॉ. सौ. माधुरी मुनशी, खामगांव

जिव्हाळा नि आत्मीयतेच्या धाग्यांनी विणलेले वस्त्र कधी जीर्णशीर्ण होत नाही. श्री. तात्यासाहेब अंभईकरांशी आम्हा उभयतांचा परिचयही असाच योगायोगाने झाला. खामगांवच्या विदर्भ साहित्य संघातर्फे कै. कवि. वा. ना. देशपांडे स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात काही निवडक कवितांना चाली लावायच्या होत्या. माझा परिचय झाल्यानंतर आणि एम. ए. असून कॉलेजात प्राध्यापिका असल्याचे कळताच चाली करता काव्यनिवडीचे काम अंभईकरांनी माझ्यावरच सोपविले. यानिमित्ताने ते व त्यांच्या कुटुंबियांशी आमचा घनिष्ट परिचय झाला.



यानंतर स्थानिक टिळक स्मारक महिला मंडळातर्फे तात्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशीला भक्ति संगीताचा एक आणि रंगभूमी दिनानिमित्त नाट्यगीत गायनाचा असे आणखी दोन कार्यक्रम आम्ही सादर केलं. या विविध कार्यक्रमांमुळे तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंच्या घडलेल्या दर्शनात त्यांच्या संगीत कौशल्याबरोबरच त्यांचा वक्तशीरपणा, मराठी व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, साहित्याचा व्यासंग अप्रतिम असल्याचे दिसून आले. आम्हा नवोदित कलावंतांना कविता स्वर, ताल लयबद्ध करून न कंटाळता आनंदाने शिकविताना त्यांच्या सहनशीलतेलाही दाद द्यावीशी वाटते.

या कार्यक्रमामुळे अंभईकरांच्या कुटुंबियांशी म्हणजे अगत्यशील काकू, कन्या हिमगौरी आणि निरागसतेची प्रतिमा असलेला पुत्र गिरीश यांच्याशी परिचय झाला. तात्यासाहेब व त्यांच्या कुटुंबियांची रूबाबदार भारदस्त आणि काही वेगळीच आभा असलेली व्यक्तिमत्त्वे पाहिली की आश्रमातील अगदी एका खोलीतील त्यांच्या वास्तव्याचा मला फार आचंबा वाटे. ताठ मानेने व नि:स्पृहतेने जीवन जगण्याची त्या सर्वांची वृत्ती मन मोहवित असे. सर्वांची मने तर आभाळासारखी विशाल आणि अगत्यशील होती. एक वेगळीच खानदानी आदब रूबाबदारपणा त्यांच्या वागण्या-बोलण्यात होता.

अंभईकर मुंबई आकाशवाणीवर संगीत विभागाचे अधिकारी असल्याचे आणि महाराजांच्या प्रभावामुळे नोकरी सोडून आश्रमात आल्याचे मागाहून समजले तेव्हा केवढा मोठा कलावंत खामगांवी आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली. माझ्या आईकडून कळले की, 'वन्देमातरम्' गाणारे अंभईकर हेच ते. बंकिमचंद्रांचे उर्जस्वल काव्य आणि अंभईकर यांचे अतूट नाते होतं. तसेच वन्देमातरम् राष्ट्रगीतासाठी केलेल्या त्यागामुळे व बेचाळीसच्या चळवळीत भाग घेऊन केलेल्या देशसेवेमुळे ते स्वातंत्र्यसैनिक असल्याचे फार उशिरा समजताच मन अतीव आदराने भरून आले.

तात्यासाहेब खामगांव सोडून मुंबईला गेले पण नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देऊन त्यांचकडून गाणी गाऊन घेण्यासाठी श्रम करणारे तरुणवृद्ध अशा अंभईकरांची उणीव मात्र अद्यापही जाणवते. मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध तीन तात्यांचा फक्त साहित्यिक परिचय आहे. परमेश्वराने तात्यासाहेबांशी परिचय करवून ती उणीव अंशत: भरून काढली आहे, असेच मी मानते. त्यांच्या कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा. तात्यासाहेब, जीवेत् शरद: शतम ।

* * *

# PANDIT AMBHAIKAR.... AS I HAVE KNOWN HIM

## Mohan Nadkarni

It is because of the pressing request from Pandit Vinayakraoji that I have mustered the courage to write these few lines. The fact that this piece of writing will form part of his long awaited autobiography has made me feel proud and privileged, too. Honestly, I also realise that it poses me a challenge. the kind of challenge which has also afforded me an opportunity to mention briefly a few personal reminiscences of our association.

Even so, there was some hesitation that kept gnawing my mind; the autobiography is to be in Marathi, while Panditji kept insisting that my writing should be in English. If I do so, won't it sound like a vivadi swara in what is rightly expected to be a musical story? I asked this question myself and repeated it to Vinayakraoji. "No" - pat comes this reply from him. Speaking in his delightfully familiar, soft and sensitive voice, he told me that readers will be delighted to read my English writing and that the piece would "enrich" his own life story!

At this distance of time, I do not precisely recollect my first personal encounter with Vinayakraoji. I think it was in the late forties. The place was the music room of All India Radio which was then located at Queen's Road between the Marine Lines and Churchgate Railway Stations. I had already started my career as a freelancer writer on music. This brought me in touch with all those who were, in some way, involved in musical pursuits. In time to come, I came to be known to many musical personalities working with All India Radio who included, besides Vinayakraoji, may brilliant men like B. S. Mardhekar, A. Dinkar Rao (D. Ame'l), K. D. Dixit, Anandrao Dholekar, Ratnakant Ramnathkar and a host of others.

Strange but true, whenever Vinayakraoji and I happened to cross each other all we did was to exchange gostures of good wishes with a smile and this continued for quite sometime or did we think of introducing ourselves to each other.

Vinayakraoji then looked quite young. He was simply dressed -- clad in a dhoti, a shirt and a coat. He had his hair neatly groomed and his face looked eloquent by his bright eyes and prominent nose. Unable to contain my curiosity, I asked Dinker Rao about the identity of the gentleman who was passing by. And it was through Dinkar Rao that I learnt that he was V. D. Ambhaikar.

The name instantly rang a bell, "Oh, my goodness." I said to myself, "this is the Ambhaikar whose voice has been so familiar to me all these years through his broadcasts." I then hastened to meet him and got myself introduced to him. I remember my telling him that I was a passionate listener of music broadcasts from AIR Bombay and he was one of my favourite artistes.



Then came a time when I began missing him from the cloistered environs of AIR. All my enquiries yielded the only piece of information that V. D. Ambhaikar had left All India Radio, presumably to seek fresh fields and pastures now. And that is how I chanced to meet him in the studios of His Master Master's Voice (HMV).

This went on for several years-- till some friend know to both of us, told me that Ambhaikarji had given the go-by to his musical vocation and left Bombay to seek spiritual solace in an ashram some where in Vidharbha. In between came several opportunities of listening too some of the finest commercial discs which presented Marathi bhaktigeets and bhavgeets. These are all still broadcast from AIR Bombay.

It was then the practice of AIR's announcers to mention the names of the singers as also of the composers who set them to tune. Ambhaikarji's was the name that often came in for mention as the composer of some of the evergreen songs sung by artistes of the calibro of Manik Verma, Asha Bhosale and other leading lights. My admiration for Panditiji grew infinitely greater, because I was very keen to interview him for one of the leading English national dailies. But it was all in vain.

At least two decades must have passed by before I spotted Pandit Ambhaikar at a music concert in Bombay. Panditji could recongnise me, while I was in doubt about his identity. There was a sea change in his physical appearance and dress. Advancing age had apparently taken its toll, but he appeared to me impressive, if a little forbidding, clad in immaculate khaddar with long hair, had a streak of karma yogi on his expression. He gladly agreed to my request to interview him.

What once started as a nodding acquaintance took time to mature into lasting relationship only from 1986, and the bond has not only continued to endure but strengthen with each passing year. I was so overwhelmed by the kind of sacrifices he had made in the cause of the freedom of Mother India that I was inspired to write about him and his experiences in national newspapers and magazines like the Times of India, The Illustrated Weekly of India, The Indian Express and Mid-Day. My sole purpose was to bring to the notice of the powers that be the kind of gross injustice being done to this great freedom-fighter, who carried his message through music. Whether or not my writings received the attention they deserved, I did my task as a matter of duty to a great man, and as a service to the cause of music. It is only recently that I learnt from Panditji that the Government of Maharashtra had sanctioned him a monthly pension as a freedom-fighter.

Ironically, there has been no response from the powers that rule the nation at the centre. Let me hope and pray that this autobiography will open their eyes and ears, and recognise Panditji as a freedom-fighter and bestow on him all the facilities already available to far lesser compatriots!

* * *

## SONG DESERVES ALL-INDIA ENCOURAGMENT

I heard Master Vinayak Ambhaikar sing "Vandemataram" song in different ragas at my place on the 3rd February 1938 and was impressed with his own style of singing the song in the 'Khambayat rag."

My colleague Mr. D. P. Mishra, Mrs. Anasuyabai Kale, Thakur Chedilal, President, Mahakoshal Provincial Congress Commitee and others were present on the occasion and they all liked it immensely. I therefore suggest that this raga may be used singing this song and trust that all public institutions will give Master Ambhaikar the chance to sing it whenever a necessity arises. In my opinion the song deserves All-India encouragement.

Nagpur
: 6-2-1938

**Dr. N. B. Khare**
PRIME MINISTER.
C. P. Government.

* * *

## BOMBAY PROVINCIAL CONGRESS COMITTEE

Congress House
Vithalbhai Patel Road,
Bombay 4
Date 10th January 1940

On 9th January 1940, sangit Sudhakar Mr. Ambhaikar of Nagpur gave before a public meeting in Jinnah Hall an exhibition of his music and particularly of 'Bande Mataram.' He has a sweet and far-reaching voice and his rendering of the 'Vande Mataram' was very much appreciated.

I wish him all success.

**Bhulabhai Desai**
President

* * *




सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सन्मान पत्र

श्री. विनायक देवराव अंभईकर यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

मंत्रालय, मुंबई
दिनांक

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

## साहित्यसम्राट न. चिं. केळकरांची दाद

TELEPHONE No. 406

THE KESARI AND THE MAHRATTA OFFICE

*568 Narayan Peth, Poona 2.*

Dated २३-९-३९ ~~19~~ .

रा. रा. अंभईकर गवयी, यांस

तुमचें पत्र पावलें. काल तुमचें वंदे-मातरम् गीत व इतर गायन ऐकून फार आनंद झाला. वंदेमातरम् ची चाल नेहमीहून निराळी व नवीन आहे, व कोठूनही संभावनीय. हा राग माझा आवडता असल्याने ती चाल मला विशेष हृदयंगम वाटली. तसा योग केव्हा आल्यास पुण्यास अगर मुंबईस तुमचें गायन सार्वजनिक किंवा खाजगी रीतीने लोक निरसनाश येण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. तरुण वयातच तुम्ही विद्या चांगली संपादन केलेली दिसते. ती तुम्हाला यथाकाल द्रव्य व कीर्ति मिळवून देऊं शकेल. पुण्यास पुनः केव्हा याल तर अवश्य भेटावें. कळावे.

न. चिं. केळकर



## श्री. अंभईकर यांच्या ध्वनिमुद्रिकेची जाहिरात



## संगीत सुधाकर वि.दे.अंभईकर (नागपूर) यांनी गायिलेली ध्वनिमुद्रिकांवरची गाणी (१९३५ ते १९४०)

१. गरवा हरवा डारूंगी (भीमपलास)
२. वारी जाऊँ सावरिया (मिश्र पहाडी) प्रो.शं.ग़.व्यास कृत
३. बनरी ब्याहन आया रे –(गौड मल्हार)
४. बलमा मोरी तोहे – (बागेश्री)
५. अब ना सता (सरपरदा)
६. सजनवा आ (हिंडोल)
७. दाही दिशा आनंद – कवि स.अ.शुक्ल
८. थांब जरा जाऊ नको – कवि स.अ.शुक्ल
९. पत्र देऊनी एक कबूतर
१०. विझले नगरामधले दिवे
११. माझ्या छकुलीचे डोळे
१२. काय झालं सोनुलीला – कवी वि. भि. कोलते
१३. नाथा दुराशा – (कानडी)
१४. कान्हा तुज नमितो – (भैरवी)
१५. बाला मधु ललिता
१६. दे जलधारा – (राग जयत कल्याण)
१७. दयाळा नाथा तारा मला
१८. कवि कोकीळ प्रेमातुर
१९. ही माय आपुली माता
२०. परमगती दे का विलासता
२१. चमकली कशी चांदणी
२२. कां ही तुझी शिरजोरी
२३. वंदे मातरम – एकल गायन व समूह गायन
२४. तुझा मी दास – गीत वे. शां भागवत
२५. मीरा प्रभुनामी रंगते – कवी मधुकर जोशी



## वि.दे.अंभईकर यांनी संगीतबद्ध केलेली गाणी ध्वनिमुद्रिका (एच.एम.व्ही. व आकाशवाणीसाठी)

१. लावियले नंदादीपा तुवा मंदिरातः गायिका – माणिक वर्मा
२. उघड उघड पाकळी : गायिका – माणिक वर्मा, कवी ना.ध. देशपांडे
३. रामचंद्र मनमोहन : गायिका – माणिक वर्मा, कवी ज. के. उपाध्ये
४. वंदे मातरमः गायिका – मोगूबाई कुर्डीकर
५. बेबंद सोबतीचे स्वरः गायिका – शोभा जोशी
६. मी चांदण्यात न्हालेः गायिका – उत्तरा केळकर
७. 'अबोल झाली सतार' : गायिका – सौ. विमल वाकडे जोशी
८. बोलविलो नंदलाल : गायिका – सौ. विमल वाकडे जोशी
९. शंकर नाचत आहे : सहगायिका – आशा भोसले
१०. गडद निळे, गडद निळे : गायिका – मालती पांडे
११. वादळ वाऱ्यावरी : गायिका – मालती पांडे
१२. धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची : गायिका – सुमन कल्याणपूर
१३. आठवते का सांगा तुला : गायिका – निर्मला गोगटे
१४. त्या स्थळी त्याच क्षणी : गायिका – निर्मला गोगटे
१५. नयनमें रघुवीर : गायिका – किशोरी आमोणकर
१६. उघडी नयन रघुनंदन : गायिका – सुधा मल्होत्रा
१७. गाइये, गणपती जगवंदन : गायिका – मालती पांडे, मालती जोशी, मोहनतारा अजिंक्य
१८. अंगणी खेळतात बाळे : गायिका – कृष्णा कल्ले आणि बालकराम, कवी ग.दि. माडगुळकर
१९. जीवलगा येऊ : गायिका – इंदुमती मनोहर, कवि ग. दि. माडगुळकर
२०. सांजवात लाविते : गायिका – माणिक वर्मा, कवी पी. सावळराम

## संगीतिका (आकाशवाणीसाठी)

१. यशोधरा, कवि ग. दि. माडगूळकर
२. शाकुंतल, (संस्कृत)
३. शिवमंगलम् (संस्कृत)

* * *

माझा मराठाची बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजासीं जिंके
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळविन ।।
(संत ज्ञानेश्वर – ज्ञानेश्वरी अध्याय – ६, ओवी – १४)

**रसिक वाचकांसाठी मराठीतील उत्तमोत्तम पुस्तकांचे अभिनव दालन**
**'नामवंत लेखकांची आणि प्रकाशकांची पुस्तके उपलब्ध'**

**ऐसी अक्षरे**

दुकान क्र. ७८, गिरीजाशंकर विहार सोसायटी, सहवास सोसायटीजवळ,
पोतनीस परिसर समोर, महर्षी कर्वेनगर, पुणे-५२. संपर्क : ०२० २५४५४६५५
email : aisee.akshare@gmail.com
websit : www.aiseeakshare.com

# स्वानंदी प्रकाशन

सरगम, रघुकुल सोसायटी, कर्वेनगर,
पुणे ५२ दूरध्वनी : ०२०-२५४२०८१२
E-mail : swanandik@rediffmail.com

आमची प्रकाशने
आनंदमठ – बंकिमचंद्र चट्टोपाध्याय, अनुवाद – डॉ. मृणालिनी गडकरी
राष्ट्रध्वज प्राचीन ते अर्वाचीन – मिलिंद प्रभाकर सबनीस
जनमनातील 'जन-गण-मन' – मिलिंद प्रभाकर सबनीस
संगीत विमर्ष (इंग्रजी) – डॉ. अरविंद थत्ते (भारतीय शास्त्रीय संगीतावरील विवेचन)
अमलताश – (कविता) – सुचेता जोशी अभ्यंकर
पूर्वसुरींचे सूर – डॉ. सुरेश चांदवणकर (दूर्मिळ ध्वनिमुद्रिकांचा व अपरिचित गायक-गायिकांचा परिचय)
आगामी
फिटे अंधाराचे जाळे – भालचंद्र करमरकर (लवकरच चौथी आवृत्ती प्रकाशित) (वल्लरी करमरकरची अनोखी जीवनकथा)

ह्या सर्व पुस्तकांसाठी
जरूर संपर्क साधा : **ऐसी अक्षरे**
दुकान क्र. ७८, गिरीजाशंकर विहार सोसायटी, सहवास सोसायटीजवळ,
पोतनीस परिसरसमोर, महर्षी कर्वेनगर, पुणे-५२ संपर्क : २५४५४६५५